मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.


अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



अनुक्रमणिका




२२ जून १९८३ रोजी मी ७५ वर्षांचा झालो. या निमित्ताने ठिकठिकाणी माझा 'अमृत महोत्सव' साजरा झाला. 'विदर्भ साहित्य संघा'ने केलेल्या सत्कार समारंभाच्या वेळी भाषण करताना, महाराष्ट्राची राजभाषा मराठी व भारताची राजभाषा हिंदी यांच्या परस्परसंबंधाविषयी मी बोललो. त्याच प्रसंगी अध्यक्षपदावरून बोलताना, ''महाराष्ट्र निर्मितीचे हेतू लक्षात घेता आणि मराठी ही राजभाषा म्हणून घोषित झालेली असतानाही शासन व सर्वसामान्य मराठी जनता यांचे सर्व व्यवहार मराठीत होत नाहीत'' याबद्दल खेद व्यक्त करून 'मराठी विद्यापीठाच्या स्थापनेसंबंधी माझ्या विचारांचे सूतोवाच मी करून ठेवले आणि पुढे दोनच महिन्यांनी नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात भाषण करताना ''जनसामान्यांची मराठी भाषा हीच सर्व क्षेत्रात, सर्व स्तरांवर शिक्षणाची भाषा झाली पाहिजे. आजची स्थितिप्रिय विद्यापीठे हे कार्य करू शकणार नाहीत. त्यासाठी, सर्व विद्याशाखांतील, सर्व विषयांत, सर्व स्तरांवर मराठी माध्यमातून शिक्षण देणारे एक स्वतंत्र 'मराठी विद्यापीठ' स्थापन झाले पाहिजे'' अशी 'मराठी विद्यापीठा'च्या स्थापनेची निकड प्रतिपादन केली होती. मराठीची अस्मिता जोपासण्याचे, तिचे संरक्षण, संगोपन व संवर्धन करण्याचे कार्य तर मी आजपर्यंत करीतच होतो, पण कुलगुरु-पदावरून निवृत्त झाल्यावर या कार्यात स्वतःला झोकून देऊन त्या संबंधी प्रचारासाठी अनेक लेख मी लिहिले.

वि. भि. कोलते

वि. भि. कोलते

('आत्मचरित्र' मधून)



वर्ष ५८ वे अंक पहिला

जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर २००७

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक नारायण कुळकर्णी कवठेकर

अनुक्रमणिका

मुखपृष्ठ
डी. जी. मुतनाडकर

अंक, मुखपृष्ठ मांडणी व छायाचित्र
विवेक रानडे

रेखाटने
रा. मु. पगार
सुनील अवचार

अक्षरजुळणी व मुद्रण
नारायण ऑफसेट वर्क्स, धंतोली, नागपूर

मूल्य : चाळीस रुपये

वार्षिक वर्गणी : शंभर रुपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल झाशी राणी चौक,
नागपूर - ४४० ०१२
दूरध्वनी : ०७२४ - २५२३९२९

संपादकीय पत्रव्यवहार
'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४ ००५
दूरध्वनी ०७२४ - २४५०१८५
भ्रमणध्वनी ९८५०७४२८८१

या अंकात प्रसिद्ध झालेल्या
लेखनातील मतांशी
संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे
पदाधिकारी सहमत असतीलच
असे नाही.

अनुक्रमणिका

अ । नु । क्र । म

।। संपादकीय ।।

श्रीपु : कृतज्ञ स्मरण

श्री. पु. भागवत मराठी साहित्याच्या विशाल भूधरावर निजनाम नोंदवून गेले. एक संपादक म्हणून त्यांचा कायमस्वरूपी ठसा 'सत्यकथा' आणि 'मौज' याच्या रूपात उमटवून गेले. संपादकपदाला प्रतिष्ठा, गौरव आणि वलय प्रदान करणारा हा मराठी साहित्यविश्वातील एकमेव संपादक. यासम हा.

एकूण साहित्यव्यवहारासंबंधी त्यांच्याजवळ एक सजग असे मन होते. व्यक्तिगत संबंध आणि साहित्यमूल्य यांच्यातील सीमारेषा कोठे आहे याचे त्यांना भान होते. जागतिक वाङ्मयातील श्रेष्ठ लेखन आणि नव्याने येणारे प्रवाह याविषयी त्यांचे वाचन ताजे असायचे. साहित्याबरोबरच चित्रकला, शिल्प, संगीत या कलांमधील अभिजातता आणि प्रायोगिकता याविषयी ते जागरूक असायचे. कलाविषयक जाणिवांचा विकास जीवनविषयक जाणिवा समृद्ध होण्यासाठी कसा पूरक ठरू शकतो हे त्यांना ठाऊक होते आणि याचे दर्शन 'सत्यकथे'तून घडतही असे. साहित्यकलेची निर्मिती आणि निर्माता याविषयी त्यांना कुतूहल होते. म्हणून लेखक लहान असो मोठा असो, नवा असो जुना असो - त्यांच्याकडून सर्वांना सारखेच प्रेम मिळे आणि मानही. बोलणे अघळपघळ नव्हते, वागणे मोकळेढाकळे नव्हते, पण अंतरीचा ओलावा असा होता की अनेक कवी, लेखकांनी त्यांना आप्त मानले; त्यांनीही अनेकांशी जिवाभावाचे सख्य जोडले. गाजावाजा न करता ते अनेकांच्या सुखदु:खात सहभागी झाले आणि मैत्रभावाने मदतही केली.

ज्यावेळी 'सत्यकथा' सुरू होते तेव्हा कोणी नवीन मासिक काढत असे तर अनुकरण सत्यकथेचे दिसायचेच. मजकुराच्या बाबतीत, लेखकांच्या बाबतीत, रंगरूपाच्या बाबतीतही. अर्थात याला काही अपवाद निश्चितच होते. वाङ्मय आणि जीवन यांच्यातील अनुबंधाविषयी सत्यकथेकडून वेगळा दृष्टिकोन असणारी मंडळी तेव्हाही होतीच. पण सर्वसाधारण प्रभाव 'सत्यकथे'चा होता. कालांतराने 'सत्यकथे'चाही एक साचा होत गेला. नवी नावे दिसण्याऐवजी तीचतीच नावे प्रत्येक अंकात दिसू लागली. छापलेल्या साहित्याचे स्वरूप कोमट दिसू लागले. जगभरातल्या आणि मराठी मुलुखातल्या उलथापालथीचा परिणाम साहित्यातून दिसू लागला. ही झळ 'सत्यकथे'ला सोसवत नाही की काय असे दिसू लागले. संपादक ही एक व्यक्तीच असते आणि व्यक्तीला मर्यादा असतात. कारणे अनेक असतील. काही व्यावहारिकही. पण श्रीपुंनी शांतपणे 'सत्यकथे'ला विराम दिला.

अनेक पिढ्यांचे स्वागत श्रीपुंनी केले. ध्यास साहित्याचा आणि त्यातील उत्तमाचा घेतला. परदेशात गेले तर जाताना वाचण्यासाठी व तपासण्यासाठी नवीन लेखनाची हस्तलिखिते घेऊन गेले. लेखकाला काही बदल सुचविले पण 'अंतिम शब्द, अंतिम निर्णय कवीचा किंवा लेखकाचा' हेही आवर्जून सांगितले. ज्या लेखनाला आपण ओळखू शकलो नाही त्याची मोकळेपणाने कबुली दिली. माणूस म्हणून एक उंची, एक गरिमा कायम सांभाळली. त्यांच्या लेखनातून, मुलाखतीतून, पत्रातून त्यांचे सौम्य पण ठाम व्यक्तिमत्व मनावर संस्कार करीत राहते.

श्रीपुंना श्रद्धांजली म्हणून हे त्यांचे कृतज्ञ स्मरण !

- नारायण कुळकर्णी कवठेकर

अनुक्रमणिका

॥ तेथे कर माझे जुळती... ॥

डॉ. विमल भालेराव

डॉ. वि. भि. कोलते या नावाचा एक खास असा दरारा आहे. व्यक्ती, विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, कुलगुरू, संशोधक, साहित्यिक, पालक या सर्वच दृष्टीनी ते वंदनीय आहेत. डॉ. कोलते विदर्भाचे भूषण आहेत. मराठी वाङ्मयाची शान आहेत तर भारतमातेचे पद्मश्री आहेत. हीरक महोत्सव, अमृत महोत्सव, जन्मशताब्दी हे सन्मानही त्यांच्या वाट्याला आले. ही सर्व समृद्धता स्वकष्टार्जित आहे. त्यांचा जन्म - गरीब शेतकरी कुटुंबातला. विदर्भातल्या बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील नरवेल या खेड्यातला ! जन्मगाव खेडे. शिकायची सोय नाही. घरात शिक्षणाचा वारसा नाही. पण शिकण्याची जिद्द नि चिकाटी विलक्षण होती. त्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मलकापूरला. हायस्कूलसाठी खामगाव. कॉलेजसाठी नागपूरचे मॉरिस कॉलेज अशी त्रिस्थळी शिक्षणयात्रा झाली पण कोलते मजलदरमजल करत सतत उच्चांक गाठत राहिले. 'रिकामा जाऊ नेदी क्षण' याचे ते प्रात्यक्षिक होते. ''दिसामाजी काहीतरी ते लिहावे । प्रसंगी अखंडित वाचीत जावे ।'' हे सुभाषित त्यांनी आचरणात आणले - नि त्यादृष्टीने इतरांनाही आग्रह करीत राहिले. त्यांचे सहकारी सांगतात - ''वि. भि. म्हणत, मी काम करतो, तुम्हीही करा. तुम्हाला संशोधनात रस नसेल तर कथा लिहा. गाण्याचा रियाज करा. काहीच नसेल तर निदान चांगले वाचन तरी करा. त्यांच्या या सांगण्यानेच आम्ही लिहायला लागलो. वाचनाची सवय लागली.''

भाऊसाहेबांनी, (पूर्ण नाव - विष्णू भिकाजी कोलते) १९४८ मध्ये महानुभाव तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून पीएच.डी. ही पदवी मिळवली. आणि ते महानुभाव वाङ्मयातच रमले. इतके की महानुभाव वाङ्मय म्हणजे कोलते असे समीकरणच बनले. हा पंथ उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष अशा सर्व भेदांपलीकडचा आहे. त्यांची धर्मभाषा मराठी आहे. या महानुभाव पंथाच्या गुणवैशिष्ट्यामुळे हा पंथ, पंथाचे वाङ्मय त्यांच्या संशोधनाचे विषय झाले. त्यांनी महानुभाव साहित्य सर्वसामान्यांसाठी सांकेतिक लिपीतून मराठी लिपीत आणले. डॉ. वि. भि. कोलत्यांच्या समग्र वाङ्मयावर नजर जरी टाकली तरी त्यात सर्वाधिक संख्या भरते ती महानुभाव वाङ्मयावरील ग्रंथांचीच ! त्यांनी महानुभावांचे तत्त्वज्ञान लिहिले. (१९४५) हा त्यांचा ग्रंथ साहित्य अकादमीने भारतीय भाषांमध्ये अनुवादित करण्यास स्वीकारला. 'महानुभावांचा आचारधर्म' सांगितला. 'महानुभाव संशोधन' लेखसंग्रह १, २, ३, ४ लिहिले. 'श्रीचक्रधर चरित्र', 'श्री चक्रधर शेवटचे प्रकरण' हे स्वतंत्र ग्रंथ म्हणून त्यांच्या नावावर आहेत. तर सुमारे पंधरा संपादित ग्रंथ आहेत. त्यांच्या बहुतेक चरित्रांची धाटणी विस्तृत प्रस्तावना - त्यात ग्रंथ महत्त्व, महानुभावांच्या स्थानांचे भौगोलिक महत्त्व, चरित्राविषयी, ग्रंथ लेखकाविषयी, सामाजिक परिस्थिती, ग्रंथाची भाषा

- व्याकरण विशेषस्वर, व्यंजने, शब्दांच्या जाती, त्यांना होणारे विकार - लिंग, वचन, विभक्ती, काळ, अर्थ, ल्यबन्त, तुमन्त-म्हणी, वाक्प्रचार ग्रंथसमाप्तीनंतर अर्थनिर्णायक टीपा, शब्दकोश, स्थळांची सूची, व्यक्तींची सूची व माहिती, सामान्य सूची, संक्षेपसूची, शुद्धिपत्रक अशी आहे. संपादनांना वरील सर्व बाबींव्यतिरिक्त पाठचिकित्साही जोडलेली असते. त्यामुळे त्यांची संपादने शास्त्रशुद्ध संहित-शोधनाचा वस्तुपाठ ठरली आहेत. ग्रंथांच्या अर्पणपत्रिकाही लक्षणीय आहेत. या सर्व वैशिष्ट्यांमुळे कोलत्यांचा ग्रंथ अभ्यासणाऱ्यांना फारशी शोधाशोध करावी लागत नाही. पुस्तकाच्या पुढेमागे बहुतांशी बाबी मिळून जातात. ही अभ्यासकांच्या दृष्टीने फार मोठी सोय आहे.

भाऊसाहेबांच्या प्रचंड नि शिस्तशीर साहित्यनिर्मितीमुळे सर्वसामान्यांना महानुभाव वाङ्मय समजणे सोपे जाते. महानुभाव पंथाचा अभ्यास करणारी नवीन पिढी कोलत्यांमुळे जन्मली. महानुभाव पंथाची पायाभरणी नि कळसाची सांगता अशी दोन्ही कामे त्यांनीच केली. त्यांचे संशोधन अभ्यासातून निष्कर्षाप्रत पोचते. वि. भिं.च्या संशोधनाला पार करून जाण्याची क्षमता दुसऱ्या संशोधकात असणे कठीण आहे. केवळ नागपूर विद्यापीठातच नव्हे तर सागर, जबलपूर, विक्रम, मराठवाडा, दिल्ली, पुणे या विद्यापीठातही त्यांच्या निष्ठा व कार्यकर्तृत्वाची सर्वांना माहिती होती. ''कोलते असताना असे काही चालू देणार नाहीत.'' असा विश्वास आणि वचक त्यांच्याबद्दल होता. ही कमाई आजच्या दिवसांत फार मोलाची वाटते.

त्यांचे मराठीवर नितांत प्रेम ! 'मराठी असे आमुची मायबोली !' हे त्यांना अंतःकरणातून मान्य होते. भाषेच्या विकासासाठी ते जिवाचा आटापिटा करीत. महाराष्ट्र सरकारची 'भाषा सल्लागार समिती', 'साहित्य संस्कृती मंडळ' यांच्या कार्याच्या निमित्ताने डॉ. कोलत्यांनी भारतीय भाषांच्या विकासाचे काम अत्यंत चोखपणे केले. भारतीय भाषांना प्रतिष्ठा लाभल्याशिवाय भारताचे भावनात्मक ऐक्य साधले जाणार नाही, अशी त्यांना खात्री होती. राष्ट्रभाषेच्या विकासाशिवाय भारताची लोकशाही संस्कृती जोपासली जाऊ शकत नाही अशी त्यांची नितांत निष्ठा होती. त्यामुळे त्यांनी राष्ट्रभाषा संघटनेचे काम हाती घेतले. 'आधी केले मग सांगितले' अशी जर वृत्ती नसेल तर नुसत्या प्रचार-प्रसाराला अर्थ उरत नाही. त्यामुळे त्यांनी स्वभाषेइतकाच हिंदीचाही अभ्यास केला. 'काशी विद्यापीठा'त 'संतोंका सामाजिक कार्य' या विषयावर पाच व्याख्याने हिंदीतून दिली. योगायोगाने 'विदर्भ साहित्य संमेलन' (गोंदिया) आणि 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' (भोपाळ) या दोन्ही अध्यक्षपदाचा मान त्यांना हिंदीबहुल व हिंदीभाषिक प्रदेशातच मिळाला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी हिंदीचा मान राखला. परंतु मराठीच्या गळचेपीचे गाऱ्हाणे तितक्याच ताकदीने मांडले. कारण कोणत्याही भाषेच्या प्रतिष्ठेला धक्का लागणे त्यांना मान्य नव्हते. अशुद्ध लेखन आणि अशुद्ध वाणी ही त्यांच्यादृष्टीने आळसाची लक्षणे आहेत. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू असताना शिक्षणाचे माध्यम मातृभाषा मराठी असावे. राज्याचा कारभार मराठीतून चालावा म्हणून ते आग्रह धरीत. त्यांच्या कारकीर्दीत विद्यापीठाचा कारभार, विधीमंडळ व विद्यामंडळाचे कामकाज, कार्यालयीन पत्रव्यवहार, अध्यापन आणि दीक्षांत सभारोह मराठीतून करण्याचा त्यांनी पायंडा पाडला. मराठीची बुद्धिपुरस्सर उपेक्षा करणाऱ्या अन्यायाच्या प्रतिकारार्थ विदर्भ साहित्य संघाने अन्न सत्याग्रह केला होता. त्यात आपल्या वयाची तमा न बाळगता वि.भि. सहभागी झाले होते. विधानसभेवरील मोर्चात पुढाकार घेतला होता. मराठी बोलताना आपल्या बोलण्यात कुठेही इंग्रजी शब्द येणार नाही याची ते काळजी घेत. असा प्रयत्न सर्वांचाच असावा असा त्यांचा आग्रह असे. भाषेची महती ओळखून तिच्यासाठी कळकळीने जीव तोडून काम करणारी जी मंडळी आहेत त्यात भाऊसाहेबांचा क्रमांक फार वरचा आहे. मराठीच्या प्रतिष्ठेसाठी, विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न 'इये मराठीचिये नगरी' या ग्रंथात वाचायला मिळतात. वि.भिं.ना मातृभाषेचा, राष्ट्रभाषेचा अत्यंत अभिमान ! देशाचा, प्रदेशाचा,

भारतीयत्वाचा तितकाच गर्व ! पण त्यांचा पोषाख मात्र साहेबी ! महाराष्ट्रात कटाक्षाने नित्यनेमाने साहेबी पोषाख करणारी माणसे दोन ! एक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि दुसरे - डॉ. वि. भि. कोलते. यामागची कारणे त्यांनाच माहीत.

भाऊसाहेबांचे संघटन कौशल्य वाखाणण्यासारखे होते. विदर्भ साहित्य संघाची, आरंभीची संघटना त्यांनीच बांधली. त्यांच्या कारकीर्दीत नागपूर विद्यापीठांतर्गत शंभर महाविद्यालये होती. सगळ्यांचा व्याप सांभाळायचा, विकास करायचा, त्यांना स्थैर्य आणायचे, नवेनवे उपक्रम राबवायचे हे काम ते सहज करीत. शिस्तशीर, कर्तव्यदक्ष, कुशल प्रशासक म्हणून त्यांची ख्याती होती.

वि. भि. हाडाचे शिक्षक होते. शिक्षकाने अभ्यास केलाच पाहिजे. त्याला शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, साहित्यशास्त्र यायलाच पाहिजे असे त्यांचे मत होते. विषयाची उत्तम तयारी, मुलांना सहज समजेल या पद्धतीने शिकवण्याची त्यांची हातोटी होती. त्यांचे कितीतरी विद्यार्थी याचे साक्षीदार आहेत. प्राचार्यपदी असताना शिक्षकांना, शिकवल्या जाणाऱ्या भागाची टिपणे काढायला सांगत. वह्या तपासून देत. त्यावर त्यांचा तपासल्याचा 'पाहिले' असा शेरा असे. 'सत्यकथा', 'ललित' यासारख्या मासिकात वादग्रस्त लेख असला तर ते स्टाफरूममध्ये येऊन चर्चा करीत.

खळाळता उत्साह, नव्यानव्या गोष्टी करण्यास सतत तत्पर, त्यासाठी प्रचंड कष्ट उपसण्याची तयारी; किचकट संशोधनात मुरलेले, लिपीच्या नादी लागलेले, कोरीव लेखांचे अभ्यासक, व्यक्तिचित्रणे, विदर्भविषयक समीक्षा, आत्मचरित्र यासारखे बहुविध लेखन करणारे, संशोधनाचा विषय ठरलेले ('विष्णू भिकाजी कोलते यांच्या वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास' रमाकांत कोलते - मार्गदर्शक - डॉ. मालती पाटील, नागपूर विद्यापीठ, १९८६. (अप्रकाशित)) असंख्य सन्मानाचे मानकरी वि. भि. कोलते 'माणूस' म्हणून कसे होते हा प्रश्न अनेकांना पडतो. माणसाशी वागताना ते 'माणूस' म्हणून वागत. त्यांच्याकडून कुणीही विन्मुख जात नसे असे लोक अनुभवाने बोलतात. ते संगीतवेडे होते. त्यांना रागदारीचे आस्वादापुरते ज्ञान होते. त्यांना नाटकाचे वावडे नव्हते. 'सोडचिठ्ठी' हे त्यांचे नाटक. कविता हा त्यांच्या आवडीचा विषय. त्यांनी आपल्या लाडक्या लेकीचे नाव 'कविता' ठेवले. 'स्वस्तिक' तिघांच्या सहकार्याने लिहिलेला स्फूट कविता संग्रह. 'लव्हाळी' हा त्यांचा शालेय व महाविद्यालयीन जीवनातल्या कवितांचा संग्रह. त्यांचा मलकापूर येथील राहता वाडा - घरांच्या वाटणीच्या वेळी काकांच्या वाट्याला गेला. ते घर सोडताना भरून आलेल्या भावना 'जुन्या गृहास' या कवितेत वाचायला मिळतात. भाऊसाहेब लिहितात -

"तुला जाता सोडून दुःख वाटे
नेत्र युगुलातूनि अश्रूपूर लोटे
कंठ दाटे रोमांच अंगी येती ।
वर्णवेना मज हाय ! अवस्था ती !"

निर्जीव वास्तूबद्दल इतके आतून ओले असलेले भाऊसाहेब जिवंत माणसाबद्दल माणुसकीने ओथंबलेले होते. त्यांना घरसंसारात रस होता. उषाताई आणि भाऊसाहेब यांचे वैवाहिक जीवन अतिशय मनोरम होते. उषाताई भाऊसाहेबांच्या सहचरी, मुलांची आई तर विद्यार्थीवर्गाच्या गुरुमाऊली. मुले चांगल्या मार्गाला लागलेली. भाऊंच्या नावाला जपणारी. भाऊसाहेबांनी माणसात देव बघितला. नवीन उपक्रमाच्या यशासाठी ते देवाच्या पायावर डोके ठेवीत नसत. तर म. म. डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे, लोकनायक बापूजी अणे यांच्या पायावर डोके ठेवून आशीर्वाद मागत. बहुजनप्रीती हा त्यांचा स्वभावधर्म. तो त्यांनी जागवला. जोपासला. तोच जीवनतारक आहे असा विश्वास बाळगला. असा हा डॉ. वि. भि. कोलते यांचा यशस्वी जीवनप्रवास बघून सहज उद्गार बाहेर पडतात - "दिव्यत्वाची जेथ प्रतीती । तेथे कर माझे जुळती ।"

■ ■ ■

अनुक्रमणिका

॥ विष्णु भिकाजी कोलते - अल्पपरिचय ॥

जन्म	२२ जून १९०८ नरवेल, ता. मलकापूर, जि. बुलढाणा	
शिक्षण	एम.ए. (१९३१), एल.एल.बी. (१९३५), पीएच्.डी. (१९४८) सर्व परीक्षा नागपूर विद्यापीठातून उत्तीर्ण. एम. ए. परीक्षेत पहिल्या वर्गात पहिले आल्याबद्दल 'ना. के. बेहरे सुवर्ण पदक' आणि सर्व परीक्षातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांत पहिले आल्याबद्दल 'खान बहादूर मलक सुवर्ण पदक' 'कमला नारायण सुवर्णपदक' १९५० डी. लिट्. अमरावती विद्यापीठ (१९९४)	
व्यवसाय :	मराठीचे प्राध्यापक १९३१ ते १९६६	
	प्राचार्य	नागपूर महाविद्यालय, १९५६ ते १९६४
	प्राचार्य	विदर्भ महाविद्यालय, अमरावती, १९६४ ते १९६६
	कुलगुरू	नागपूर विद्यापीठ, १९६६ ते १९७२
सन्मान	अध्यक्ष	विदर्भ साहित्य संघ व संमेलन, गोंदिया १९४८
		शासन साहित्य परिषद (मध्यप्रदेश) द्वारा संपादन कार्याकरिता विशेष सन्मान
	विद्यारत्न	अखिल भारतीय महानुभाव परिषद, १९५२
	संपादक	महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे. १९५२ ते १९५४
	अध्यक्ष	महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, विदर्भ शाखा १९५६ ते १९८०
	सभासद	साहित्य अकादमी, दिल्ली, १९५६ ते १९६१
	उपाध्यक्ष	महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, १९६४ ते १९८०
	अध्यक्ष	महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद, खामगाव १९६६
	सभासद	राष्ट्रीय छात्रसेना सल्लागार समिती, केंद्र शासन, नवी दिल्ली, १९६६
	सभासद	राष्ट्रीय छात्रसेना सल्लागार समिती, महाराष्ट्र राज्य, १९६६
	अध्यक्ष	अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, भोपाळ १९६७
	सभासद	महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९६८ ते १९९२
	सभासद	महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई
	सभासद	मराठी भाषा उच्चाधिकार समिती, म. रा. मुंबई
	सभासद	राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई
	सभासद	डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्रोतसामग्री प्रकाशन समिती, म. शा.
	अध्यक्ष	भाषा सल्लागार मंडळ, महाराष्ट्र शासन १९७९ पासून
	मुख्य अतिथी	दीक्षांत समारंभ, नागपूर विद्यापीठ, १९८३
	गौरववृत्ती	महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९८४
	अध्यक्ष	मुंबई मराठी साहित्य संघ, सुवर्ण महोत्सव १९८५

सन्मानवृत्ती अखिल भारतीय पुराभिलेख संस्था, १९९०
पद्मश्री भारत सरकार १९९१
सन्मानवृत्ती साहित्य अकादमी १९९४
जागतिक मराठी परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात गौरव, १९९४

निधन ८ एप्रिल १९९८

■■■

डॉ. विष्णु भिकाजी कोलते ह्यांच्या वाङ्मयाची सूची

भाग पहिला
ग्रंथ संपदा

१. चक्रधर चरित्र
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९५२, पृ. ३३८.
२. चक्रधर व ज्ञानदेव
मुंबई, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९५०, पृ. २५.
३. प्राचीन मराठी साहित्य संशोधन
पुणे, ठोकळ प्रकाशन, १९६८, पृ. २०+२०९.
४. भास्करभट्ट बोरीकर, चरित्र व काव्य विवेचन
अमरावती, प. वि. जोशी, १९३५, पृ. १७१
५. मराठी दीपिका
मलकापूर, कोलते बंधु, १९३७, पृ. ३१३
६. मराठी संतोंका सामाजिक कार्य
मुंबई, हिंदी रत्नाकर कार्यालय, १९५४, पृ. १९+१५२
७. महानुभावांचा आचारधर्म
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९४८, पृ. १४+२+३८४
८. महानुभाव तत्त्वज्ञान
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९४५, पृ. २८+५६८
९. महानुभाव संशोधन १
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९६२, पृ. १५+१७१
१०. लव्हाळी (काव्यसंग्रह)
अमरावती प्राध्यापक
११. साहित्य संचार
पुणे, ठोकळ प्रकाशन, १९६५, पृ. ११+१८६

१२. सोडचिठ्ठी (प्रहसन)
मलकापूर, वि. भि. कोलते, १९३८, पृ. ४८

१३. स्वस्तिक (स्फुट कवितांचा संग्रह इतर तिघांच्या सहकार्याने)
दर्यापूर, शंकरलाल अगरवाल, १९३७, पृ. ३+१०

संपादित ग्रंथ

१४. दामोदर पंडित - 'वछाहरण'
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९५३, पृ. ६४+२२०+७०

१५. नरेन्द्र - 'रुक्मिणी स्वयंवर'
मलकापूर, अरुण प्रकाशन

१६. बोरीकर, भास्करभट्ट - 'उद्धवगीता अथवा एकादश स्कंध'
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९३५, पृ. १५२

१७. बोरीकर, भास्करभट्ट - 'शिशुपाल वध'
मलकापूर, अरुण प्रकाशन, पृ. ३२६

१८. महिमभट्ट - 'श्री गोविंदप्रभु चरित्र'
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९६०, पृ. १०८

१९. मुनि केशिराज - 'मूर्तिप्रकाश'
नागपूर, विदर्भ संशोधन मंडळ, पृ. ६८+४६७

२०. रवळोबास - 'सह्याद्रि वर्णन'
पुणे विद्यापीठ, १९६४, पृ. ८८+३१२

२१. स्थान पोथी
मलकापूर, अरुण प्रकाशन, १९३७, पृ. ११२

भाग दुसरा
लेख आणि काव्य

२२. अनुच्चारित अनुस्वारांना अर्धचंद्र
'राष्ट्रशक्ति', १८-१-१९५१

२३. अनुच्चारित अनुस्वारांना अर्धचंद्र
संपादकीय लेख, 'राष्ट्रशक्ति', १२-२-१९५१

२४. अनुच्चारित अनुस्वारांना अर्धचंद्र
गुप्ते, चंद्रशेखर रामचंद्र, टीका, 'समाधान', ११-२-१९५१

२५. अनुच्चारित अनुस्वारांना अर्धचंद्र
गुप्ते यांना उत्तर, 'समाधान', १८-२-१९५१

२६. अनुस्वार ठेवा ! अनुस्वार गाळा
'अंजलि', दीपावलि अंक, १९५५, पृ. १८५-१८६

२७. अंगाई (कविता)
'वागीश्वरी', वर्ष १, पृ. ३४८

२८. आजकालचा महाराष्ट्र
'पूजा', खंड १, १९४७, पृ. २८४-२८७
२९. आजचा शिक्षक (यवतमाळ जिल्हा प्राथमिक शिक्षकसंघाच्या ११ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना केलेले भाषण)
'वऱ्हाड शालापत्रक', १९३७, पृ. ४४७-४५४
३०. "उषःकाल" डॉ. कोलते यांनी केलेले समीक्षण
'पारिजात', जानेवारी १९३४, पृ. ३५-४१
३१. "उषःकाल आणि वज्राघात" (चर्चा-पूर्वार्ध)
'ज्योत्स्ना', डिसेंबर १९३६, पृ. ३५-४१
३२. "उषःकाल आणि वज्राघात" (चर्चा-उत्तरार्ध)
'ज्योत्स्ना', जानेवारी १९३७, पृ. ३५-४१
३३. एक कणखर व्यक्तिमत्व
ना. पा. नागपूरे आणि इतर (संपा.) 'डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे विविध दर्शन', पृ. ३०-४१
३४. कालिदासाच्या नाट्ययशाचे रहस्य
'विहंगम', खंड ४, अंक १०, ऑगस्ट १९३७, पृ. ६०१-६०७
३५. कासार शिरसि कॉपर प्लेटस् ऑफ विजयादित्य
नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल, खंड १७, एप्रिल १९६७, पृ. १४२-१४९
३६. कै. पंडित श्री. बाळशास्त्री महानुभाव
'युगवाणी', चंड ८, अंक ५८, दीपावलि विशेषांक, नोव्हेंबर १९५३, पृ. ११-१७
३७. कोल्हटकरांचा विनोद
'तरुण भारत', ७-९-१९५२
३८. गुरूवर्य गणेश मोरेश्वर गोरे
'तरुण भारत', ६-१-१९५७
३९. चक्रधराचा प्रयाणशक
'सत्यकथा', सप्टेंबर, १९६५, पृ. ५९-६६
४०. चक्रधरांचे ग्रंथकर्तृत्व
'युगवाणी', खंड ६, अंक ७, शरद अंक, ऑक्टोबर १९५१, पृ. ३२४-३३४
४१. चालुक्य नृपति विजयादित्य याचा कासार शिरसि ताम्रपट
'विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक', १९६६, पृ. १७-३६
४२. जळगाव साहित्य संमेलन, १९३७
'वऱ्हाड शाळापत्रक', १९३७
४३. जातिवंत कवि आप्पासाहेब फडके
महाजनी, ह. रा. आणि इतर (संपा.) प्रा. फडके गुणगौरव ग्रंथ, १९६०, पृ. १३०-१३७
४४. ज्योतिषरत्नमाला–मराठी टीका
'विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक', १९६३, पृ. १२२-१४६
४५. झरिका ग्रॅन्ट ऑफ राष्ट्रकूट, गोविंद थर्ड, शक ७२५
'एपिग्राफिया इंडिका', खंड ३२, १९५७-५८, पृ. १५७-१६४

४६. टू वजीरखेड कॉपर प्लेट ग्रॅन्टस् ऑफ ईंद्र, थर्ड
'नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल (ह्युमॅनिटीज', खंड १७, एप्रिल १९६७, पृ. ११७-१४२
४७. डाकराम (प्रवासवर्णन)
'पूजा', खंड १, अंक १, नोव्हेंबर १९४७, पृ. १६-२१
४८. डोंबिवली येथील शिलालेख
'नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल (ह्युमॅनिटीज)', खंड १७, ऑक्टोबर १९६६, पृ. १००-१०५
४९. तत्राऽपिच चतुर्थोङ्कः (पूर्वार्ध)
'युगवाणी', खंड ४, अंक ११, नोव्हेंबर १९४९, पृ. २२४-२३५
५०. तत्राऽपिच चतुर्थोङ्कः (उत्तरार्ध)
'युगवाणी', खंड ५, अंक १, जानेवारी १९५०, पृ. १९-२९
५१. तत्राऽपिच चतुर्थोङ्कः (हिन्दी)
'राष्ट्रभारती'
५२. तिवारी व टेकाडे
'लोकशिक्षण', खंड ३, पृ. ५४९-५६६
५३. तुझी स्मृति (कविता)
'विहंगम', खंड ४, अंक २, डिसेंबर १९३६, पृ. ७२
५४. त्रिसांकु
'सत्यकथा', खंड ३२, अंक ३, जानेवारी १९६५, पृ. ३९-४३
५५. दादोबा पांडुरंग तर्खडकर आणि मराठी भाषेचे व्याकरण
'ज्योत्स्ना', फेब्रुवारी १९३७, पृ. ४०-४६
५६. दासवोधाची भाषिक पहाणी
'रामदास आणि रामदासी', जून-जुलै १९४३, पृ. १५-३७
५७. दांडीच्या रणक्षेत्रातून (कविता)
'युगवाणी', खंड २, अंक ४, एप्रिल १९४७, पृ. ९८-१०१
५८. नोट ऑन द डेट ऑफ हेमाद्रीज डेथ
'नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल', डिसेंबर १९४१, पृ. ९६-९८
५९. पवईचा शिलालेख
'मौज', दिवाळी अंक, १९६६, पृ. ८७-९०
६०. पश्चिम वऱ्हाडातील काही प्रचलीत शब्द (लेखांक १)
'विविधज्ञानविस्तार', खंड ५८, अंक ११, नोव्हेंबर १९२७, पृ. ४०३-४०६
६१. पश्चिम वऱ्हाडातील काही प्रचलीत शब्द (लेखांक २)
'विविधज्ञानविस्तार', खंड ५९, अंक ३, मार्च १९२८, पृ. १०९
६२. पश्चिम वऱ्हाडातील काही प्रचलीत शब्द (लेखांक ३)
'विविधज्ञानविस्तार', खंड ५९, अंक ८, ऑगस्ट १९२८, पृ. ३१९
६३. पश्चिम वऱ्हाडातील काही प्रचलीत शब्द (लेखांक ४)
'विविधज्ञानविस्तार', खंड ६१, अंक ६, पृ. १९४
६४. पश्चिम वऱ्हाडातील काही प्रचलीत शब्द (लेखांक ५)
'विविधज्ञानविस्तार', खंड ६१, अंक ७-८, पृ. २३२

६५. पारडा शिलालेख
'संशोधन पत्रिका', ऑक्टोबर १९६४, पृ. ८९

६६. पाहवे ना डोळा ऐसा हा आकांत
'समाधान', १२-३-१९५०

६७. पूज्य साने गुरूजी
'युगवाणी', खंड ५, अंक ७-८, ऑगस्ट १९५०, पृ. २२५-२३४

६८. पौनी प्लेटस् ऑफ प्रवरसेन II
'नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल (ह्युमॅनिटीज)', खंड १८, ऑक्टोबर १९६७, पृ. ७३-७७

६९. प्राचीन केळझर
'विकास वार्ता', जिल्हा परिषद, वर्धा, १९६७, पृ. १२-१८

७०. "फुलाचिया भोगा - लागि प्रेम दांगा"
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड ३९, अंक १५३, एप्रिल-जुलै १९६५, पृ. ५-१५

७१. फॉर व्हर्सेस फ्रॉम दि नेसरी कॉपर प्लेटस्
'नागपूर युनिव्हर्सिटी हिस्टॉरिकल जर्नल'

७२. भ. श्री. पंडित
पंडित, भ. श्री. 'आधुनिक मराठी कविता', प्रथमावृत्ती, १९५२, पृ. २७३-२७७

७३. भास्करभट्ट बोरीकरांचे तृतीयाचर्यत्व
'सह्याद्री', खंड २, सप्टेंबर १९३६, पृ. ८०३-८१०

७४. मधुर स्मृति
विदर्भ महाविद्यालय, अमरावती, रौप्य महोत्सव स्मारक ग्रंथ

७५. मराठा साम्राज्याचे एक चित्र
भोसले बाबूराव (संपा.) "दळवी गौरव ग्रंथ', १९४१, पृ. १०२-१०८

७६. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २५, अंक १०२, जुलै-सप्टेंबर १९५२, पृ. ४२-४५

७७. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २५, अंक १०३, ऑक्टोबर-डिसेंबर १९५२, पृ. ४४-४७

७८. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २६, अंक १०४, जानेवारी-मार्च १९५३, पृ. ५०-५२

७९. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २६, अंक १०६, १९५२, पृ. ५१-५२

८०. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २७, अंक १०७, १९५३, पृ. २५-२६

८१. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २७, अंक १०७, १९५४, पृ. ४६-४८

८२. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २७, अंक ११०, १९५४, पृ. ३५-३९

८३. मराठीचिये नगरी (संपादकीय)
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २७, अंक ११८, १९५४, पृ. ४०-४३

अनुक्रमणिका

८४. मराठी भाषेचा उगम
नवी वाट

८५. मराठी संत आणि महानुभाव पंथ
देशपांडे, अ. ना. (संपा.) 'डॉ. शं. दा. पेंडसे गौरव ग्रंथ अर्थात् संतसाहित्य-संस्कृति मंथन', पृ. १४४-१६५

८६. मराठी शुद्धलेखनासंबंधी काही विचार
'विविधज्ञानविस्तार' नोव्हेंबर-डिसेंबर, १९३०, पृ. १३४-१३७

८७. मराठी वाङ्मयाचा एक विशेष
'मातृभूमि' काँग्रेस सुवर्ण महोत्सव अंक, २६-१२-१९३५, पृ. ३५-३६

८८. मराठीचे माहेर
विक्रम द्विसहस्राब्दी ग्रंथ

८९. मलकापूर येथील राममंदिरातील शिलालेख
'नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल (ह्युमॉनिटीज)', खंड १५, ऑक्टोबर १९६४, पृ. १३५-१३९

९०. महात्मा ज्योतिबा फुले (हिंदी)
'राष्ट्रभारती', फरवरी १९५१, पृ. ९१-९७

९१. महानुभाव
'जीवनविकास', खंड १, अंक ८, सप्टेंबर १९५७, पृ. ३२६-३३१

९२. महानुभाव आणि महाराष्ट्र
तरुण भारत विशेषांक (१९४५), पृ. १०९-१११

९३. महानुभाव काव्यातील काही छंद
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड ९, अंक ३, ऑक्टोबर १९३६, पृ. ६३-७१

९४. महानुभाव पंथ व वाङ्मय
भिडे, गणेश रंगो व्यावहारिक ज्ञानकोश, खंड ४, पृ. १५१४-१५१८

९५. 'महानुभाव पंथ' की 'परमार्ग' (पूर्वार्ध)
'लोकशिक्षण', खंड ७, अंक ४, ऑक्टोबर १९३६, पृ. २५९-२७०

९६. 'महानुभाव पंथ' की 'परमार्ग' (उत्तरार्ध)
'लोकशिक्षण', खंड ७, अंक ५, नोव्हेंबर १९३६, पृ. ३७३-३८३

९७. 'महानुभाव पंथ' आणि 'वेदप्रामाण्य'
'वागीश्वरी', जुलै १९३३, पृ. १७५-१८१

९८. महानुभाव पंथाचे अवैदिकत्व
'नवभारत', खंड १, अंक ११, ऑगस्ट १९४८, पृ. २४-३३

९९. महानुभावीय वाङ्मयाचे संशोधन
महाराष्ट्र, नागपूर १९३५-३६ मध्ये प्रकाशित झालेली माला

१००. महानुभावीय वाङ्मयाचे संशोधन
वादाची फलश्रुति (लेखांक १) घुले, विद्याभूषण कृष्णशास्त्री, महाराष्ट्र, १९-४-१९३६

१०१. महानुभावीय वाङ्मयाचे संशोधन
वादाची फलश्रुति (लेखांक २) घुले, विद्याभूषण कृष्णशास्त्री, महाराष्ट्र, २६-४-१९३६

१०२. – प्रो. कोलते यांचे श्री. घुले यांस उत्तर (लेखांक १)
'महाराष्ट्र', १२-७-१९३६

१०३. – प्रो. कोलते यांचे श्री. घुले यांस उत्तर (लेखांक २)
'महाराष्ट्र', १९-७-१९३६
१०४. – प्रो. कोलते यांचे श्री. घुले यांस उत्तर (लेखांक ३)
'महाराष्ट्र', २६-७-१९३६
१०५. – प्रो. कोलते यांचे श्री. घुले यांस उत्तर (लेखांक ४)
'महाराष्ट्र', २-८-१९३६
१०६. – श्री. घुलशास्त्री यांचे प्रो. कोलते यांना प्रत्युत्तर (लेख १)
'महाराष्ट्र', ६-९-१९३६
१०७. – श्री. घुलशास्त्री यांचे प्रो. कोलते यांना प्रत्युत्तर (लेख २)
'महाराष्ट्र', १३-९-१९३६
१०८. – श्री. घुलशास्त्री यांचे प्रो. कोलते यांना प्रत्युत्तर (लेख ३)
'महाराष्ट्र', २०-९-१९३६
१०९. – कवीश्वर, श्री. महन्त दत्तलक्षराज, (माहूर). महानुभावी संशोधन : प्रो. कोलते यांची विधाने अग्राह्य
'महाराष्ट्र', २४-११-१९३५
११०. महानुभावीय वाङ्मयाचे संशोधन प्रो. कोलते यांचे श्री. महन्त दत्तलक्षराज यांना उत्तर
'महाराष्ट्र', १-१२-१९३५
१११. – प्रो. कोलते यांच्या आक्षेपास उत्तर
कवीश्वर महन्त दत्तलक्षराज. 'महाराष्ट्र', २६-१-१९३६
११२. – प्रो. कोलते यांचा भास्करभट्ट
साकळे, रंगनाथ केशव २-२-१९३६
११३. – श्री. साकळे यांस उत्तर
भास्कर भट्ट बोरीकर 'उदय', अमरावती, ३-३-१९३६
११४. महानुभावीय वाङ्मयाचे संशोधन भानुविजय, प्रो. कोलते व महन्त यक्षराज
प्रेषित (टोपणनांव) 'महाराष्ट्र', १६-२-१९३६
११५. – भास्करभट्ट बोरीकर आणि त्यांचे टीकाकार (लेख १)
कोलते, वि. भि., महाराष्ट्र, २३-२-१९३६
११६. – भास्करभट्ट बोरीकर आणि त्यांचे टीकाकार (लेख २)
कोलते वि. भि., महाराष्ट्र, १-३-१९३६
११७. मुक्या मनाचा मार (कविता)
'ज्योत्स्ना', खंड १, अंक ७, नोव्हेंबर १९३६, पृ. ५६
११८. रघुनाथ पंडिताचे काव्यग्रंथ
'विविधज्ञानविस्तार', खंड ६३, जानेवारी १९३२, पृ. ४१-७२
११९. रागिणीमधील कालविपर्यास
'मनोरंजन', जुलै १९३१, पृ. ४५-४९
१२०. राजनीती अमात्याची कशी ?
टिकेकर, श्रीराम रामचंद्र 'सरदेसाई स्मारक ग्रंथ', पृ. ६५-७९
१२१. राममोहन राय आणि ब्राह्म समाज
'जीवन विकास', खंड ७, अंक १, मार्च १९६३, पृ. ३३-३७

१२२. राष्ट्रकूट तृतीय गोविंदराजाचा झरिका ताम्रपट
'विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक', १९५८, पृ. ९८-११७
१२३. राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविंद यांचा नेसरी ताम्रपट
'विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक', १९५९, पृ. ४५-७३
१२४. राष्ट्रभाषेचे महाराष्ट्र भाषेवरील एक संकट
'शिलेदार', संयुक्त महाराष्ट्र मानअंक (कोल्हापूर)
१२५. रोहिणखेड
स्टडीज इन् इंडियन हिस्टरी डॉ. ए. जी. पवार फेलिसिटेशन व्हॉल्यूम,
संपादक व्ही. डी. राव, १९६८, पृ. १-१४
१२६. वाकाटकांचा हिस्से-बोराळा येथील शिलालेख
'विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक', १९६४, पृ. १३७-१५६
१२७. विदर्भातील प्राचीन कवि
'वागीश्वरी', विदर्भांक, जानेवारी १९३४, पृ. ६५८-६६८
१२८. विदर्भातील हस्तलिखिते
'उन्मेष', खंड १, अंक २, पृ. ५९-६५
१२९. शल्य (पूर्वार्ध)
महाराष्ट्र शारदा, जुलै १९३७, पृ. ५२-५४
१३०. शल्य (उत्तरार्ध)
महाराष्ट्र शारदा, ऑगस्ट २९३७, पृ. ३१-३२
१३१. शिवाजी आणि चिपळूणकर (कविता)
'लोकशिक्षण', खंड ३, १९३०, पृ. १०४
१३२. शेतकरी (कविता)
नेरुरकर, वसंत रामचंद्र व कारखानीस, दत्तप्रसन्न (संपा.) काव्यविलास, भाग १, पृ. ९६-९७
१३३. समाजपरिवर्तन आणि भाषेतील शुद्धाशुद्ध
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', ऑगस्ट १९६७, पृ. ३३
१३४. साहित्य आणि समाज
किंग एडवर्ड महाविद्यालय नियतकालिक, नोव्हेंबर १९४०
१३५. संत नामदेव
'युगवाणी', खंड ५, अंक ९, सप्टेंबर १९५०, पृ. २६९-२७९
१३६. श्री शिवाजी लोकविद्यापीठाचे सूत्रधार डॉ. पंजाबराव देशमुख
सत्यशोधक, मुंबई
१३७. श्री संत नामदेव (वरील लेखावरील टीका)
एकबोटे, प. ना. युवाणी, खंड ५, अंक १०, ऑक्टोबर १९५०, पृ. ३२९
१३८. हिस्से-बोराळा इन्क्रिप्शन ऑफ वाकाटक किंग देवसेन
डॉ. व्हि. व्हि. मिराशी फेलिसिटेशन व्हॉल्यूम, नागपूर, विदर्भ संशोधन मंडळ, १९६५,
१३९. हिंदुस्थानचे 'चतुर' महापुरुष
'बौद्धभारत', जयंति विशेषांक, १९५७
१४०. ही कोण ? (कविता)
'विविधज्ञानविस्तार' खंड ६४, १९३३, पृ. ९०

१४१. हे लेखक कुणासाठी लिहितात ?
'समाधान', ५-२-१९५०
१४२. हे सुख काय तुझ्या नगरी (कविता)
नेरुरकर, वसंत रामचंद्र व कारखानीस दत्तप्रसन्न (संपादक) काव्यविलास, भाग ३, पृ. १५५-१५६
१४३. हेमाडपंताचा हृदयद्रावक खून
महाराष्ट्र शारदा, जुलै १९३६, पृ. २०-२६
१४४. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय (लेख १)
महाराष्ट्र, १-९-१९४७
१४५. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय (लेख २)
महाराष्ट्र, ८-९-१९४७
१४६. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय (लेख ३)
महाराष्ट्र, १५-९-१९४७
१४७. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय (लेख ४)
महाराष्ट्र, २२-९-१९४७
१४८. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय (लेख ५)
महाराष्ट्र, २९-९-१९४७
१४९. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय (लेख ६)
महाराष्ट्र, ६-१०-१९४७
१५०. ज्ञानदेवीची सिद्धनाथ संहिता कालनिर्णय
हर्षे रा. ग. ज्ञानदेवी सिद्धनाथ प्रतीचा कालनिर्णय, महाराष्ट्र, १-१२-१९४७
(या संदर्भात 'रोहिणी ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर १९४८ पहावे.)

भाग तिसरा

प्रस्तावना, परीक्षणे व इतर लेखन

१५१. आष्टीकर, मधुकर
'प्रत्येकालाच जोडा चावतो' [नाटक] (प्रस्तावना), प्रकाशक - रामकृष्ण प्रकाशन, मुंबई-४
१५२. अमात्य रामचंद्रपंत
मराठेशाहीतील राजनीति आज्ञापत्र (विवेचन), नागपूर, वीणा प्रकाशन, १९४५, पृ. ८७
१५३. चौधरी, मो. सि.
जास्वंदीची फुले (प्रस्तावना), पुणे, वत्सला साहित्य प्रकाशन, १९४२, पृ. २१२
१५४. देशपांडे, ग. त्र्यं. (संपा.)
रुक्मिणी स्वयंवर
१५५. देशमुख, चिं. ग.
शामदान (प्रस्तावना), नागपूर, वीणा प्रकाशन, १९४९, पृ. ११८
१५६. नारखेडे, के.
अंजनी (समीक्षण), महाराष्ट्र साहित्य पत्रिका, खंड २७, अंक १०८, १९५३, पृ. ४६-४८

अनुक्रमणिका

१५७. निमदेव, पद्माकर
निबंधनंदिनी (पुरस्कार), पृ. ५-६

१५८. पाठक, या. मु.
शशिमोहन (ग्रंथ परीक्षण), 'विविधज्ञानविस्तार', खंड ६२, अंक १, जानेवारी १९३१, पृ. ३८

१५९. बनहट्टी श्री. ना.
आदरांजलि (प्रस्तावना), पुणे, कॉन्टिनेन्टल, पृ. १-३०

१६०. मोहरीर, भगवंत प्रल्हाद
वरेरकरांच्या कादंबऱ्या परिचय आणि परामर्ष (प्रस्तावना) पृ. १ ते ९

१६१. शहाकार, पां. ल.
राष्ट्रीय समाजक्रांतीचा १९ व्या शतकातील धाडसी प्रवर्तक - महात्मा ज्योतिबा फुले - चरित्र व कामगिरी (प्रस्तावना), नागपूर, पा. लं. शहाकार, १९४६, पृ. ७६.

१६२. हरीबास व सोंगोबास
अन्वयस्थळ (परीक्षण), 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', खंड २५, अंक १०६, १९५३, पृ. २५-३१

१६३. मराठी साहित्य महामंडळ
मराठी साहित्य संमेलन, ४७ वे अधिवेशन अध्यक्षीय भाषण. भोपाळ, मराठी साहित्य महामंडळ, १९६७, पृ. १-२०

१६४. मराठी साहित्य महामंडळ
मराठी साहित्य संमेलनाच्या भोपाळ अधिवेशनात डॉ. कोलते यांचे विचार 'दैनिक तरुण भारत', नागपूर, १४ मे १९६७

१६५. मराठी साहित्य महामंडळ
संस्कृत मराठी संबंधाबाबत डॉ. कोलते यांचे विचार (भाषणातील मराठी व्याकरणविषयक अंश), दैनिक तरुण भारत, नागपूर, मे १९६७

१६६. मराठी साहित्य महामंडळ
माडखोलकर, ग. त्र्यं. (संपा.) मराठी भाषा व तिचे व्याकरण (डॉ. कोलते यांच्या भाषणावरील अग्रलेख), दैनिक तरुण भारत, नागपूर, १६ मे, १९६७

१६७. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद अठरावे अधिवेशन, खामगाव
डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षीय भाषण, खामगाव, ता. २६-११-१९६६

भाग चौथा
व्यक्ति आणि कार्य परिचयात्मक लेख

१६८. कानिटकर, श. प्रं. (संपा.)
प्रकाशातील व्यक्ति डॉ. वि. भि. कोलते 'चित्रमयजगत्', जून १९६७, पृ. २४४

१६९. कुळकर्णी, व. दा.
भोपाळ साहित्य संमेलन (डॉ. वि. भि. कोलते यांच्या भाषणावर आधारित) 'सत्यकथा', जून १९६७, पृ. ६२-७२

१७०. केचे, मधुकर
कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते. 'मनोहर', एप्रिल १९६६, पृ. ५

१७१. कोलते, उषाताई
विष्णु भिकाजी कोलते (थोरांचा परिचय ह्या सदरात) 'युगवाणी', खंड २, अंक ६, जून १९६७, पृ. १७२-१७५

१७२. चोरघडे, वामन कृष्ण
डॉ. विष्णु भिकाजी कोलते, दैनिक महाराष्ट्र, ६-१-१९६२, पृ. २ व ३

१७३. चोरघडे, वामन कृष्ण
'देशीकार लेणे' - भोपाळ साहित्य संमेलन 'स्मरणिका', १९६७

१७४. चौहान, देवीसिंग व्यंकटसिंग
संशोधक डॉ. कोलते. मांडवी, वर्ष ६ वे, ऑगस्ट १९६८, पृ. ८ ते ११

१७५. जोशी, सु. का.
'जीवेत शरदः शतम्' (डॉ. कोलते परिचयात्मक) 'महानुभाव', जून १९६८, पृ. २३-२६

१७६. ठोकळ, ग. ल.
भाऊसाहेब कोलते. 'ललित', मे १९६७, पृ. १४

१७७. देशपांडे, वा. ना.
उत्कृष्ट संशोधक व उत्कृष्ठ प्रशासक डॉ. वि. भि. कोलते. 'महानुभाव', जून १९६८, पृ. २२

१७८. देशमुख, माधव गोपाळ
'साहित्य संचार'कर्ते डॉ. कोलते. 'वाङ्मयीन व्यक्ति' (मा. गो. देशमुख), पृ. १४५-१५७

१७९. निंभोरकर, चंद्रकांत
डॉ. भाऊसाहेब कोलते यांच्या एकसष्ठी निमित्ताने. 'महानुभाव', जून १९६८, पृ. २-४

१८०. पठाण, यू. म.
भोपाळ येथे भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते. 'प्रतिष्ठान', खंड १५, अंक ९, मे १९६७, पृ. १-२, ३८-३९

१८१. पानसे, मु. ग.
संहिता संपादन आणि डॉ. वि. भि. कोलते (ज्योतिष रत्नमालेच्या निमित्ताने) 'नवभारत', खंड १८, अंक ९, जून १९६५, पृ. ८ ते १७

१८२. मोहरीर, म. प्र.
महानुभाव वाङ्मयाचे निष्ठावंत अभ्यासक व संशोधक गुरुवर्य प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचा परिचय 'महानुभाव', दिवाळी अंक, १९६५, पृ. ५५

१८३. रायकर, ग. भा. (संपा.)
भोपाळच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते मानपत्र 'दीपलक्ष्मी', मे १९६७, पृ. १-२

१८४. वर्दे, श्रीपाद महादेव
शिशुपालवध व प्रो. कोलते 'विविधज्ञानविस्तार', खंड ६४, १९३३, पृ. १३

१८५. वऱ्हाडपांडे, वसंत
कोलते यांचा साहित्य संचार. 'युगवाणी', मे १९६७, पृ. ४०-४३

१८६. शेंडे, ना. रा.
डॉ. कोलते व महानुभाव तत्त्वज्ञान. 'पूजा', खंड १, १९४७, पृ. २१७

१८७. शिरास, प्रभाकर व राठी, गिरीश
नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांची मुलाखत, 'साधना', एप्रिल १९६६, पृ. ४

१८८. साने गुरूजी
अश्रू-सौरभ (स्व. साने गुरूजींनी डॉ. कोलते यांना लिहिलेली काही पत्रे). 'युगवाणी', खंड ५, अंक ७-८, ऑगस्ट १९५०, पृ. २५७-२६१

१८९. सिंगनूरकर, रा, वा.
विद्यारत्न डॉ. वि. भि. कोलते. 'महानुभाव', जून १९६८, पृ. ५-७

भाग पाचवा

डॉ. कोलते यांच्या ग्रंथांची परीक्षणे

१९०. उद्धवगीता परीक्षण
प्रियोळकर, अ. का., विविधज्ञानविस्तार, खंड ६८, अंक ४, पृ. ११५

१९१. उद्धवगीता परीक्षण
महाराष्ट्र, नागपूर, २४-३-१९३५

१९२. चक्रधर चरित्र परीक्षण
राष्ट्रशक्ति १-१-१९५४

१९३. चक्रधर चरित्र परीक्षण (लेख १)
हरदास, बाळशास्त्री, महाराष्ट्र, १७-१०-१९५३

१९४. चक्रधर चरित्र परीक्षण (लेख २)
हरदास, बाळशास्त्री, महाराष्ट्र, २५-१०-१९५३

१९५. चक्रधर चरित्र परीक्षण (लेख ३)
हरदास, बाळशास्त्री, महाराष्ट्र, १-११-१९५३

१९६. चक्रधर चरित्र परीक्षण परामर्ष (लेखांक १)
आराध्य महानुभाव मुरलीधरशास्त्री, महाराष्ट्र, १८-२-१९५४

१९७. चक्रधर चरित्र परीक्षण परामर्ष (लेखांक २)
आराध्य महानुभाव मुरलीधरशास्त्री, महाराष्ट्र, ४-३-१९५४

१९८. चक्रधर आणि ज्ञानदेव परीक्षण (लेखांक १)
हरदास, बाळशास्त्री, महाराष्ट्र, १८-२-१९५१

१९९. चक्रधर आणि ज्ञानदेव परीक्षण (लेखांक २)
हरदास, बाळशास्त्री, महाराष्ट्र, २५-२-१९५१

२००. भास्करभट्ट बोरीकर परीक्षण
'विविधज्ञानविस्तार', खंड ६८, अंक ४

२०१. भास्करभट्ट बोरीकर परीक्षण
'स्वच्छंद', नागपूर ७-१०-१९३५

२०२. – शिशुपालवधाच्या कालनिर्णयावद्दल अधिक घटनात्मक पुरावा (भास्करभट्ट बोरीकर परीक्षणास उत्तर)
'स्वच्छंद', नागपूर, १७-१०-१९३५

२०३. भास्करभट्ट बोरीकर (समीक्षण)
'समाजसेवक' (अग्रलेख), खामगांव, वर्ष १, अंक ४१, दिनांक २६-११-३६

२०४ – शिशुपालवध परीक्षण
महाराष्ट्र, एप्रिल १९३३
२०५. – भास्करभट्टाच्या शिशुपालवधाचा काल
महाराष्ट्र, २८-७-१९३५
२०६. – शिशुपालवधाचा काळ शक १२३० हि नव्हे
महानुभाव बाळकृष्णशास्त्री (माहूर), महाराष्ट्र १८-८-१९३५
२०७. – शिशुपालवधाचा कालनिर्णय श्री. बाळकृष्णशास्त्री यांना उत्तर
महाराष्ट्र, २५-८-१९३५
२०८. – शिशुपालवध व प्रो. वर्दे
विविधज्ञानविस्तार, खंड ६४, अंक १, पृ. १३
२०९. – कोलते यांचे अजब शोध
यशोदातनय, विविधज्ञानविस्तार, खंड ६४, अंक ५-६, मलपृष्ठ २
२१०. महानुभाव तत्त्वज्ञान परीक्षण
भाष्यकार (अ. ना. देशपांडे), भवितव्य, १-८-१९४७
२११. महानुभाव तत्त्वज्ञान परीक्षण
'जनसेवक' (अग्रलेख), जळगांव, २८-३-१९४६
२१२. महानुभाव तत्त्वज्ञान परीक्षण
लोकमान्य (संपादकीय), ९-१-१९४७
२१३. महानुभाव तत्त्वज्ञान परीक्षण
तरुण भारत (अग्रलेख), चैत्र शु. ८, शके १८६८
२१४. – हे शब्दब्रह्म अशेष महानुभाव तत्त्वज्ञानाचे दोन महाग्रंथ (लेखांक १)
समाधान, ११-१२-१९४९
२१५. – हे शब्दब्रह्म अशेष महानुभाव तत्त्वज्ञानाचे दोन महाग्रंथ (लेखांक २)
समाधान, १५-१-१९५०
२१६. महानुभावीय अध्ययनाच्या प्रगतीतील नवा टप्पा पराकाष्ठेच्या निग्रहाचा पुरस्कार करणारा महानुभावांचा आचारधर्म
भाष्यकार (अ. ना. देशपांडे), भवितव्य, २५-२-१९४९, पृ. ५
२१७. मुनि केशराज विरचित मूर्तिप्रकाश परीक्षण
साहित्य सहकार जुलै, १९६२, पृ. ९-१०
२१८. लव्हाळी काव्यसमीक्षण
काशीकर, मा. ब. किंग एडवर्ड कॉलेज वार्षिक, डिसेंबर, १९३३, पृ. ५-१२
२१९. लव्हाळी परीक्षण
जोग, रा. श्री., अर्वाचीन मराठी काव्य, पृ. २५८
२२०. लव्हाळी परीक्षण
तिवारी, दु. आ., 'कलादर्श', जळगांव, १९३३
२२१. – प्रो. कोलते यांची लव्हाळी
भवाळकर, रा. दि., 'नवजीवन', वर्ष ३, अंक १, पृ. ७५-८०
२२२. लव्हाळी आणि वऱ्हाडी बोली
मोहरीर, भ. प्र., उदय, दिवाळी अंक, ऑक्टोबर १९६०, पॅ. १३ ते १५

संकलक

१. व. वि. कुळकर्णी
सहाय्यक ग्रंथपाल, नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर
२. सु. वा. देशपांडे
तांत्रिक सहाय्यक, शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर, माजी प्रशिक्षित सहाय्यक ग्रंथपाल, नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर
३. कु. भारती पुरेकर
माजी विद्यार्थिनी, बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स, नागपूर

(डॉ. कोलते गौरवग्रंथ - संशोधनात्मक व वाङ्मयीन लेखांचा संग्रह संपादक प्रा. मधुकर आष्टीकर - डॉ. कोलते गौरव ग्रंथ समिती, अमरावती, १९६९, मूल्य २० रु.)

■ ■ ■

डॉ. वि. भि. कोलते यांची ग्रंथसंपदा : पुरवणी (सूची)
(१९६९ नंतर प्रकाशित झालेली)

संपादित

ज्ञानप्रबोध	विश्वनाथबास विरचित, प्रकाशक अ. ज. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर, १९७३, पृ. ६८ + ३०७
लीळाचरित्र	म्हाइंभट संकलित महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई, १९७८, पृ. ११५ + ९३५
पंचोपाख्यान	म.सा.सं. मंडळ, मुंबई, १९७९, पृ. ७० + २७०
आचारबंद	अ. ज. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर (बुलडाणा), १९८२, पृ. ७९ + ६०४
श्री चक्रधर दर्शन	डॉ. वि. भि. कोलते आणि इतर तीन सहकारी, १९८२, शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. १७ + ४१७
लक्षणबंद	राउळ प्रकाशन, श्रीकृष्णनगर, पैठण रोड, औरंगाबाद, १९८५, पृ. ११९+४३०

ग्रंथ

- टिळकांचे शिक्षणविषयक विचार लो. टि. स्मारक व्याख्यानमाला, ४ थे पुष्प, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; १९७२, पृ. ७५
- श्री चक्रधर शेवटचे प्रकरण ई. ओंकार नागराज महानुभाव, भुसावळ; १९८२ (द्वारा २६७२, मेथाजी प्लॉट, भुसावळ), पृ. १५४
- महानुभाव (जयकृष्णी) दर्शन [मूळ मराठी ग्रंथाचा हिंदी अनुवाद, अनुवादक रु. गो. चौधरी], म. संतराज आराध्य, मंदिर, जयकृष्णीयां, अमृतसर; १९८२, पृ. २४+४०७
- महानुभाव संशोधन - २, अरुण प्रकाशन, मलकापूर; १९८४, पृ. ८+३०४
- मराठी संतांचे सामाजिक कार्य [मूळ हिंदी ग्रंथाचा मराठी अनुवाद, अनु. सौ. सुमती रमाकांत कोलते], १९८४, यवतमाळ, पृ. ८+१६०

- महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, सा. सं. मं. महाराष्ट्र राज्य, मुंबई; १९८७, पृ. १३+४४५+ छायाचित्रे, पृ. ४७
- गिरिपर्णा चेतश्री प्रकाशन, 'मुक्ताई', धुळे रोड, अंमळनेर; १९८९, पृ. ३+१४५
- अजुनि चालतोचि वाट कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर; १९९४, पृ. १४+७०१
- प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर अमरावती विद्यापीठ, अमरावती; १९९६, पृ. ३+१९२
- इये मराठीचिये नगरी नागपूर विद्यापीठ, नागपूर .; १९९६, पृ. ७+३९८
- महात्मा रावण सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिवपेठ, पुणे ३०; २०००, पृ. १६
- मराठीच्या अस्मितेचा शोध लेखसंग्रह १९९२
- महानुभाव संशोधन-३ १९९२
- धन्यतेची थाप प्रस्तावना संग्रह १९९३
- महानुभाव संशोधन ४ १९९५
- प्राचीन साहित्याच्या अंतरंगात १९९५
- वेचलेले कवडसे १९९५

संपादित

- नरविलाप स्तोत्र मराठी टीका (भास्करभट्ट बोरीकर विरचित मूळ संस्कृत नरविलापस्तोत्र आणि त्यावरील लक्ष्मीधर सेवलीकरकृत मराठी ओवीबद्ध टीका)
- विचारबंद १९८९

■■■

लेखकांसाठी सूचना

१. लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
२. लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
३. लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
४. लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वत:जवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
५. लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.
६. लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
७. निर्णय कळविण्यासाठी स्वत:चा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.
८. नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

अनुक्रमणिका

॥ माझी 'शब्दानंद' यात्रा ॥

▸ डॉ. सत्त्वशीला सामंत

१९९५ सालीं मीं मुंबईहून पुण्याला स्थलांतर केलं. तत्पूर्वी मीं मुंबईत हातीं घेतलेलीं सर्व कामं पुरीं केलीं व मुंबईला रामराम ठोकला. पुण्याला आलें तेव्हा विरंगुळा म्हणून नवीन रोजगाराच्या शोधात होतें. तेवढ्यात एका हौशी वृद्ध गृहस्थांनी रचलेला एक छोटासा शाळकरी कोश तपासणीसाठीं माझ्या हातीं आला. तो मीं अर्थात् तपासून दिला. पण त्या कोशाची मध्यवर्ती कल्पना माझ्या डोक्यात ठाण मांडून बसली. तो कोश विषयवार आणि इंग्रजी-मराठी असा द्वैभाषिक होता. माझ्या मनाने त्या कल्पनेचा विस्तार केला आणि आपण तो कोश त्रैभाषिक व विस्तृत विषयवार करावा असं मला सुचलं. यापूर्वी कै. वि. दि. नरवणे यांचा सोळा भाषांचा 'भारतीय व्यवहार कोश' मीं पाहिला होता. मला असं वाटलं कीं, आपण भाषांची संख्या मोजकीच म्हणजे तीन ठेवावी, पण विषयसंख्या वाढवावी. मग सुचतील त्या शब्दांच्या साध्या कागद-पत्रिका बनवून मी एका खोक्यात ठेवूं लागलें. इंग्रजी हीच अग्रणी भाषा ठेवण्याचं मुख्य कारण म्हणजे इंग्रजीचा संसार फक्त सव्वीस अक्षरांत आटोपतो, शिवाय तिच्या वर्णक्रमासंबंधीं जगात कुठेंहि मतमतांतरं नाहीत. विषयसंख्या किती असावी असं मीं सुरुवातीला कांहीच ठरवलं नव्हतं, पण एखाद्या विषयातील एखाद्या इंग्रजी शब्दाचा नेमका अर्थ इंग्रजी शब्दकोशात शोधत असताना, अनेकदा त्या शब्दाच्या मागेंपुढें अन्य विषयांतले शब्द माझ्या दृष्टीस पडत व मग मी त्या शब्दांच्या मोहात पडत असें व निव्वळ ते शब्द घेतां यावेत म्हणून मी नवनवीन विषय सुरू करीत असें. असं करतां करतां, माझा कोश दिसामासांनी कसा वाढत गेला तें माझं मलाच समजलं नाही.

प्रारंभीं कथा-कादंबऱ्यांचीं भाषांतरं करताना उपयोगीं पडणारे शब्द एवढेच माझ्या डोळ्यांसमोर होते. पण हळूहळू भाषांतरांचीं अन्य व्यावहारिक क्षेत्रंहि मला खुणावूं लागलीं. पण एखाद्या विषयक्षेत्रात किती खोलवर मुसंडी मारायची तें मला ठरवावं लागलं. कोणत्याहि ज्ञानक्षेत्राचं मला सर्वांगीण व परिपूर्ण ज्ञान होणं ही अशक्यप्राय गोष्ट होती. मग माझं मलाच असं जाणवलं कीं आपण विद्वज्जन व सामान्य माणूस यांच्यांतला दुवा होऊं शकतों. एखाद्या विषयातील तज्ज्ञ व्यक्ति जेव्हा वृत्तपत्रादि प्रसारमाध्यमांतून सामान्य माणसापर्यंत पोचूं इच्छिते तेव्हा कित्येकदा तिला समर्पक प्रतिशब्द सुचत नाहीत. अशा वेळीं आपला कोश तिच्या मदतीला आला तर तिचें काम सुकर होईल अश्या कल्पनेने मी व्यावहारिक शब्द दाखल करण्यास सुरुवात केली.

आरंभीचं सर्व म्हणजे सत्तर विषयांचं प्राथमिक काम झाल्यावर, सर्वसाधारणपणें ज्या शब्दपत्रिका मीं पक्क्या केल्या त्यांचीं कार्डं करून घ्यायला सुरुवात केली. कार्डांचं काम संपल्यानंतर १५ ऑगस्ट १९९९ पासून एच्. एम्. टाईपसेटर्स

(श्री. हेमंत जोशी) यांच्याकडे अक्षरजुळणीचं काम सोपवलं. त्याच सुमारास कांही योगायोगाने 'शुभदा सारस्वत प्रकाशन'चे प्रकाशक श्री. शरद गोगटे यांची भेट झाली. ह्या प्रकल्पाविषयीं चर्चा करीत असतां, कोशाची प्रारंभिक रचना इंग्रजी-हिंदी-मराठी असल्याने, त्याच्या जोडीला हिंदी व मराठी प्रतिशब्दांच्याहि सूचना जोडाव्यात अशी त्यांनी सूचना केली. पहिल्या फटक्याला मीं ती सूचना फेटाळून लावली. हा प्रारंभिक कोश पुरा करण्याचं प्रचंड आह्वान पुढें उभं असताना, मला आणखी हें ज्यादा काम कसं झेपणार ह्या नुसत्या कल्पनेनेच मी गांगरून गेलें. पण हळूहळू अधिक विचारान्तीं श्री. गोगटयांची सूचना मला मनोमन पटली. इंग्रजीपासून सुरुवात असेल तर फक्त इंग्रजीतून हिंदीत वा मराठीत भाषांतर करण्याची सोय होईल. मात्र प्रतिशब्दांच्याहि अकारविल्हे सूच्या जोडल्या तर, इंग्रजी, हिंदी व मराठी ह्या तीनहि भाषांतून उलटसुलट भाषांतराची सोय होईल व आपल्या कोशाची उपयुक्तता वाढेल ह्या विचाराने प्रेरित होऊन मी कोशाला दुसरा भाग जोडण्याचा निर्धार केला.

पण १९९९ सालीं कोशाचा दुसरा भाग सहज सिद्ध करता येईल एवढी संगणकीय प्रगति झालेली नव्हती. किंबहुना तशी व्यवस्था करणारी व्यक्ति मला तेव्हा तरी भेटली नाही. साहजिकच, हाहि प्रवास आपल्याला हातींपायींच करावा लागणार हें नक्की होतं. तेव्हा प्रख्यात 'समाजविज्ञान कोश'कार कै. स. मा. गर्गे यांची सुकन्या कविता भालेराव माझ्या मदतीला धावून आली. मग जसजशीं पहिल्या भागाचीं मुद्रितं पक्कीं होत गेलीं तसतशीं त्यांच्या आधारें तिने हिंदी व मराठी प्रतिशब्दांचीं कार्डं (मूळ इंग्रजी शब्द व तो कोठें आला तो विभाग या तपशिलासह) तयार करण्याचं काम सुरू केलं. उद्देश हा कीं, पहिल्या भागाचं काम पुरं होईस्तोंवर दुसऱ्या भागाची पूर्वसिद्धता झालेली असेल व मग दुसऱ्या भागाची अक्षरजुळणी करण्यास सुरुवात करतां येईल. अशीं सुमारें ६०,००० हून अधिक कार्डं तिने तयार केलीं. २००४ सालीं जेव्हा १ल्या भागाचं काम पूर्ण झालं तेव्हा मात्र नव्याने अशी अक्षरजुळणी करावी न लागतां, केवळ संगणकीय तंत्रज्ञानाच्या आधारें पहिल्या भागावरून दुसरा भाग तयार करण्याची सोय उपलब्ध झाली. हा संगणक-तंत्रज्ञानातील प्रगतीचा फायदा मला मिळाला. पण मग दुसऱ्या भागाच्या कार्डांचं काम फुकट गेलं असं म्हणायचं का ? माझं उत्तर 'नाही' असं आहे. कारण मधल्या काळात कितीतरी अनुवादक जेव्हा माझ्याकडे उलट-सुलट प्रतिशब्दांची विचारणा करीत तेव्हा चटकन् कार्डं पाहून मी त्यांना प्रतिशब्द पुरवूं शकत होतें. तसंच, अनेकदा एकच प्रतिशब्द वेगवेगळ्या ठिकाणीं तत्सम पण वेगवेगळ्या संकल्पनांना दिला गेला आहे असंहि कधींकधीं माझ्या निदर्शनाला येई व मग मी ती चूक दुरुस्त करीत असें. २००४ सालीं १ ल्या भागाचं काम पुरं झालं आणि मी संगणक-तंत्रज्ञांचा शोध घेऊं लागलें. कांही योगायोगाने 'मॉड्यूलर इन्फोटेक्' ह्या कंपनीचा शोध लागला व त्या कंपनीच्या संचालिका श्रीमती मीना जोशी व त्यांचे एक वरिष्ठ अधिकारी श्री. अनंत देवकर यांनी मला दुसऱ्या भागासाठीं आवश्यक तें तंत्रज्ञान उपलब्ध करून दिलं. नंतर श्री. अनंत उर्फ रमण चितळे यांच्या 'लिपिरूपदा' संस्थेत यथावकाश माझ्या कोशाच्या २ ऱ्या भागाचं काम सिद्धीस गेलं. तेव्हा २००६ सालची अखेर झाली होती आणि माझं १९९५ ते २००६ पर्यंत १२ वर्षांचं काम तडीस गेलं आणि दि. २३ मार्च २००७ रोजीं डायमंड पब्लिशर्स, पुणें यांच्या तर्फे कोश प्रकाशित झाला.

कोशाचं नामकरण 'शब्दानंद' असं करावं असं प्रथमपासूनच मनात होतं. कारण शब्द हें माझ्या शाश्वत आनंदाचं निधान होतं आणि हा कोश तयार करीत असताना, मला खरोखरीं केव्हाहि ह्या कामाचा कंटाळा आला नाही. हें काम कधींच संपूं नये असंच मला वाटे. उलट, जसजसं हें काम संपत आलं तसतसं मला वाईट वाटूं लागलं. ही 'शब्दानंद' यात्रा करीत असताना मला विविध मनोहर क्षेत्रांतून वाटचाल करण्याची अपूर्व संधी मिळाली, कित्येकदा रूढ समजुतींना धक्के बसले व अनेक शब्दांच्या खऱ्या अर्थाचा नव्याने साक्षात्कार झाला आणि

नवसर्जनाचाहि आनंद लुटतां आला.

कोशरचनेच्या ओघात भाषेत आधींच रूढ असलेले प्रतिशब्द प्रथम शोधावे लागले. ते प्रतिशब्द कांही वेळां चुकीचे असले तरी 'शास्त्राद् रूढिर्बलीयसी' या न्यायाने स्वीकारावे लागले. पण मीं तसं सर्रास केलं नाही. अनेक महत्त्वाच्या पारिभाषिक शब्दांच्या बाबतीत चुकीने रूढ झालेले प्रतिशब्द मीं नाकारले व त्या जागीं कोशगत अर्थानुरूप नवीन प्रतिशब्द दिले. अलिकडेच vat (value added tax) या नवीन संकल्पनेला 'मूल्यवर्धित कर' असा शब्द वृत्तपत्रांनी रूढ केला असला तरी, तो तितकासा बरोबर नाही. vat = a tax on the amount by which the value of an article is increased at each stage of its production (The Concise Oxford Dictionery) हा अर्थ लक्षात घेऊन मी त्याला 'मूल्यानुवर्धी कर' (क्रमशः वाढत जाणारा) असा प्रतिशब्द सुचवला आहे. engineering याचा सर्रास रूढ असलेला प्रतिशब्द म्हणजे 'अभियांत्रिकी' परंतु bioengineering मध्ये 'अभियांत्रिकी' हा जोड शब्द बरोबर असला तरी, सर्वच ठिकाणीं तो प्रतिशब्द योग्य ठरत नाही; कारण engineering याला calculated manipulation or direction (Webster) असा एक स्वतंत्र अर्थ आहे आणि म्हणून human/social/environmental/genetic engineering अशांसारख्या संज्ञांमध्यें कधीं 'परिवर्तन', तर कधीं 'नवरचना' अशांसारखे प्रतिशब्द घ्यावे लागतात. वृत्तपत्र-जगतात stylebook याला 'शैलीपुस्तक' म्हणतात तें माझ्या मतें चुकीचं आहे. कारण 'शैली' ही बहुशः व्यक्तिगत व व्यक्तिविशिष्ट असते. या ठिकाणीं style = a convention with respect to spelling, punctuation, capitalizatic and typographic arrangement and display followed in writing and printing (Webster) हा अर्थ लक्षात घेऊन मीं त्याला '(लेखन/मुद्रण) सरणिका / प्रणालिका' असा प्रतिशब्द सुचवला आहे. enforcement (of tax) म्हणजे (कराची) 'अंमलबजावणी' नव्हे तर ती 'सक्तवसुली' (forced payment) असते. (म्हणून Directorate of Enforcement म्हणजे 'सक्तवसुली संचालनालय'.)

सुरुवातीच्या काळात मला एखादी संज्ञा ही जीवशास्त्रातली आहे अगर वनस्पतिशास्त्रातली कीं प्राणीशास्त्रातली आहे हें समजत नसे. हळूहळू माझ्या असं लक्षांत आलं कीं, 'जीवशास्त्र' ह्या विषयात 'वनस्पतिशास्त्र' व 'प्राणीशास्त्र' ह्या दोहोंचा अंतर्भाव होतो. मग मी त्याप्रमाणें संज्ञांची वर्गवारी करूं लागलें. पुढें पुढें 'मराठी विश्वकोशा'तून मला आणखी एक गोष्ट कळली कीं, वनस्पतींना व पशुपक्षी आदि प्राण्यांनाहि शास्त्रीय नांवें असतात व तीं सामान्य व्यावहारिक इंग्रजी नांवाहून वेगळीं असतात. हीं शास्त्रीय नांवें कुल (family), प्रजाति (genus), जाति (species), इ. निकषांवर आधारित असतात, तर व्यावहारिक नांवांना खास शास्त्रीय आधार नसतो, एवढेंच नव्हे तर सामान्य माणसाने केवळ बाह्य सादृश्यावरून तीं नांवें दिलेलीं असल्याने तीं कित्येकदा चुकीचीं, फसवीं व दिशाभूलकारक असूं शकतात. म्हणतात ना - 'दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं !' अशा चुकीच्या व्यावहारिक नांवांना इंग्रजीत 'misnomers' (अपसंज्ञा) असं म्हणतात. उदा. sea horse म्हणजे 'दरियाई घोड़ा' किंवा 'पाणघोडा' नसतो, तर तो 'घोडमासा' असतो व 'दरियाई किंवा पाणघोडा' म्हणजे hippopotamus असतो. Blue bull किंवा nilgai (नीलगाय) हा एक प्रकारचा antelope आहे. इंग्रजीतला silverfish आणि मराठीतला 'वनगाय' हे शब्द किड्यांचेहि निदर्शक आहेत. म्हणून दरवेळीं मला प्रत्येक संज्ञेचा कोशगत अर्थ काळजीपूर्वक तपासून घ्यावा लागला व अर्थानुसारी भाषांतर करावं लागलं. त्याचप्रमाणें, हा शब्दकोश विषयवर्गवार (classified) असल्यामुळें, आपण करावयाची वर्गवारीहि यथाशक्य शास्त्रीय आधारावर करावी असं मीं ठरवलं. उदा. - 'Jasminum' ह्या प्रजातीच्या अंतर्गत येणारीं सर्व फुलं 'jasmine' या सदराखालीं दिलीं आहेत -

jasmine
jasmine, Arabian
jasmine, downy...... इ.

परंतु कांही फुलांच्या नांवांत jasmine हा

अनुक्रमणिका

शब्द असला तरी, शास्त्रीय दृष्टया तीं फुलं Jasminum ह्या प्रजातीत मोडत नसल्याने, त्या अपसंज्ञा ठरतात व म्हणून त्या फुलांचीं नांवं स्वाभाविक वर्णक्रमानुसार दिलीं आहेत. म्हणून cape jasmine वा night jasmine या संज्ञा त्या त्या (C वा N) वर्णाखालीं दिल्या आहेत. 'जास्वंद' हें नुसतं hibiscus नसून तें Chinese hibiscus आहे, तर China rose याला 'चिनी गुलाब' आणि 'जास्वंद' असे दोन भिन्न अर्थ आहेत.

कालमानानुरूप आपल्याकडे नवनवीन शास्त्रें वा ज्ञानशाखा येतात तेव्हा त्यांसाठीं देशी शब्दावली उपलब्ध नसते. अश्या बाबतींत आपणांस नवशब्द-निर्मितीचा मार्ग चोखाळावा लागतो. 'संगणकशास्त्र' हें त्याचं ठळक उदाहरण आहे. संगणकशास्त्रावर बाजारात दररोज नवीन मराठी पुस्तकं येत असलीं तरी, त्यांचा बहुतांशाने इंग्रजी शब्दांच्या आधारेंच निर्वाह चालतो. प्रारंभींच्या काळात ही गोष्ट अपरिहार्य आहे. पण शक्य तितक्या लवकर भाषाप्रेमी ज्ञानी व्यक्तींनी नवीन देशी परिभाषा आणण्याचा प्रयत्न केला आहे. हें करताना, हे पारिभाषिक शब्द अर्थवाही पण शक्य तितके सुटसुटीत असावेत याकडेहि माझा कटाक्ष होता. मात्र नवीन शास्त्रांची कांटेकोर परिभाषा सामान्य लोकरूढ बोलीभाषेतून येणं शक्य नसल्यानं, अनेकदा संस्कृत भाषेचा आश्रय घ्यावा लागला. परंतु ही परिभाषा केवळ नवीन म्हणून प्रारंभीं अपरिचित वाटली तरी त्यामुळें बावरून जाण्याचं कारण नाही. पुष्कळदा केवळ 'अपरिचयाद् अवज्ञा' होऊनच अश्या नवीन परिभाषेला विरोध होण्याचा धोका असतो. पण शांत, समंजस व स्वीकारशील भावनेनं या परिभाषेला सामोरं गेलं पाहिजे. नवशब्दनिर्मितीच्या बाबतीत मीं दोन प्रक्रियांचा अवलंब केला. कोणत्याहि भाषेतील एखाद्या शब्दात दोन समान वर्णांची द्विरुक्ति झाली तर, उच्चारसौकर्यापोटीं त्यांपैकीं एक सवर्ण गाळला जातो. उदा. anise + seed = anis(s) eed; नककटा = नक (क) टा याला haplology किंवा 'सवर्णतरलोप' असं म्हणतात. या धर्तीवर मीं कृक + कंठ = कृ(क)कंठ; चल + लक्षक = चल(ल)क्षक, असे कांही शब्द तयार केले.

त्याचप्रमाणें कधीं कधीं दोन घटकशब्दांतून एक शब्द तयार करताना, मधलीं कांही अक्षरं गाळलीं जातात व त्यामुळें संक्षिप्त शब्द तयार होतो. त्याला syncope किंवा 'वर्णलोपसंकोच' असं म्हणतात -

उदा. - smoke + fog = smog , त्या चालीवर मीं 'संकेतस्थळ = संस्थळ, कंठ + कर्णनाल = कंकर्णनाल, संहत + मंडली = संमंडली' असे नवे प्रतिशब्द तयार केले. या प्रकारच्या शब्दसंहतींना इंग्रजीत blend (संसृष्ट शब्द) असं म्हणतात. याचं एक अत्यंत मनोरंजक उदाहरण म्हणजे liger व tigon हे शब्द. नर सिंह व वाघाची मादी यांच्या संकरातून जन्मलेला तो (lion + tiger =) liger आणि नर वाघ व सिंहाची मादी यांच्या संकरातून पैदा झालेला तो (tiger + lion =) tigon असे इंग्रजी शब्द घडलेले आहेत. मीं त्यांसाठीं अनुक्रमें (सिंह + व्याघ्र =) 'सिंघ्र' व (व्याघ्र + सिंह =) 'व्याह' असे कृत्रिम प्रतिशब्द घडवले.

कांही वेळां व्युत्पत्तीचा आधार घ्यावा लागतो. 'eosin' ह्या शब्दातील मूलघटक eos म्हणजे dawn असा इंग्रजी शब्दकोशातील अर्थ पाहिला तेव्हा मला संस्कृतमधील 'उषस्' शब्द आठवला आणि मी 'उषसिन' हा प्रतिशब्द घडवला.

१९६२ सालापासून सोपेपणाच्या नांवाखालीं महाराष्ट्र शासनानें प्रसृत केलेल्या लेखन-नियमावलीच्या मी विरोधात असून शक्य तेव्हा तेव्हा मी त्या नियमावलीचा प्रतिवाद करीत असतें हें सर्वश्रुतच आहे. सदर कोशातहि मराठी प्रतिशब्दांचं वर्णलेखन करताना मी सर्वसाधारणपणें जुनी लेखनपद्धति अवलंबिली आहे. त्यानुसार ह्रस्व-दीर्घ, सानुस्वार-निरनुस्वार, स्वरान्त-व्यंजनान्त हे भेद कायम ठेवल्यामुळें मला विपुल व सूक्ष्मभेददर्शक शब्दांचा खजिना सांपडला. उदा.

guilllemot	शरारि	: auk शरारी
tern, black-bellied	पाकोळी	: swallow पांकोळी
host	परभृत्	: parasite परभृत

त्याशिवाय, आडि (ouzel) /) आडी (robin), हाक्या (huntsman) / हांक्या (driver of animals),

हिवर (poplar)/ हिंवर (white valem bark) अश्या कितीतरी शब्दजोड्यांचीं उदाहरणे देता येतील.

संस्कृतमध्यें 'समजः' (समूह) व 'समाजः' असे दोन सदृश शब्द आहेत. 'social' या संकल्पनेतील सूक्ष्म अर्थभेद दर्शवण्यासाठीं मला 'सामजिक' व 'सामाजिक' हे दोन्ही साधित शब्द उपयोगीं पडले. 'पद' व 'पाद' हे सदृश शब्ददेखील अनुक्रमें foot व leg हा अर्थभेद दाखवूं शकले. थोडक्यात, कानामात्रेच्या फरकाने देखील आपल्याला अधिकाधिक शब्द उपलब्ध होऊं शकतात.

कोश कोणत्याहि प्रकारचा असला तरी, प्रत्येक कोशात सर्वसाधारणपणें 'कोश कसा पाहावा' यासंबंधीं प्रारंभीं सूचना दिलेल्या असतात व गंभीर वाचकाने त्या वाचून मगच कोशाचा उपयोग करावा हें अपेक्षित असतें. तरीहि शक्य तेवढ्या मर्यादेपर्यंत कोशकाराने वाचकाची गैरसोय किंवा दिशाभूल होऊं नये अशी काळजी घेतली पाहिजे. माझें कोशकार्य चालू असताना, माझ्या एका मित्राने 'तगर' या फुलासाठीं इंग्रजी शब्द कोणता असा प्रश्न विचारला. तेव्हा मीं शब्दांचीं कार्डं तपासून पाहिली असतां मला 'तगर' या शब्दाचं कार्ड सांपडलं नाही. पण मला पक्कं आठवतं होतं कीं ह्या फुलाचा उल्लेख माझ्या कोशात आहे. मग मी फुलांची संपूर्ण यादी तपासली तेवहा मला 'अनंततगर' असा शब्द सांपडला. त्यावरून मला असा बोध झाला कीं, 'तगर' हे संक्षिप्त रूप बहुसंख्य लोकांच्या परिचयाचं असल्यामुळें ते साहजिकच 'त' वर्णाखालीं हा शब्द शोधणार व तो शब्द त्यांना तेथें सांपडला नाही तर माझ्या कोशात इतरत्र त्याचा उल्लेख असूनहि माझ्या कोशाचं प्रयोजन फसणार. म्हणून अखेरीस मी '(अनंत) तगर' असं लिहून 'त' वर्णाखालीं देखील त्याची नोंद केली. ह्याप्रमाणें माझ्या जिज्ञासु मित्रपरिवाराकडून आलेल्या पृच्छांच्या अनुषंगाने व वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन मी कोशात क्रमशः सुधारणा करीत गेलें.

हिंदी व मराठी भाषांना संस्कृत शब्दांची परंपरा असल्याने, बहुतेक वेळां एकच प्रतिशब्द दोन्ही भाषांत चालूं शकतो. असं असलं तरी कांही अपवादात्मक बाबतींत खूप सावधगिरी बाळगावी लागते. 'पेशी' हा एकच शब्द मराठीत cell या अर्थाचा, तर हिंदीत muscle या अर्थाचा द्योतक आहे. 'तंत्र' हा मराठी शब्द technique या इंग्रजी शब्दाशीं निगडित असला तरी, हिंदीत त्याला 'अभिचारविद्या' किंवा 'जादूटोणा' असा अर्थ आहे. 'वहम' ह्या फारसी शब्दाचा मूलार्थ 'संशय' असा आहे. पण त्यावरून हिंदीत आलेल्या 'वहमी' या शब्दाला 'संशयखोर' असा, तर मराठीतील 'वहिमी' शब्दाला 'संशयित' असा अर्थ प्राप्त झालेला आहे.

ह्या कोशकार्याच्या ओघात इंग्रजी शब्दांचीं स्पेलिंग्ज् वा अर्थ तपासताना, कित्येक रूढ समजुतींना धक्का बसण्याचे प्रसंग आले अभयारण्यातून भ्रमंती करत असताना, लहानपणापासून fox म्हणजे 'कोल्हा' हें पाठ केलेलं समीकरण चुकल्याचं लक्षांत आलं. fox म्हणजे 'खोकड' व (golden) jackel म्हणजे 'कोल्हा' हें ज्ञान झालं तेव्हा सुरुवातीला धक्का बसला तरी, नवीन ज्ञानप्राप्तीचा आनंद झालाच. फळबागांतून हिंडताना, संत्रीं, मोसंबीं, लिंबें अशीं ओळखीचीं फळं दिसलीं. आजवर मी orange म्हणजे 'संत्रें', आणि 'lime' म्हणजे 'ईडलिंबू' असंच कांहींसं शिकलें होतें. पण कोशलेखनाच्या निमित्तानं सखोल वाचन केलं तेव्हा, संत्र्याला sour orange आणि मोसंब्याला sweet orange किंवा sweet lime म्हणतात असं निदर्शनाला आलं. त्याचप्रमाणें, 'सिताफळ/सीताफळ' म्हणजे custard apple नव्हे, तर तो custard apple चा एक प्रकार असून, त्याचं खरं व योग्य नांव sugar apple आहे असा शोध लागला.

अनेक शब्दांचे इंग्रजी शब्दकोशांतले अर्थ तपासत असतां व्युत्पत्तीच्या अंगाने मला कित्येक रंजक गोष्टी अनुभवायला मिळाल्या. इंग्रजीतले कित्येक शब्द हे हिंदी-मराठी वा संस्कृत शब्दांचेच दूरचे आप्त असल्याचं आढळलं. एक लक्षणीय बाब म्हणजे इंग्रजी शब्दांची खरी व्युत्पत्ति वा त्यांचा मूलस्त्रोत कुठलाहि असला तरी इंग्रजी कोशकारांनी तो मोकळेपणाने कबूल केला आहे. उदा. jungle हा मूळचा संस्कृत शब्द आहे, तर nocturnal व 'नक्तंचर'

हे तर सरळसरळ एकमेकांचे भाईबंदच आहेत हें उघड दिसतं.)

विश्वामित्राने आपल्या तपोबलाने प्रतिसृष्टि निर्मिली अशी पुराणकथा सांगतात. मानवनिर्मित शब्दसृष्टि हीदेखील एक प्रतिसृष्टीच आहे.

'आतां वंदूं कवेश्वर / शब्दसृष्टीचे ईश्वर' असं रामदासस्वामी म्हणतात. पण ह्या कवीश्वरांनी निर्मिलेली शब्दसृष्टि भावी पिढ्यांना पुरून उरावी म्हणून शब्दकोशाचं प्रयोजन असतं -


अपूर्वः कोऽपि कोशोऽयं विद्यते तव भारति ।
व्ययतो वृद्धिमायाति क्षयमायाति सञ्चयात् ॥

भाषिक कोशाचा लोकांनी वापर केला तर तो वृद्धिंगत होत जातो व तसा वापर केला नाही तर तो क्षय पावतो असा हा विलक्षण कोश (खजिना) आहे. अशाच एका कोशात मीं गेलीं बारा वर्षं स्वतःला गुंतवून घेतलं होतं व प्रदीर्घ काळ मी त्या 'शब्दानंदा'त डुंबत होते. पण कोशावस्था संपल्यानंतर मी बाहेर आलें तेव्हा बाह्य जगाचं भान आलं आणि डॉ. सॅम्यूएल जॉन्सन ह्या कोशपितामहाचे शब्द आठवले -

".....I am not yet so lost in lexicography as to forget that words are the daughters of the earth, and things are the sons of heaven..."

(Dictionary Preface)

■ ■ ■



।। तीन कवी : काही नोंदी, काही निरीक्षणे ।।

▸ प्रा. अजय देशपांडे

१९८० नंतर लेखन करणाऱ्या कवींपुढचे सामाजिक वास्तव १९६० नंतर लेखन करणाऱ्या पिढीपेक्षा वेगळे आहे. १९८० नंतर आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात मोठी स्थित्यंतरे घडून आली. जागतिकीकरणाचा विचार आणि भांडवलशाहीचा कहर सर्वत्र जाणवू लागला. १९६० नंतरचे गाव १९८० मध्ये पार बदलले, माध्यमसंस्कृतीचा विकास झाला पण नीतिमूल्ये हरवली, कृषिसंशोधनाने उत्पादन वाढले, कृषीक्रान्ती झाली पण भांडवलशाही धोरणांमुळे शेतकऱ्याचा कणाच मोडून पडला. कृषीसंस्कृती, शेती, गाव, गावातील गोतावळा साऱ्यांवरच मोठे गंडांतर आले. ग्रामीण अर्थव्यवस्था मृत्यूपंथाला लागली. गरिबी, कुपोषण, उपासमार, अनारोग्य, निरक्षरता, बेरोजगारी, विस्थापन-पुनर्वसन, राजकारण्यांची दंडेली, विचारवंतांचे बधीरपण, कर्जाच्या सुविधा अन् कर्जवसुलीची जीवघेणी पद्धती, पाश्चात्य हिडिस चंगळवादाने थेट गावात केलेला प्रवेश या आणि अशा कितीतरी प्रश्नांनी गावाला आणि शेतकी जीवनाला ग्रासले आहे. अशा परिस्थितीत परिवर्तनाच्या शक्यतांचा शोध घेणे, सद्यस्थितीत शेतकी जीवनाच्या पडझडीमागील कारणांचा तपास करणे, संस्कृती आणि भाषेवरील वाढत्या आक्रमणामुळे खचून न जाता प्रभावी लढा उभारण्याचा प्रयत्न करणे, आक्रमणांमागील मन आणि मेंदूचा कावा ओळखणे आणि कठोर आत्मपरीक्षण करून आत्मभान जागृत ठेवून ताठ कण्याने, लढावू बाण्याने उभे राहाणे अगदी तुरळक कवींना जमले आहे. हे सारे विस्ताराने नमूद करण्याचे कारण की समकालीन वास्तवाची गुंतागुंत समजून घेऊन नव्या आणि जीवघेण्या आव्हानांचा सामना करण्याच्या जाणिवेची बीजे अजय कांडर, केशव सखाराम देशमुख आणि प्रकाश किनगावकर या नव्या पिढीच्या कवींच्या कवितेमध्ये आढळतात. 'आवानओल' (अजय कांडर), 'पाढा' (केशव सखाराम देशमुख), गावाच्या आकाभोवती (प्रकाश किनगावकर) या तीन कवितासंग्रहातील कविता शेती, गाव आणि त्यांची संस्कृती यांच्या पुढील आव्हानांना सर्व ताकदीनिशी भिडण्याचे बळ असणाऱ्या कविता आहेत. कृषीसंस्कृती, गाव यांच्या ऱ्हासपर्वाच्या मागील कार्यकारणाचा शोध घेऊन बदलत्या वास्तवाची सारी आव्हाने पेलण्याची तयारी कमीजास्त प्रमाणात या तीन कवींची असल्याचे दिसते. या कवींचे अनुभवविश्व अस्सल आणि समृद्ध आहे. त्यामुळे उथळपण आणि बेगडीपणा त्यांच्याकडे नाही. उलट प्रामाणिक अनुभूतींची अभिव्यक्ती करण्याचा प्रांजळपणा आहे. वास्तवाचे भान असून दृश्य परिणामांमध्ये वाहवत जाणे टाळून घट्ट पाय रोवून विरोधी प्रवाहातही उभे राहण्याचा बाणा त्यांच्या अंगी आहे. म्हणूनच अनेक मर्यादा असूनही या तीन कवींच्या कवितांकडे आशावादी दृष्टीने पाहावे लागते. या तीनही कवींच्या जाणिवांचा शोध घेतला असता

काही समान घटक केन्द्रस्थानी आढळतात.

॥१॥

'आवानओल', 'पाढा' आणि 'गावाच्या आकाभोवती' या तीनही कवितासंग्रहांमधला एक समानधागा असा की तीनही कवी तुकारामांशी आपले नाते सांगतात. तुकारामांविषयी कविता लिहिणे किंवा कविकुळ तुकाराम आहे असे कवितेतून सांगणे मराठी कवितेला नवीन नाही पण या तीनही आधुनिक कवींनी तुकारामांविषयी लिहिणे याबाबत काही समान आणि प्रेरक सूत्रे आढळतात, या कवींच्या जाणिवा जरा वेगळ्या आहेत.

तुक्याचा वारस;
आता माझे धन
शब्दांचे भातन
सुखासाठी

(आवानओल, पृष्ठ ४५)

अशा शब्दात अजय कांडर तुकारामांशी नाते जोडतात. त्यामागचे संदर्भ फार वेगळे आहेत, शेतामध्ये माती उकरून मोती सापडतच नाहीत, पावसाची गाज ऐकूच येत नाही, आता तर शेतीचीच सांज डोळ्यासमोर दिसत आहे, अशा वेळी कवी तुकारामाच्या शब्दधनाशी आपले नाते जोडतो, दुष्काळाच्या वणव्यात उजळून निघणाऱ्या तुकारामाशी नाते जोडणे म्हणजे नव्या शब्दक्रान्तीसाठी उजळून निघण्याचा वसा स्वीकारणे होय.

'पाढा' मध्ये केशव सखाराम देशमुख यांच्या तुकारामांविषयीच्या दोन कविता लक्षणीय आहेत.

तुकोबा
तुझं रांगडंपण देहा लाभू दे
ऐरणीचा घाव सोसणारी तुझी अक्षरं
माझ्या जीभेवर ठेव
तुझ्या अभंगांचा पर्वती खांदा
मिळो माझ्या कुळास
अ भं ग
होऊ दे माझा स्वर, माझं व्यंजन
तुझी गाथा
गावोगावी
प्रसादासारखी वाटीन.

(गाथा, पृष्ठ ३५)

ऐरणीचा घाव सोसणारी तुकोबाची अक्षरं जीभेवर बाळगणं म्हणजे आजच्या सर्वच क्षेत्रातल्या 'मंबाजीं'विरुद्ध उघड बंड पुकारणे होय, तुकोबाच्या अभंगांचा पर्वती खांदा आपल्या कुळास लाभो असे मागणेच कवी मागतो, तुकारामांच्या परिवर्तनाच्या लढाईत साऱ्या कुळासह सहभागी होऊन तुकोबाचे शब्द गावोगावी, घराघरात, मनामनात जागे करण्याचे, अंकुरीत करण्याचे व्रत हाती घेण्यासाठी कवीचा जीव आसुसला आहे, तुकोबांच्या अभंगांचं एकेक पान देहाच्या वहीत राखून ठेवण्याची प्रतिज्ञाच कवीने केली आहे. तुकारामाच्या जीवनकार्याशी कवितेशी कवीचे आपल्या जगण्याचे कवितेचे नाते जोडणे मोठे अन्वर्थक आहे.

'गावाच्या आकाभोवती' या संग्रहात प्रारंभी शेतकऱ्यांची दुःखी अवस्था, दर दिवशी होणारी त्यांची दैना, शोषण यांचे वर्णन करणारा तुकारामांचा एक अभंग दिला आहे. या संग्रहात शेतकऱ्यांच्या दुःखाची, व्यथेची, शोषणाची जाणीव केन्द्रस्थानी असणाऱ्या कविता आहेत. शतकानुशतकापासून शेतकऱ्यांची परिस्थिती जशीच्या तशीच आहे, तिचा प्रवास व्यथेकडून व्यथेकडेच सुरू आहे; हेच वास्तव प्रकाश किनगावकरांच्या कवितेत अभिव्यक्त झाले आहे. प्रारंभी शेतकऱ्यांच्या निरंतर दैनावस्थेचे चित्रण करणारा तुकोबांचा अभंग आणि संग्रहातील कविता यांचे नाते शेतकऱ्यांच्या दुःखाशी आहे. प्रकाश किनगावकरांनी एकाच वेळी शेतकऱ्यांच्या व्यथेशी आणि तुकोबांच्या काव्यकुळाशी नाते जोडले आहे.

याठिकाणी आणखी एक निरीक्षण नोंदविले पाहिजे. ते असे की 'आवानओल'च्या प्रारंभी शेतकऱ्यांसाठी कवी मागणे मागतो -

तुझे पीकपाणी फुलावे, फळावे
मुकी होत जावी सदा वादळे
घरी 'रासदारी' भरोनी उरावी
रिते न रहावे कधीही खळे !

शेतकऱ्यांचे जीवन सुखी व्हावे यासाठी कवीचे मन आणि शब्द प्रयत्न करीत आहेत. 'गावाच्या

आकाभोवती' या संग्रहाच्या पहिल्या पानावर प्रकाश किनगावकर अर्पणपत्रिका लिहितात -

सासरचा जाच
अन् घरकामाचा काच
सहन करीत
वावरात राबणाऱ्या
माय-माऊल्यांना...

वावरात राबणाऱ्या माय-माऊल्यांच्या दु:खाशी, व्यथेशी, अश्रूंशी कवी आपले नाते जोडतो तर केशव सखाराम देशमुख यांच्या 'पाढा' मध्ये प्रारंभी महात्मा जोतीराम फुले यांचा 'सत्या'ची शिकवण देणारा अभंग दिला आहे. महात्मा फुले यांना अभिप्रेत असणाऱ्या कृषीक्रान्तीच्या विचारांशी कवी नाते जोडतो.

आज अस्मानी संकटांपेक्षा राज्यकर्त्यांच्या धोरणांनी आणि सावकारी बँकांच्या जीवघेण्या व्यवहारांनी शेतकरी पुरता नाडला गेला आहे, शेती, शेतकरी, शेतात राबणाऱ्या मायमाऊल्या आणि कृषिक्रान्तीचा विचार, परिवर्तनाचा विचार यांच्याशी या तीनही कवींचे नाते आहे, शेती आणि शेतकरी या संदर्भात परिवर्तन झाले पाहिजे, हा विचार थोड्या फार प्रमाणात तीनही कवींनी स्वीकारला आहे. केशव सखाराम देशमुख यांची कविता अनेकदा थेट लढण्याचा बाणाही स्वीकारते.

॥२॥

अजय कांडर, केशव सखाराम देशमुख आणि प्रकाश किनगावकर या तीनही कवींच्या कवितांमधून घराच्या आदिबंधाचे सुंदर आविष्कारण झाले आहे. शेत, शिवार, आंगण, आखर, गाव, परिसर, कुटुंब आदी घटकांशी घर नावाच्या आदिम संस्थेचे उत्कट नाते असते. या नात्याचे विविध भावबंध या कवींनी मनात जोपासून ठेवले आहेत.

खूप दिवस झाले शहरात
तुझ्याही मनात शीळ घालील घराची वाट
इथे प्रत्येक घराला घेरणारे रस्ते
तसा गावात घराभोवती पाण्याचा पाट

(आवानओल, पृष्ठ २२)

घराची अख्खी भोय
पोतेरं घेऊन
शेणामातीनं सारवली जाते
पहाटं सडा घालून
शेणामुताच्या मिश्रणानं
अंगण केलं जातं शुभंकर
मनानं
तनानं
भानानं
घर अव्याहत पावन झालेलं राहो
हीच असते इथला मनांमधली
उगवून आलेली प्रार्थना

(पाढा, पृष्ठ १८)

निजण्याआधी रात्री
घराचं दार-खिडकी बंद होताना
गृहीत धरलेलं असायचं
मायचं ओसरीवरील गप्पा संपविणं
बापाचं चौकातील पानपट्ट्यातून
उगीचच भटकून येणं
अन् राममंदिरातून पोथीचा अध्याय
संपताच आजीचं परतणं
पहाटे दार-खिडकी उघडायची
ऐकून सालदार गोठ्यात शेणपाणी करताना
होणारा ढोरांच्या गळ्यातील घंटानाद
अथवा आडावरील रहाटेचा आवाज

(गावाच्या आकाभोवती, पृष्ठ १२)

घर, गाव, कुटुंब आणि मन यांच्यातील भावबंध हे तीनही कवींच्या सृजनशील आत्मभानाचे सूचन करीत राहाते. घराची आदिबंधात्मक जाणीव या तीनही कवींच्या कवितांना एक मूल्यदृष्टी देणारी आहे. घराच्या स्मृती तिघांच्याही कवितेत उतरल्या आहेत. घराची शब्दातीत ओढ त्यातून व्यक्त झाली आहे. घर या संस्थेचे विघटन होऊ लागलेल्या आजच्या काळात या तीन कवींच्या कवितांमधील गृहसंवेदन लक्षणीय आहे.

॥३॥

या तीन कवींच्या कवितांमध्ये जसे गृहसंवेदनांचे

विविध पदर व्यक्त झाले आहेत. तसेच त्यांच्या स्मृतिजीवनाचे वेधक चित्रणही केले गेले आहे. शेत, गाव, घर, कुटुंब, गावातील माणसे यांच्या आठवणींमध्ये हे कवी रमतात ही स्मृतिप्रक्रिया सृजनशील आहे. गतकालातील घटना, अनुभवांचा अर्थ आणि अन्वय लावताना या कवींचे समकालाचे भान ढळत नाही उलट आजच्या चष्म्यातून ते जाणीवपूर्वक कालच्या अनुभूतींची तपासणी करतात. त्यामुळे या कवींच्या कवितांमधील स्मृतिजीवन वेधक आणि हृदयस्पर्शी झाले आहे.

जुन्या दिवसांचा वास
तू निघून गेल्यानंतर
तू माळलेल्या सुरंगीच्या फुलांसारखा दरवळतो
तेव्हा आठवतं
तांबेट पसरलेल्या मांडवाखाली रात्री
आई होऊन आजीने सांगितलेल्या
बालपणीच्या गोष्टी
तसं आठवत जातं आजीचं काहीबाही
जात्यांच्या आवाजात मिसळलेला ओव्यांचा आवाज
"उठा उठा आता
कोंबडो आरावलो
आवस गेली पाणयाक
दिवस उजाडलो
आता पहाट होते तसा जागा होतो
वीज गेलेल्या एखाद्या दिवसात
जात्यावरील ओव्यांचा आवाज कानी पडेल
याची वाट पाहातो
तर सारचं चिडीचूप....
मी उठतो.

(आवानओल, पृष्ठ ३०)

'आवानओल' मधील अनेक कवितांमध्ये कवी स्मृतिजीवनाचा वेध घेत वर्तमानकालातील घटना, प्रसंगांना अनुभवांना सामोरा जातो. 'मैत्रीण' या कवितेत मुलीला खेळवताना कवीचे आपल्या बालपणात जाणे, "बालपणी शेतावर गेलेल्या आईची वाट पाहाताना कोणीतरी सांत्वनासाठी म्हटलेलं बाळगाणं" आठवणे आणि शेवटी कालच्या मुलांपेक्षा आजच्या लहान मुलांच्या बदललेल्या भावस्थितीचा व एकूणच बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाचा कवीने बालमनाच्या साह्याने सूचक वेध घेणे मोठे 'अन्वर्थक' आहे. "आता" या कवितेची सुरुवात 'शेतातून थकून भागून आल्यावर रेडिओवरचे गाणे आई निवांतपणे ऐकायची' या आठवणीपासून होते. त्यानंतर टीव्हीवरील चॅनल्स बघत आईच्या मांडीवर झोपणाऱ्या आजच्या नव्या पिढीचा संदर्भ येतो. आजीच्या अंगाईपेक्षा तोकड्या कपड्यातल्या युवकयुवतींच्या नाचगाण्यात रमणाऱ्या अलीकडच्या बालकांच्या मानसिकतेचा वेध घेत कवी शेवटी एक भयाण वास्तव आपल्यापुढे उभे करतो -

परवा माझ्या सोळा महिन्याच्या मुलीने
वर्तमानपत्रातील अर्धनग्न बाई पाहिली
आणि ती मला आपल्या बोटाने दाखवू लागली
टी.व्ही. चा पडदा

(आवानओल, पृष्ठ ३१)

भावसमृद्ध भूतकाळ आणि कुरूप वर्तमानकाळ यांच्या संदर्भातली कवीमनातील स्पंदने अनेक ठिकाणी व्यक्त झाली आहेत. "हा गाव, ही माणसं सारं काही आपल्या जगण्याचंच एक संचित असतं' असे म्हणत 'मातीचं नातं' जोपासल्याच्या स्मृतींचा आठव आणि माणसापासून माणूसपण दूर जात असल्याच्या वर्तमानाचे दु:ख अजय कांडर यांच्या कवितेत व्यक्त झाले आहे.

केशव सखाराम देशमुख यांच्या कवितांमधील स्मृतिसंवेदन फार वेगळे आहे. गावाच्या संस्कृतीची 'थोरवी' 'पाढा' मध्ये अनेक कवितांमध्ये गायिली आहे. माणसांच्या नैतिकतेचा दर दिवशी ढासळणारा स्तर आणि अध्यात्माचाही झालेला तमाशा या संदर्भात 'प्रश्न' या कवितेत पूर्वीच्या गावातील माणुसकीच्या आठवांचे सूचन फार बोलके आहे.

परवा
गावाच्या जवळून जाताना
देवळात सुरू असणारा हरिपाठ कानावर पडला
हरिपाठाला चाल लावली होती
तु म तो ठ ह रे
प र दे सी
मी ओशाळलो, मन पुटपुटलं
आध्यात्माचाही तमाशा होऊन बसलाय !
तिकीट घेतल्यानंतर उरलेले

अनुक्रमणिका

आठाणे कंडक्टरला
मागितले तर
तो म्हणाला
पळून चाललो काय.
मुद्दा पळण्याचा नव्हता
पण यातून
मी ओळखलं
माणसाची नैतिकताही
आज आठाण्याएवढी झाली !

(पाढा, पृष्ठ ७३)

गावमातीच्या संस्कारांचा आठव कवी अनेक कवितांमध्ये करतो. "माणुसकीची शेवटची पायरी उतरून न जाणारे लोक फक्त गावातच उरले आहेत", "निर्मळ आतिथ्याची उगवून येणारी रोपं फक्त गावातच आढळतात", "जिव्हाळा सांभाळून ठेवणाऱ्या गावाचे मोल म्हणूनच प्राणापेक्षाही थोर आहे", 'गावातून बाहेर पडताना गावाविषयीच्या आठवणी प्रवासभर जिवाची तडफड अधिकच वाढवत नेतात," "सर्जनास नख लावायचं नाही ही खेड्यांच्या काळजातली प्रार्थना देवळांपेक्षा नक्कीच मोठी आहे" या आणि अशा अनेक ओळी स्मृतिसंवेदन करणाऱ्या आहेत. गाव, गावातील संस्कृती, कृषी जीवनातील बंधुत्वभावना, समूहाची सुखदुःख वाटून घेण्याची तऱ्हा, नीतिमत्ता प्राणपणाने जपण्याचा वसा आणि वारसा या साऱ्यांचा आठव 'पाढा' मध्ये केला गेला आहे. अलीकडे स्वार्थी राजकारण्यांनी सहकाराच्या प्राणतत्त्वालाच लावलेले नख आणि त्यानंतर 'सहकारातून स्वाहाकारा'चा झालेला जन्म या पार्श्वभूमीवर 'काळजामधून उगवलेल्या वाटा' या कवितेतील स्मृतिसंवेदन मोठे सूचक आहे.

पेरणीत
कोणी
अडलं
तर
बी
आणि
बैल
पुरवायला
तसंच
शेत
सगळं नांगरून
चखरून
द्यायला
गावात सगळे येतात धावून
सहकाराचा पहिला धडा गावपांढरीपर
पूर्वापार लिहून आहे कायम.

(पाढा, पृष्ठ २०)

गावाचा संस्कार आणि स्वभाव, गावाची कृषी संस्कृती आणि कष्टाची प्रकृती, माणसांची प्रामाणिकता आणि बंधुत्वभावना यांचे स्मृतिसंवेदन 'पाढा' मधील अनेक कवितांमध्ये अभिव्यक्त झाले आहे, हे स्मृतिधन कवीच्या नैतिकतेचे बळ आहे.

प्रकाश किनगावकर यांच्या कवितेततही गावाच्या आठवणींचा वावर आहे. शहरातल्या घरी मायबाप आल्यानंतर कवीचे मन गावाभोवती रूंजी घालत राहाते. 'भातकूल' या कवितेतील गावाचे स्मृतिसंवेदन वेधक आहे.

बाप गावच्या बाजारातून
आणलेल्या भातकुलाचे वाटे करतो
सर्वांना देतो
पोराचं उरलेले भातकूल
मी कागदात बांधून
दोऱ्यानं गुंडाळून
त्याच्या खिशात ठेवतो
त्यानं मनात गाव जपावं म्हणून.

गाव मनामनात जपल्या गेले पाहिजे असे वाटणे, पोराच्या मनात गाव जपल्या जावे म्हणून बापाने प्रयत्न करणे म्हणजे कृषिसंस्कृतीचे वैभव असणाऱ्या गावाचा ऱ्हास होऊ नये म्हणून प्रयत्न करणे होय. मायबाप शहरातल्या त्या घरी काही दिवसांसाठी येतात आणि सारे गाव कवीच्या मनात जागे होते, ओंजळीने पणतीची ज्योत जपावी, तसे कवी मनात गाव जपतो.

आता घरात फिरत राहावे
गावाकडची हवा
मला ऐकू येऊ लागतो
गाईचं दूध काढताना
चरूवून येणारा चूरचूर आवाज

अनुक्रमणिका

पावसाची सर येताच
ज्वारीच्या पात्यांची होणारी
पाणी पितानाची धडपड
मला दिसू लागतो
सातपुड्यावर पेटलेला वणवा
अन् गच्चीवर
पिंपळपानातून ठिबकणारं चांदणं
मायबाप कंटाळतात चार दिवसात
अन् परत जायला निघतात
लेंडी आटून गेल्यावर गावावर यावी
तशी उदासी मग कित्येक दिवस
घरात भरून राहते.

(गावाच्या आकाभोवती, पृष्ठ २६)

शेत, शिवार, रान, पिके, शेतातील माणसे, बैल, सभोवतीचा निसर्ग, गाव, गावाची संस्कृती, माय, बाप, आजी, आजीने सांगितलेल्या गोष्टी, गावातील माणसे, रायरंग यांच्या संदर्भातल्या कितीतरी आठवणींनी प्रकाश किनगावकरांची कविता गजबजलेली आहे, अनेकदा गहिवरलेलीही आहे.

शेती, गाव, घर आणि कविता यांचे नाते आदिम आहे. अजय कांडर, केशव सखाराम देशमुख, प्रकाश किनगावकर या तीनही कवींची कविता या आदिम नाट्याचा नव्याने शोध घेते. गावाचे गावपण हळूहळू लोप पावत चालल्याची खंत तीनही कवी व्यक्त करतात. गतकालीन आठवणींमध्ये रमताना गावाशी, शेताशी असणाऱ्या आठवणी त्यांना वेगळ्या करताच येत नाही. उलट गाव, शेती यांच्या आठवणी म्हणजेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीच्या आठवणी होय. त्यामुळे आत्मशोधाच्या प्रत्येक पायरीवर गाव आणि शेताच्या भूतकालीन वैभवाचे, संस्कृतीचे स्मरण अपरिहार्यपणे होते आणि हे सारे सृजनशील आत्मभानाची प्रेरक, पूरक जाणीव बनून कवितेतून प्रकट होते. अजय कांडर, केशव सखाराम देशमुख आणि प्रकाश किनगावकर या तीनही कवींच्या कवितांचे हे वैशिष्ट्य आणि वैभवही आहे.

॥४॥

या तीन कवींच्या कवितांचा विचार करताना अगदी ठळकपणे जाणवणारी एक बाब म्हणजे मायबापाविषयी कविता. तीनही कवी कवितांमधून आईबापाचे व्यक्तिचित्र 'नांगर हाकणारा बाप आणि काशा वेचणारी माय' यांच्या व्यक्तित्त्वाची अन् कर्तृत्वाची थोरवी कवी गातो. माय-बापाच्या श्रमाचे वर्णन शब्दात मावतच नाही, आईची माया तर शब्दातीत आहे.

वडील
पिकवलेल्या मालांचे भाव
बाजाऱ्यातल्या काट्यांकडं पहात रचतात
तेव्हा
त्यांचे श्रम रक्तबंबाळ होतात

(पाढा, प२ष्ठ ३३)

मायबापाचे कष्टमय जीवन 'पाढा' मध्ये अनेक ठिकाणी अभिव्यक्त झाले आहे. "माझ्या अक्षरांना आईच्या कष्टवंत हातांचं बळ" अशा शब्दात कवी मातृऋण व्यक्त करतो. 'मोतीबिंदू' या कवितेतले आईचे अस्तित्व मनाला भिडते.

प्रकाश किनगावकर यांच्या कवितेत बापाचा दरारा आणि मायची माया यांचे मिश्रण आढळते.

बापाच्या आवाजातील दहशत
आणायची वाऱ्याच्या अंगावरही काटा

(गावाच्या आकाभोवती, पृष्ठ ७)

सतत शेतात कष्ट करणाऱ्या बापाचा दरारा आणि त्याची माया प्रकाश किनगावकरांच्या अनेक कवितांमध्ये व्यक्त झाली आहे, तशी आईच्या ममतेची, वात्सल्याचीही कितीतरी रूपं त्यांच्या कवितेत साकार झाली आहे. 'बांगडी-बिल्लोर' ही आईच्या संदर्भातली कविता लक्षणिय आहे. घरकामात आणि शेतीच्या कामात सतत मग्न असणाऱ्या आईच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणाऱ्या काही कविता या संग्रहात आहेत. 'विंचू', 'विस्तू', 'चिंधी' या कविता वेधक आहेत.

ती येताना
भावंडं तिच्या कमरेला बिलगायची
तेव्हा कपाशीच्या तिसऱ्या वेच्याच्या बोंडासारखी
ती मंद हसायची

(गावाच्या आकाभोवती, पृष्ठ ३२)

अशा काही ओळींमधून कवी आईचे रूप आपल्या समोर साक्षात उभे करतो.

मराठी कवितेमध्ये मायबापाचे चित्रण अगदी प्राचीन लोकगीतांपासून आहे. मायबापाच्या चित्रणाला तत्कालीन कौटुंबिक आणि सामाजिक वास्तवाची पार्श्वभूमी अगदी लोकगीतांपासूनच लाभली आहे. शेती आणि गाव यांच्याशी ज्या कवितेचे उत्कट नाते असते, ती कविता बरेचदा घर, आई, बाप, शेतीची कामे, गावातील घटना यांच्या वर्णनात रमते. अजय कांडर, केशव सखाराम देशमुख, प्रकाश किनगावकर या तीनही कवींच्या कविता वाचल्या म्हणजे आणखी एक समान बाब आढळते ती अशी की कष्टकरी मायबापाच्या संस्कारांचा अमीट ठसा कविमनांवर आहे. या कवींच्या कवी होण्यावरही मायबापाच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि संस्काराचा मोठा प्रभाव आहे. मायबापाचे सृजनशील हात शेतीमध्ये राबतात, त्यांच्या या सृजनशीलतेचे अनुबंध या कवींच्या काव्यनिर्मितीप्रक्रियेशी जुळले आहेत. शेती म्हणजे मातीच्या सृजनशीलतेचा सोहळा, माय म्हणजे वात्सल्याच्या ममतेच्या सृजनशीलतेचा उत्कट उत्सव आणि बाप म्हणजे आभाळाची सृजनशील घनगंभीरता. माती आणि माय म्हणजे भूमी आणि स्त्री यांच्या सृजनशीलतेशी या कवींच्या प्रतिभेचे उत्कट नाते आहे, म्हणून हे तीनही कवी माय, माती, पिकं, पाणी-पाऊस, शेतीची कामे, श्रम यामध्ये कविता शोधतात.

॥५॥

ग्रामीण स्त्रियांच्या अगतिक आयुष्यांना या तीनही कवींनी कवितेमधून अभिव्यक्त केले आहे. अजय कांडर यांच्या कवितासंग्रहाचे शीर्षक 'आवानओल' असे आहे. पावसाळ्यात धानाची रोपं तयार केली जातात, या तयार रोपांची मग रोवणी केली जाते. पण रोप तयार झाल्यावर पाऊस आलाच नाही तर ओलसर जमिनीत धानाची रोवणी केली जाते, हे धानाचे पीक धड जगतही नाही आणि मरतही नाही. कोकणातील शेतांमध्ये सतत कष्ट करणाऱ्या स्त्रियांचेही ओलसर मातीत रोवणी केलेल्या धानासारखे आयुष्य आहे, त्यांना धड जगताही येत नाही, अन् मरताही येत नाही, 'आवानओल' हे कवितासंग्रहाचे शीर्षक असे अन्वर्थक आहे. अजय कांडर यांच्या अनेक कवितांमधून स्त्रियांचे दुःख पाझरत राहाते.

चालताना चालतच राहतात घेऊन लाकूडफाट्याचं आभाळ
लांबतायत सावल्या तशा धावतायत बाया;
सारा जगण्याचा काळ
जीवनाची घालमेल केव्हापास्नं;

टपटप आसू गळताना मुक्याच राहतात; मनाशीच बोलतात
घरापाशी येताच मात्र चांदण्यांचं हसू गोंदवून घेतात
(आवानओल, पृष्ठ १४)

स्त्रियांच्या अव्यक्त दुःखाचे गोंदणच अजय कांडर यांच्या कवितेच्या अंगावर आहे. परकर पोलक्यातल्या पोरींचे भावविश्व शेतशिवारातील कष्ट, दळणकांडण यातच पार उद्ध्वस्त होऊन जाते, बायाबापड्यांच्या संसाराची कहाणी तर डोईवर अख्खं ऊन सांभाळावे तशी आहे, आयुष्य अर्धपोटीच राहाण्याच नाते अन् डोळ्यातले पाणीही आटून जाते, वेदनेची गाज फक्त मैत्रिणीलाच सांगता येते, या कवितेतल्या स्त्रिया पाण्याशी बोलतात, झऱ्याशी बोलतात, सोबतिणीशी बोलतात, झाडांशी संवाद साधतात, पाणी, झरा, पाऊस, स्त्री आणि झाड या साऱ्यांच्या ठायी सृजनशक्ती आहे, एका अर्थाने सृजनशक्तीचा सृजनशक्तीशी चाललेला हा संवाद कधी आत्मसंवादाचे बळ धारण करतो, स्त्रीचे प्राक्तन दुःखाचेच आहे या गृहितकावर कविता साकार होते. "चिमण्या" ही कविता या संदर्भात लक्षणीय आहे. एकूणच 'आवानओल' मधील बहुतांश कवितांमधून परंपरेने, व्यवस्थेने, पुरुषप्रधानविचारांमुळे सामाजिक संरचनेने स्त्रियांच्या पदरात टाकलेल्या वेदनांची दुःखाची उदास विषण्ण चित्रे रेखाटली गेली आहेत.

केशव सखाराम देशमुख यांच्या कवितेत स्त्रीचे दुःख व्यक्त करताना जरा आशावादी दृष्टिकोणही व्यक्त झाला आहे.

बायांनो
कुणी कथन करून ठेवली आहेत
बांगड्यांच्या किनकिनाटांची लोकगीतं
तुळशीच्या पानांवर न थांबणारं
तुमचं दुःख
इतकं सहज कुणी लिहून ठेवलं आहे
तुमच्या
कपाळावरच्या रेघा
या रेघांची कोरीच सगळी पानं
कुणी बंद केलीत जुन्या वहीत
तुम्ही मूकपणानं नांदू लागलात
शरीरात आसवांचे तलाव राखून
तलाव तडकतील
कपाळांच्या रेघा भडकतील
बायांनो
थांबतील किनकिणाटांची लोकगीतं
तुमच्या ओठांना
लगडून येतील कविता
तुमच्या श्वासाच्या
विश्वासाच्या.

(पाढा, पृ. ७७)

'शरीरात आसवांचे तलाव राखून', 'किनकिनाटांची लोकगीत' या शब्दांमधील अन्वर्थक प्रतिमानावीन्य लक्षवेधी आहे. भावविवश सूर प्रारंभी व्यक्त करून शेवटी कवितेत आशावादाचा आश्वासक सूर व्यक्त झाला आहे.

प्रकाश किनगावकर यांच्या कवितेतली स्त्री कष्टाळू आहे, सोशीक आहे, परंपरेने तिच्याही पदरात दुःखच घातले आहे, अेनक कवितांमधल्या अनेक ओळी ग्रामीण स्त्रिया दुःखाचे वास्तव मांडणाऱ्या आहेत.

दिवाळीच्या सणात तरी पोरीनं यावं
चार दिवस सुखानं राहावं
म्हणून माय वाट पहाते
अन् निराश होऊन पुटपुटते
'बाईचा जलमच लई वाईट
तिचं जगणं
असतं रांधणीतलं हात धरणं"

(गावाच्या आकाभोवती, पृष्ठ ५२)

'रांधणीतलं हातधरणं' या प्रक्रियेतून स्त्रीजीवनाच्या अनेक संदर्भांचे सूचन केले आहे. रांधणीतल्या हातधरण्यासारखी स्त्रीची स्थिती असल्याचे "हातधरणं" या कवितेत सूचित केल्या गेले आहे, त्यातही एक माय आपल्या मुलीबद्दल प्रस्ताव करताना स्वतःशी जे पुटपुटते, त्या पुटपुटण्यात ही प्रतिमा आली आहे. पिढ्यान्‌पिढ्या स्त्रीची अवस्था 'हातधरण्या'सारखीच असल्याचे सूचित केल्यामुळे कवितेतील दुःखाचा, विषण्णतेचा स्वर आणखी तीव्र झाला आहे. 'नवस' या कवितेतही स्त्रीच्या संदर्भातला सार्वत्रिक दृष्टिकोण सांगितला आहे. मुलगा होण्यासाठी लोक नवस करतात, मुलीसाठी नाही, कवितेतला मुलीचा प्रश्न अन् बापाचे उत्तर वास्तवाचे भले मोठे प्रश्नचिन्हच आपल्या मनावर कोसळविणारे आहे.

माझ्या पोरीचा प्रश्न,
"पप्पा मुलींसाठी नवस का नसतो ?"
मी तिच्या हातातील खेळण्यातल्या
माकडासारखा थरथरत तळाशी जाऊन पोहचलेला.
आता तिला मी कसे उत्तर देऊ ?
जे सांगितलं जातं नेहमीच गावात
"बोरीबाभळी वाढतात आपसूख
आंब्याला मात्र करावं लागतं आळं
काटी लावून"

(गावाच्या आकाभोवती, पृष्ठ ११५)

मुलीनेच मुलींविषयी विचारलेल्या प्रश्नामधून स्त्रियांच्या अस्तित्वाविषयी आता स्त्रियांच्याच नव्या पिढीने जागृत होण्याची गरज सूचित झाली आहे. बोरीबाभळी जसा रस्त्याच्या, शेताच्या कडेला आपसूक वाढतात, त्यांच्याबाबत फारशी कुणाला सहानुभूतीही नसते, तसा स्त्रीचा जन्म. घरात जन्मलेल्या मुलीकडे पाहाण्याचा दृष्टिकोणही तसाच. सहानुभूती-प्रेमाचा अभाव असणारा.

अजय कांडर, केशव सखाराम देशमुख आणि प्रकाश किनगावकर या तीनही कवींच्या कवितेतील स्त्री कष्टाळू आहे, सोशिक आहे. अजय कांडर आणि प्रकाश किनगावकर स्त्रियांच्या आयुष्यातील अटळ दुःख आणि कुटुंब व समाजातील त्यांचे उपेक्षित असणारे अढळ स्थान याविषयीचा व्यथामग्न

अनुक्रमणिका

सूर व्यक्त झाला आहे. केशव सखाराम देशमुखांच्या कवितेतील स्त्री दु:खी कष्टी आहे, पण हे सारे बदलविण्याचा आशावाद त्यांच्या कवितेचा कणा आहे.

॥६॥

गाव, शेत आणि त्यासंदर्भातले वास्तव यांच्याशी या कवींच्या निर्मितिप्रक्रियेचे काही अनुबंध जुळलेले आहेत. तरीपण देशातील एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक पर्यावरणाकडे त्यांनी पाठ फिरवलेली आहे, असे मात्र मुळीच नाही. उलट समकालीन वास्तवाचा ते अतिशय सजगपणे वेध घेतात. समकालीन वास्तवाचे सारे संदर्भ काळजीपूर्वक तपासून त्याविषयीच्या प्रतिक्रियाही हे कवी व्यक्त करतात. किंबहुना सभोवतीचे एकूणच सामाजिक, राजकीय पर्यावरण त्यांना काव्यनिर्मितीसाठी प्रेरीत करते.

अलीकडे सगळयाच बाबींचे पार बाजारीकरणच झाले. सेल संस्कृती, मॉल संस्कृती जोर धरत आहे तर दुसरीकडे अहोरात्र अध्यात्माची ओरड केली जात आहे. उथळ तत्त्वज्ञान, बाजारू भोंदू साधू, धार्मिकता शिकविण्याचे सर्रास ढोंगी प्रयोग हे आणि असे सारे प्रकार सेल संस्कृतीसारखे फोफावत चालले आहेत. एका वस्तूवर दुसरी फ्री देण्यामागचे व्यवसायाचे अर्थशास्त्र धार्मिकतेच्या नावाखाली चालवलेल्या चळवळीतही वापरले जात आहे. अजय कांडर यांची कविता यावर उपरोधिकपणे भाष्य करते.

सेल लागलाय सेल
बाबांचा सेल !
बापूंचा सेल !
५० रुपये बाबा
१०० रुपये बापू
या अण्णा
या ताई
घ्या काहीही
करू नका बाई....
बाबा तुमचे बाबा आमचे
कर्ते करविते
म्हणून तर
बाबांचा सेल
बापूंचा सेल !
बापूंवर एक त्रिशूल फ्री
बाबांवर एक बाबाच फ्री !

(आवानओल, पृष्ठ ५८)

'उजळणी' या कवितेत शेवटी उजळणी वदवून घेण्याचा संदर्भ आहे. धार्मिकतेच्या नावावर माणुसकीचाच विनाश करणाऱ्या, धर्माच्या नावावर सुरू असलेल्या विध्वंसाची पार्श्वभूमी आणि त्या भरोशावर लोकशाही राज्यामध्ये मतदारांना आकर्षित करण्याचे उभारलेले प्रचारतंत्र याबाबत कवी अन्वर्थकतेने प्रतिक्रिया देतो -

म म्हणजे
    मस्जिद
प म्हणजे
    पाडणे
मं म्हणजे
    मंदिर
बा म्हणजे
    बांधणे
भ म्हणजे
    भगवा
फ म्हणजे
    फडकविणे
ध म्हणजे
    धर्म
आ म्हणजे
    आदेश !

(आवानओल, पृष्ठ ६०)

'धडधडत राहिलं हृदय उजेडाची प्रतीक्षा करत' तरीही कवीने आता जोखीमही पत्करू नये, तपासूनही घेऊ नये कुणाचाच इतिहास, भविष्य - त्यांच्यासोबत आपलंही मातीमोल होत असलं तरीही "मग काय करावे तर" गात राहावे गुणगान सर्वांचेच' अशा शब्दात 'सारीच नाती गढूळ होत चाललेल्या दिवसात' या कवितेत कवी आचारसंहिताच मांडतो.

समकाळातल्या तत्त्वशून्य राजकारण्यांच्या रणधुमाळीमुळे जे विषारी वास्तव जन्माला आले, त्यात सामान्य माणसालाच सर्वाधिक हादरे बसत आहे, म्हणून त्याने मन-मेंदू न वापरत फक्त जगावे, असा उपरोधिक भाव कवी व्यक्त करतो.

केशव सखाराम देखमुख यांची कविता बरीचशी लढावू बाण्याची आहे. सभोवतीच्या भीषण वास्तवाचे भान कवीला आहे. समकालीन वास्तव "लोक" या कवितेत शब्दांच्या कवेत घेतले आहे.

बढाईला लढाई समजून रेड्याप्रमाणं
झुंजून गहाण पडणारे लोक
पश्चातापाच्या अंधारात कुजतात

मनगटातला रॉड
गरम करून सहज
हातांचे चाकू भाले
बुबुळावरचा इस्तू
लोकांच्या अंगावर सरोप फेकावा तसा फेकतात
लोक
लोकांचे स्वभाव
अनुत्तीर्ण
लढाईत
वाटा तुडवत जाताना आपल्या सावल्या
स्वत:च्याच हातांनी कापतात लोक
घरांच्या
पोटात फॉस्फरस ठेवून
शुष्क लोकशाहीचा पांढरापिवळा अभंग घोकतात
लोक

(पाढा, पृ. ८९)

शेतकऱ्यांच्या संदर्भातले वास्तवही कवी अनेक कवितांमधून मांडतो. आश्वासनांची खैरात नित्यनेमाने होते, पण शेतकरी उपाशीच - दरिद्रीच राहातो. 'ताट' ही कविता शेतकऱ्यांची आजची व्यथा अन्वर्थकतेने मांडते.

काळजाच्या पाण्यावर
रोप वाढवून
मातीच्या वैभवात
अश्रू मिसळू न देण्याचा
सौभाग्य क्षण
अभंगपणे राखला
मातीच्यावर
हसत येणाऱ्या सर्जनाला
अंगाईनंच पाणी पाजून जपलं
पण आमची फजिती
थांबण्याची
विश्वास भाषा
ताटात वाढायला
कोणीच तयार नाही

(पाढा, पृष्ठ ३८)

केशव सखाराम देशमुख यांच्या कवितेचा स्वर अनेकदा समूहाचा स्वर असतो. सावध असण्याची, लढण्याची भाषा त्यांच्या अनेक कवितांमधून व्यक्त झाली आहे. 'ढाल' ही कविता या संदर्भात लक्षणीय आहे. 'परिस्थिती बदलतेच फक्त धीर आणि धार जपून ठेवावी लागते.' 'विजय मिळेल फक्त धैर्य आणि ढाली कुणाला दत्तक द्यायच्या नसतात' अशा ओळींमधला आश्वासक सूर कवितेच्या केन्द्रस्थानी आहे. 'शिवारभर' या कवितेतून दुष्काळ आणि तहानेचे जे वर्णन आहे, ते विलक्षण प्रभावी आणि खरे आहे. 'शिवारभर' या कवितेतून तहान आणि पाणीटंचाई-दुष्काळाचे आभाळाएवढे वास्तव सांगितले गेले आहे.

प्रकाश किनगावकरांची कविता 'गावाच्या आकाभोवती' फिरत राहाते. गतकालीन आठवणींमध्ये रमत राहाते, 'महर्षी', 'प्रवास' या सारख्या काही कवितांमधून गावाच्या बाहेरच्या वास्तवाविषयी कवी प्रतिमांच्या भाषेत अंधुकसे भाष्य करतो. गावाच्या संदर्भातली त्यांची कविता या दहा वर्षात सामाजिक, राजकीय पर्यावरणामुळे, नव्या आर्थिक धोरणांमुळे शेती संस्कृतीवर झालेल्या परिणामांपासून जरा दूरच राहाते.

॥७॥

अजय कांडर, केशव सखाराम देशमुख आणि प्रकाश किनगावकर यांच्या कवितांच्या संदर्भात आणखी काही नोंदी, काही निरीक्षणे आणि काही निष्कर्ष नोंदवावे लागतात.

या तीनही कवींचे शेती, गाव आणि त्यांची संस्कृती यांचेशी नाते आहे. तथापि शेती, गाव

अनुक्रमणिका

आणि त्यांची संस्कृती यांच्यावरील गंडातराचे भान असूनही कृषी संस्कृती आणि गाव यांचे रक्षण करण्यासाठीची लढावू वृत्ती फारशी तीनही कवींमध्ये दिसत नाही. केशव सखाराम देशमुख यांच्या कवितेत लढावू बाणा आहे, तो अनेक ठिकाणी व्यक्तही झाला आहे. किंबहुना संघर्ष आणि लढाईची जाणीवही त्यांच्या अनेक कवितांमध्ये केन्द्रस्थानी आहे.

ग्रामवास्तवाचा पोत या तीनही कवींच्या कवितांना आहे. कोकणापासून विदर्भापर्यंतच्या महाराष्ट्रात ग्रामजीवनाच्या पद्धती आणि पर्यावरणावर आधारलेली शेतीपद्धती या बाबी वगळता शेतीपुढील आणि शेतकऱ्यांपुढील प्रश्न समस्या सर्वत्र आहेतच. गाव आणि शेती यांचे ताणेबाणे शब्दांमधून व्यक्त करताना दुष्काळ, तहान, पेरणी, बैल, ढोरंवासरं, कष्टकरी माय-बाप, गावातील परिस्थिती, पाऊस, हे आणि असे कितीतरी विषय तीन कवींच्या कवितांमध्ये येतात, पण अनुभवविश्वातील वेगळे पण, अभिव्यक्तीतील वेगळेपण, जीवनविषयक दृष्टिकोण कवीच्या परिसरातील बोलीभाषेतील शब्दकळा, मुक्तछंदात असतानाही प्रत्येकाची वेगळी असणारी शैली, प्रतिमा यामुळे या तीनही कवींची कविता परस्परांपासून अगदी वेगळी अशी आहे. भिन्नभिन्न प्रादेशिक वास्तव तीनही कवींच्या वाट्याला आल्यामुळे प्रतिमानावीन्य मोठ्या प्रमाणावर तीनही कवितासंग्रहांमध्ये आढळते. अजय कांडर यांच्या कवितेत कोकणातील गावाची पार्श्वभूमी असल्याने साहजिकच कोकणची प्रादेशिक बोली आणि जगण्याचे संदर्भ अनेक ठिकाणी व्यक्त झाले आहेत. 'माणसं शोधतायत उजेडाला अजूनही गावात' अशा शब्दात गावातील व्यथा-वेदना-स्त्रियांचे दुःख आदिंच्या अंधाराचा कवी वेध घेतो; पण कवीचा आणि पर्यायाने कवितेचा सूर बहुतांश वेळा प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा राहातो; त्यातही कवितेचा स्वर हा समूहाचा स्वर, झाला तरी समूहाच्या वेदना कवितेत ओथंबल्या तरी कवितेच्या शब्दनियोजन आणि एकूणच कवितेचा बाज एकसूरीच राहातो - निवेदनासारखा एकच स्वर कवितेच्या अंतरंगातून प्रकट होत राहातो; तसेच आशयाचा विचार केला तर विषयनावीन्य आहे, आशयसूत्रे वेगळी वेगळी आहेत पण कवितेचा सूर प्रतिक्रिया व्यक्त करण्याच्या प्रकारचा अथवा निवेदनासारखाच होत गेल्याचे अनेक ठिकाणी जाणवते, कवितेत संवादात्मकता अनेकदा येते, पण नाट्यात्मकता मात्र अनेकदा हरवते, मग रूक्षता येते, जिवंतता राहात नाही. 'साक्षात' या त्रैमासिकाच्या जाने-फेब्रुवारी-मार्च २००६ च्या अंकात दिलीप धोंडगे यांनी अजय कांडर यांच्या कवितेच्या संदर्भात "ग्रामवास्तवावर तळ ठोकून असलेली ही कविता ग्रामजीवनाचे ताणेबाणे विणणारी आहे. परिणामतः ग्रामवास्तवाचा पोत या कवितेचा कॅनव्हास आहे. रानवन आणि समाज यांच्या धाग्यांनी हा पोत घडलेला आहे, त्यामुळे ही कविता रानावनाची आणि समाजाचीही कविता आहे. रानावनातील प्राकृतिक घटक हे सामाजिक संदर्भात सूचक होतात पण ही सूचकता सूचक वाक्यांसारखी ढोबळ होते. या कवितेतील स्वर हा एकस्वर आहे, तो बहुस्वर होत नाही, प्रतिमाप्रतिके ही सांकेतिकतेत हरवतात. त्यांना असांकेतिक करण्याने आणि कवितेला बहुस्वरीय करण्याने नवी कविता जन्माला आली असती. कोकणची प्रादेशिक पार्श्वभूमी, कोकणी माणसांचे जगण्याचे संदर्भ आणि कोकणची प्रादेशिक बोली हे आनुषंगिक नवेपण आहे. काव्यगत नवेपणासाठी बहुस्वरीयतेचा व्यामिश्र पोत विणणे आवश्यक असते, जिथे कुठे असा पोत विणलेला दिसतो, ती कविता नवी वाटते व जिथे असा पोत विणलेला दिसत नाही ती कविता नवी ठरत नाही." (साक्षात, जाने-फेब्रुवारी-मार्च २००६, पृष्ठ १०) मांडलेले हे मत कवितेची सामर्थ्ये आणि मर्यादा विशद करणारे आहे.

केशव सखाराम देशमुख यांची कविता कृषीसंस्कृतीवरील आक्रमणांचा शोध घेते.

शेतीचं
भाकरीचं
नवं भूकशास्त्र लिहिण्याची गरज बळावते आहे.
(पाढा, पृष्ठ २७)

अशा शब्दात कवी शेतकऱ्यांच्या संदर्भातल्या क्रान्तीची गरज बोलून दाखवतो. 'भाकर' या कवितेत समकालीन वास्तवातील ताजे संदर्भ नोंदवीत कवी भुकेची करूण भूपाळीच गातो. गावातील बोलीतील शब्द, बोलीभाषेतील प्रतिमा वापरतानाही कवी आपली

स्वतंत्र भाषा वापरतो, कविता बोलीभाषेतली कविता होता नाही. अर्थप्रसरणशील शब्द, सूचक शब्द कवी आवर्जून वापरतो, प्रमाणभाषेतल्या शहरी शब्दांचा तर कधी 'राष्ट्रीय एकात्मता', 'लोकशाही' अशा मूल्यांचा कवितेतील आशय गहिरा आणि वास्तवाला भिडणारा करण्यासाठी नेमका वापर कवी करतो. लढण्याची तयारीही अनेक कवितांमधून व्यक्त झाली आहे. गाव, शेती आणि त्यांची संस्कृती यावर येणारे गंडांतर, शेतीमालाला न मिळणारा भाव, नीतिमूल्यांचा होत चाललेला ऱ्हास, स्वार्थी राजकारण या सर्व परिस्थितीचे भान या कवीला आहे, तरीही 'पाढा' मधली कविता गाव, शेती आणि त्यांची संस्कृती यासंदर्भात एका विशिष्ट आशय परिघातच फिरत राहाते. १९८० नंतरच्या साऱ्या परिस्थितीचे भान असतानाही समकालीन ग्रामीण समस्या, गाव आणि शेती यांच्या संस्कृतीवरील आक्रमण, बदलते अर्थकारण, बोलीभाषांच्या अस्तित्वावर होणारा घाला, गेल्या २५ वर्षातल्या राजकारणाच्या सतत ढासळणाऱ्या प्रतवारीचा गावाच्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणावर झालेला परिणाम हे आणि असे बरेचसे समकालीन वास्तवाचे संदर्भ, त्यांचा गावाच्या मानसिकतेवर, संस्कृतीवर अर्थकारण, राजकारणावर झालेला परिणाम आदि अनेक विषयांचा 'पाढा' म्हटल्या गेलेला नाही, काही विषयांचे सूचन मात्र झाले आहे.

प्रकाश किनगावकर यांची कविता ग्रामीण संवेदनशीलतेची कविता आहे. कथनपरता, संवादात्मकता, सहज निवेदन आणि सोपी भाषा यामुळे ही कविता चटकन समजते, काही कविता मनाचा ताबाही घेतात, आधुनिक जीवनमूल्ये आणि कृषी जीवन यांच्यातील संवाद, विरोध, ताणतणाव या कवितेतून प्रकट झाले आहेत. आधुनिक जीवनमूल्ये, वाढते शहरीकरण, शेतीवर आणि गावांवर दर दिवशी कोसळणारी आरिष्टये, शेतकऱ्यांच्या कष्टाची परिसीमा, शेतकऱ्यांचे दारिद्य, या आणि अशा कितीतरी बाबींचे भान 'गावाच्या आकाभोवती', मधील कवितांमधून व्यक्त झाले आहे, पण समकालीन समस्यांच्या चक्रव्यूहाचा साधा उच्चारही कवी कधी करत नाही, गावाचे कालचे वैभव आणि गावाची कालची व्यथा या दोहोंचा विचार आजच्या संदर्भात करताना गाव, शेती आणि त्यांच्या संस्कृतीच्या आजच्या प्रश्नांचा मात्र कवी फारसा विचार करीत नसल्याचेच दिसते.

एखादा प्रसंग, घटना, विचार अशा एखाद्या घटकाचा कवितेसाठी उपयोग करून शेवटी काहीतरी निष्कर्ष व्यक्त करण्याचा प्रकार थोड्याफार फरकाने तीनही कवी कधीकधी करतात. या प्रकारात कधी निव्वळ निवेदनामुळे, कधी वक्तृत्वामुळे काव्यात्म लय कधी हरवते तर कधी कविता प्रभावीही बनते; हा प्रकार कधी आशयसूत्रांना तोलून धरतो तर कधी आशय पार कोलमडूनही जातो.

असे असले तरी समकालीन वास्तवाची गुंतागुंत समजून घेऊन नव्या आव्हानांचा सामना करण्याच्या जाणिवेची बीजे या तीन कवींच्या कवितांमध्ये आढळतात. या कवींच्या पुढील कवितासंग्रहांची वाट पाहू या.

■ ■ ■

- आवानओल - अजय कांडर
  शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
  प्रथमावृत्ती - १ मे २००५
  मूल्य - ७५ रुपये

- पाढा - केशव सखाराम देशमुख
  साक्षात प्रकाशन, औरंगाबाद
  प्रथमावृत्ती - ऑक्टोबर, २००६
  मूल्य - १०० रुपये

- गावाच्या आकाभोवती - प्रकाश किनगावकर
  पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
  प्रथमावृत्ती - २००६
  मूल्य - १२५ रुपये

॥ तुकडे ॥

पद्माकर पाटील

खिशात हात घालून अ ने ॲटोरिक्षा ड्रायव्हरला, त्याने सांगितले तेवढे रिक्षाभाडे काढून दिले. रिक्षातनं आपली लहानशी सूटकेस बाहेर काढली. जमिनीवर उभी ठेवली. पँटच्या मागच्या खिशातनं कंगवा काढून भांग ठीकठाक केला. अंगावरचा सफारी उगाच येथेतेथे रुमालानं झटकला. चेहरा पुसला. एव्हाना ॲटोरिक्षा वळसा घेऊन फट्फट् करीत निघून गेला होता.

अ ला हे शहर अनोळखी होतं. तो या शहरात पहिल्यांदाच आला होता. मोठ्या हिंमतीनं. तेवढ्याच आत्मविश्वासानं.

समोरचं मोठ्ठं मेनगेट बंद होतं. त्यामुळे तो त्याला लागून असलेल्या छोट्या गोल गेटमधनं मधलं फाटक मागेपुढे ढकलीत आत कॉलनीत आला.

आत सर्वत्र हिरवंकरडं खुरटं गवत नि त्यामधून जाणारे छोटे स्वच्छ डांबरी रस्ते होते. मधेमधे रस्त्यालगत कसलीशी हिरवी झाडी होती. स्टाफसाठी चार मजली इमारतींचे फ्लॅट्स दिसत होते, तर कुठे दूरवर बंगल्यांच्या तुटक ओळी-हिरव्या झाडीतून डोकावत होत्या.

संध्याकाळची वेळ असूनही झाडीतला चिमण्यांचा किलबिलाट व रस्त्यावरची दोनचार जणं सोडली तर तशी सगळीकडेच सामसूम दिसत होती. पलीकडे दूरवर हिरव्या झाडीत काहीशा उंचवट्यावर कारखान्याच्या लांबोड्या इमारती दिसत होत्या. त्याही पलीकडे मूळ उत्पादनाचा कारखाना कुठंतरी आत असावा.

अ ने क्षणभर हातातली सूटकेस जमिनीवर ठेवली. उभी. इकडेतिकडे पाहिलं. मग, कसलासा अंदाज घेत सूटकेस पुन्हा हाती घेतली. बाजूच्या रस्त्याने प्रशासकीय कार्यालय वाटणाऱ्या एका इमारतीच्या दिशेने तो निघाला. समोरून येणाऱ्या कुणा एकाशी त्याने थांबून चौकशी केली नि पुढे वळणावर वळला.

त्या लांबोड्या उंच दगडी प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीशी तो आला तेव्हा तो त्या अत्याधुनिक भव्य इमारतीने काहीसा दिपावलाच. कार्यालये या पूर्वीच सुटली असल्याने काहीशी सामसूम होती. दोनचार जणांची काय ती कॉरिडॉरमधे हालचाल दिसत होती.

इमारतीच्या पायऱ्या चढून अ वर आला. कॉरिडॉरमध्ये थांबत त्याने इकडेतिकडे दूरवर पाहिलं आणि एका खोलीच्या दरवाज्यावर वरील बाजूस आडवी टांगलेली ब च्या नावाची इंग्रजीतली पाटी पाहून त्याला हायसं वाटलं.

'साहेब आत बसले आहेत' असं त्याला बाहेर स्टूलावर बसलेल्या पांढऱ्या लुंगीतल्या शिपायानं मोडक्यातोडक्या हिंदीत सांगितलं.

ब ला त्याने कधीच पाहिलं नव्हतं. केवळ ऐकलं होतं. एकूण ऐकीव माहितीच्या आधारे त्याने ब चं व्यक्तिमत्त्व डोळ्यापुढं आणलं होतं.

क्षणभरानं अ ने पांढऱ्या लुंगीतल्या

शिपायाकरवी ब कडे आत स्वतःच्या नावाची, मराठीत भेटीसाठी चिठ्ठी पाठविली. शिपाई लुंगी सावरत चिठ्ठी घेऊन दार ढकलून आत गेला. दार आपोआप बंद झालं. मिनिटभरातच शिपाई दार उघडून बाहेर आला नि त्यास त्याने साहेबांनी आत बोलाविल्याचा मोडक्या हिंदीत निरोप दिला.

तो सूटकेससह लगबगीने दार ढकलून काहीसा धडधडत्या उरानं पण आत्मविश्वासानं आत शिरला.

ब चीफ प्रॉडक्शन इंजिनिअर होता. भल्यामोठ्या सनमायकाच्या आयताकृती सुबक टेबलाशी सफारी पोषाखात तो खुर्चीत बसला होता. गोरा. रुबाबदार. आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा ब पुढ्यातल्या पेपर्सवर वरूनखाली मूक अवलोकन करीत सह्या करीत होता. क्षणभरानं ब ने चष्म्यातून समोर उभ्या असलेल्या अ कडे पाहिलं आणि मानेनेच खूण करीत पुढ्यातल्या खुर्चीत अ ला बसायला सांगितलं.

अ ने खुर्चीला लागून हातातली सूटकेस खाली ठेवली. ब ला नमस्कारादाखल मान झुकवित मूक अभिवादन केलं, नि पुढ्यातल्या एका खुर्चीत मुकाट बसला. ब चं चष्म्यातलं मध्यम बांध्याचं उंच गोरं आकर्षक व्यक्तिमत्त्व न्याहाळीत राहिला.

"जस्ट वेट हं. थोडं पाहून घेतो हे..." ब ने चष्म्याआडून अ कडे पहात काहीसं स्मित करीत म्हटलं, आणि फिरती खुर्ची उजवीकडे फिरवीत स्वतःला फिरविलं. टेबलावरच्या लॅपटॉपचा प्रकाशमान स्क्रीन पहात की बोर्डवरती दोन्ही हातांची बोटं बटनांवर सराईतपणे दाबलीत. क्षणात स्क्रीनवर कसलासा चार्ट उमटला. मग, ब ने पुन्हा की बोर्डची बटणं दाबलीत. स्क्रीन काळजीपूर्वक न्याहाळला.

त्या वातानुकूलित खोलीच्या नीरव शांततेत ट्यूबलाईटच्या मंद प्रकाशात ब चा की बोर्डवर दाबल्या जाणाऱ्या बटणांचाच केवळ आवाज अधनंमधनं होत राहिला.

ब ने पुन्हा स्वतःची खुर्ची डावीकडून समोर फिरविली. समाधानाचा सुस्कारा सोडीत काहीसं स्मित करीत अ कडे पहात चष्मा सावरला. उजव्या हातानं लॅपटॉपवर बोटं फिरवीत लॅपटॉप बंद केला.

ब खुर्चीत मागे रेलला. "सो यू आर ! तुम्हाला कधी पाहिलं नव्हतं. केवळ ऐकून होतो आजवर." मग, क्षणभर थांबत पुढे बोलला. "खूप उत्सुकता होती तुम्हाला भेटायची. चला. तुम्हीच आलात. ग्लॅड टू मीट यू !"

बऱ्याच दिवसात या कानडी मुलुखात, कार्यालयात मराठी ऐकल्याने अ सुखावला.

"प्रथमतः तर मी चिठ्ठीतलं नांव वाचून चमकलोच. मला अनपेक्षित धक्का होता तो. ते तुम्हीच असल्याची खात्रीच पटली."

अ ला ब त्याच्याकडे जाणीवपूर्वक रोखून पहातोय असं वाटलं. ब च्या बोलण्याने तो काहीसा अचंबलाही. पण त्याने ते चेहऱ्यावर येऊ दिलं नाही.

"हो. जवळजवळ तीस वर्षे उलटलीत. मलाही तुम्हा सर्वांना एकदा भेटावं असं मनोमन वाटत होतं. आलो." अ ने म्हटलं.

"क्वॉर्टरला घरी जाऊन आलात का ?"

"नाही. आत्ताच येतोय. म्हटलं आधी ऑफीसला तुम्हांला भेटावं." खरं म्हणजे अ ला आधी ब च्या क्वॉर्टरला जाऊन आदितीला भेटायचं होतं, पण उगाच शंका नको म्हणून तो आधी इकडे वळला होता.

ब ने डावं मनगट डोळ्यांपुढे धरलं. घड्याळात पहात म्हटलं. "बरं झालं तुम्ही गेला नाहीत घरी. दाराला कुलूप असेल. दिप्ती येईलच इतक्यात...काय घेणार ? चहा कॉफी की, कोल्ड्रिंक ?" ब टेबल आवरीत राहिला.

"नो. थँक्स्. थंड पाणी मिळालं तर छान वाटेल."

"ओ के" म्हणत ब खुर्चीतनं चष्मा सावरत उठला. खोलीतच त्याच्या बाजूस असलेल्या लहानशा फ्रीझचं दार उघडून त्यानं थंड पाण्याची एक बाटली बाहेर काढली. टेबलावरच्या दोन रिकाम्या ग्लासात पाणी ओतलं. एक ग्लास अ कडे सरकविला.

"घाई नाही ना परतायची ?" ब ने खुर्चीत बसत पाणी घेत अ ला विचारलं.

"नो. तशी घाई नाही तेवढी."

"म्हंजे - आज मुक्काम -"

"नाही. रात्रीच परतायचं आहे. एकला ट्रेन आहे बंगलोरला. तेथून सरळ आसामात गोहत्ती.

बाय एअर.

"गोहत्ती ?"

"हो. ऑफिशियल टूर होता इकडे. योगायोगानं कालच कळलं मला की, तुम्ही या शहरात राहता. या फॅक्टरीत काम करता. म्हटलं आलो आहोत तर चला - भेटून येऊ. झाली भेट तर बरेच."

"इतक्या वर्षानंतर - तुम्हाला कसा कळला पत्ता ?"

"योगायोग म्हणा हवं तर. काल हॉटेलात बंगलोरला - रूममध्ये बेडवर पडल्यापडल्या सहजच टाईम्स् चाळताना कोपऱ्यातल्या एका बातमीनं माझं लक्ष वेधून घेतलं....

"कसली बातमी ?"

"ती बातमी एका झालेल्या सेमिनारची होती. त्यात तुमच्या नावाचा - तुम्ही वाचलेल्या पेपरचा गौरवपूर्ण उल्लेख होता. तुम्ही कोठे काम करता तेही त्यात नमूद केलेलं होतं. तुमचं कार्यक्षेत्र नि संशोधनवृत्ती मला माहीत असल्याने ते तुम्हीच असावे अशी मनाची पक्की खात्रीच झाली नि सकाळलाच निघालो."

"राईट. आमच्या सर्व ब्रँचेस्च्या प्रॉडक्शन इंजिनिअर्सचा तो सेमिनार होता. गेल्या हप्त्यातच झाला तो बंगलोरात."

ब हसत मोकळा होत गेला. खुर्चीच्या पाठीवर रेलला.

"म्हटलं - पत्ता कळल्यावर न जाणं बरं नाही. शिवाय जवळच आहे हे शहर बंगलोरपासून. म्हणून आज सकाळीच जेवण उरकून निघालो.

"बरं केलंत. आनंद झाला तुम्हांला भेटून."

दोघंही खुर्चीतनं उठले.

एव्हाना अ च्या मनावरचं ब चं अदृश्य दडपण विरलं होतं.

"आलाच आहात तर आमची फॅक्टरी पाहून जा. नाहीतरी दिप्ती अजून घरी यायची असेल. तोवर फेरफटका मारून येऊ."

ब ने पुढ्यातले पेपर्स बाजूस सारले. लॅपटॉप बॅगेत टाकला. ब च्या सूचनेनुसार अ ने सूटकेस तेथेच ठेवली नि ती दोघं दार उघडून खोलीबाहेर आली. ब चा ड्रायव्हर पांढऱ्या लुंगीची खालची टोकं कमरेत खोचत गाडीशी उभा झाला. ब ने त्याच्याकडून कारची चाबी मागून घेऊन त्यास सुटी दिली. दोघांच्या कानडीतल्या संभाषणाची अ ला क्षणभर गंमत वाटली.

मग, ब ने स्वतः कार ड्राईव्ह करीत अ ला झाडीतला संपूर्ण कारखाना दाखवून आणला. प्रशासकीय कार्यालये, कारखान्यातल्या मशिनी, प्रॉडक्टस् - म्हणजे ट्रॅक्टर्सचे विविध पार्टस्, बांधून तयार झालेली ट्रॅक्टर्स, डिलीव्हरी सेक्शन, इत्यादी...

"खूप मोठा व्याप दिसतोय तुमच्या कंपनीचा" अ बोलला.

"हो. आता नवीन सुधारित सुपर ट्रॅक्टर्स लॉंच करतोय आम्ही. पुढल्या महिन्यात. त्यात नवीन अत्याधुनिक टेक्नॉलॉजी यूज केलीय." ब बोलला.

प्रॉडक्शन, मार्केट, उद्योगधंद्यातल्या स्पर्धा आदि विषयावर गप्पा करीत ती दोघं पुन्हा ब च्या कार्यालयापाशी आली. ब ने कार शेडमध्ये पार्क करून लॉक केली.

"जवळच क्वॉर्टर आहे. पायी जाऊ या." ब ने म्हटलं.

अ ने सूटकेस हाती घेतली व ती दोघं पायी ब च्या क्वॉर्टरकडे - बंगलीकडे सडकेने निघाली.

"सद्या सुभाष काय करतोय तुमचा शालक." थोड्या वेळानं अ ने त्याचा मित्र नि ब चा सख्खा शालक असलेल्या सुभाषबद्दल विचारलं.

"तो अमेरिकेत असतो. न्यूयार्कला."

ब च्या उत्तरानं अ अचंभित झाला.

"न्यूयार्क ?"

"एस. एज्युकेशन पूर्ण होताच त्याला एका फॉरेन कंपनीची सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून ऑफर मिळाली. गेला न्यूयार्कला. लकी मॅन !"

"बायको-पोरं असतील ?"

"अर्थात. तीही अमेरिकेतच. त्याच्याजवळ."

"आणि नाना, मावशी ?" सुभाषच्या आईवडिलांसंबंधी म्हणजेच ब च्या सासूसासऱ्यासंबंधी अ ने पृच्छा केली.

"तीही सुभाषसोबतच असतात.

"सुभाष तिकडेच स्थायिक होतो की काय ?" अ बोलला.

थोडं पुढे चालल्यावर अ नेच बोलणं काढलं.

"धुळ्यात आमची घरं समोरासमोर होती. नानांचं भाड्याचं घर होतं नि आमचं स्वतःचं. त्यातूनच दोन्ही कुटुंबियांत ओळख, स्नेह निर्माण झाला."

"माहीत आहे सर्व मला." ब ने अ ला मधेच थांबविलं. तसा अ गप्प झाला.

आपलं बोलणं ब ला रुचलं नाही याची काहीशी जाणीव अ ला झाली. मग, काहीवेळ कुणीच काही बोललं नाही. ती दोघं पुढे नुस्ती चालत राहिली.

अ आदितीला भेटायला उत्सुक होता. पण, ती उत्सुकता बोलण्यात तसेच चेहऱ्यावर येऊ न देण्याची अ जाणीवपूर्वक खबरदारी घेत होता.

ब नि अदितीचं लग्न होऊन जवळपास वीसबावीस वर्षे झाली होती. त्यापूर्वी अ ने आदितीला पाहिले होते. धुळ्याला. लग्नानंतर मात्र तो जाणीवपूर्वक आदितीपासूनच नव्हे तर संपूर्ण चौधरी कुटुंबियांपासून दूर-अलिप्त राहिला होता. त्याने स्वतःची नागपूरला बदली करून घेतली होती.

बंगलीचं फाटक उघडून दोघंही आत आली तसा व्हरांड्यात बसलेला ब चा धिप्पाड तगडा कुत्रा चट्दिशी उठून शेपूट हलवित त्याच्याकडे झेपावला. त्याच्या पायाशी घोटाळत लाडावू लागला. अ ला पहाताच त्याचेवर भुंकला. ब ने त्याला चुचकारत चूप केलं. कुत्र्याचं नाव टॉमी असल्याचं अ ला त्यातून कळलं.

बंगलीच्या पुढे लहानशी बाग होती. बागेत अनेक फुलझाडं होती. कोपऱ्यात हिरव्या मऊ गवताळ वाफ्यात स्टँडवर झुला टांगलेला होता.

पायऱ्या चढून दोघं वर आलीत. ब ने चष्मा सावरीत दारावरचं बेलचं बटन दाबलं. त्याक्षणी अ ला आपलं हृदयच दाबल्यासारखं वाटलं. त्याच्या उराची धडधड वाढली. आता आदिती दार उघडेल व अकस्मात आपल्याला इतक्या वर्षांनी पाहून तिला काय वाटेल ? ती काय म्हणेल ? आपल्याला ओळखेल का ? आदि नाना शंकांचं काहूर त्याच्या मनात उठलं. तो काहीसा भितीयुक्त उत्सुकतेने थरथरून निघाला.

आणि - दार उघडताच अ पाहतच राहिला. दारात वीसएक वर्षाची मुलगी होती. गोरी, उंच, मध्यम बांध्याची, मानेपर्यंत काळेभोर चमकदार केस रुळणारे. निळी जीन-कुर्ता परिधान केलेली. लोभस. आकर्षक.

अ ने तर्क केला की, ही ब नि आदितीची मुलगी असावी.

पूर्ण दार उघडताच दोघं आत आलीत. बूटसॉक्स दाराशी काढून अ हॉलमध्ये आला. बाजूस भिंतीशी त्याने सूटकेस टेकविली.

"बेटा - हे तुझे अंकल-मामा-काहीही म्हण. ओळखीचे आहेत. आसामात गोहत्तीत राहतात."

"ओऽयाऽ. एकदम आसाम-गोहत्ती ?"

"हो. गोहत्ती."

"वेलकम अंकल. पहिल्यांदाच आलेले दिसता आमच्याकडे. हो ना ?"

"हो." अ बोलला. इतकी वर्षे कर्नाटकात राहून ही मंडळी घरी मराठी बोलतात हे पाहून अ ला काहीसं आश्चर्य वाटलं.

"आणि-ही-आमची मुलगी बरं का - दिप्ती." ब अ कडे पहात बोलला.

"ओळखलं. तुमचीच चेहरेपट्टी उचललीय वाकी हिने. सध्या काय करतेस - शिक्षण ?"

"बी.ई. कॉम्प्युटर."

"गुड ! म्हणजे तूही इंजिनिअर होऊन सुभाषमामासारखी अमेरिकेत जाणार की काय ?"

"नो सर ! ते फॉरेनबिरेन नकोच. आपला देशच बरा."

तिघेही हंसले. अ जवळच्या सोफ्यात टेकला.

"मी वॉश घेऊन येतो. तुम्हीही फ्रेश व्हा." ब बाथरूमकडे वळला. वळताना त्याने दिप्तीला आवाज देऊन अ ला चहापाण्यासंबंधी विचारणा करण्याचं सूचित केलं.

आदिती किचनमधे काही करीत असावी. कदाचित तीच पाण्याचा ग्लास घेऊन येईल असं अ ला वाटलं नि तो सावरून बसला. त्याची उत्सुकता शिगेला पोहोचली.

तीसएक वर्षापूर्वीची आदिती नि आजची आदिती कशी असेल या विचारात असतानाच दुसऱ्याच क्षणी दिप्तीने पाण्याचा ग्लास आणून टीपॉयवर ठेवला तसा तो निराशला. पण, चेहरा

त्याने प्रसन्न ठेवला.

"अंकल, तुम्हीही वॉश घ्या. बऱ्याच दुरून आलात. फ्रेश वाटेल." दिप्ती बोलली नि आत किचनकडे वळली. त्याला तिची आई आदितीबद्दल विचारावं असं उत्कटतेनं वाटलं. पण, तो मोह त्याने आवरला.

अ ने पुढ्यातला ग्लास तोंडास लावून गटागटा पाणी पोटात ढकललं. रिकामा ग्लास टिपॉयवर ठेवीत त्यानं रूमालानं ओठ पुसले.

ब वॉश घेऊन लुंगी-कुर्त्यात हॉलमधे आला. आता तो अधिक फ्रेश दिसत होता. चष्मा सावरीत ब सोफ्यात रेलला.

"दिप्ती शिवाय इतर -" अ बोलला

"नो. नाही. दिप्ती ही आमची एकच मुलगी." ब बोलला. त्याने अ लाही वॉश घेण्यासंबंधी सांगत बाजूस पडलेलं वृत्तपत्र चाळायला हाताशी घेतलं.

अ उठला. त्याने बाजूची त्याची सूटकेस उचलून टेबलावर ठेवली. उघडली. आतला कुर्ता-पायजमा काढला नि टॉवेल घेऊन तो बाजूला असलेल्या बाथरूमकडे वळला. वळताना त्याने चोरून आतल्या रूम्स्-किचनकडे नजर फिरवीत आदितीचा कानोसा घेण्याचा प्रयत्न केला. पण, त्याला दिप्तीशिवाय इतर कुणी तिथे असेल असं जाणवलं नाही.

एव्हाना ब ने घरातल्या पीसीवर गुलाम अलीची कॅसेट लावली होती. त्याच्या दर्दभऱ्या सुरातल्या गझलचे स्वर भोवती रेंगाळू लागले होते.

चुपके चुपके रातदिन आँसू बहाना याद है....

कुर्ता-पायजमा घालून अ फ्रेश होऊन हॉलमधे आला. सोफ्यात टेकला. आदिती घरात असण्या-नसण्यासंबंधी तो बराच वेळ तर्कवितर्क करीत राहिला. ती घरात आहे की बाहेर ? की, बाहेरगावी ? त्याला अजूनही अंदाज येईना. बरे, सरळसरळ विचारण्याचं त्याला धाडसंही होईना.

ब डोळे बंद करून गझल ऐकण्यात मग्न होता. मधेच डोळे किलकिले करीत त्याने अ ला म्हटलं, "गझल गावी ती गुलाम अलीनेच ! काय दर्द आहे त्याच्या आवाजात. वा ! सरळ काळजाचा ठाव घेतो." ब गहिवरल्यासारखा झाला.

"मलाही आवडतो गुलाम अली."

"कुणी काही म्हणो. आपण मात्र गझलचे दिवाणे आहोत." मग ब अ कडे वळून म्हणाला,

"अहो, गझलचं खूप कलेक्शन आहे माझ्याकडे. सगळ्या गायकांच्या सीडीज् आहेत. हिंदी, मराठी अगदी कानडीतल्याही !"

"हीच राहू, द्या." अ बोलला. पुढे मात्र त्याला ब शी काय बोलावं कळेना. आण उगीच येथे आलो असंही त्याला वाटून गेलं. मग तो नुस्ता, हॉल न्याहाळीत मूक बसून राहिला.

समोरची काचेची शोकेस नि त्यात सुबकरित्या मांडून ठेवलेली प्लॅस्टिकची खेळणी. रंगीबेरंगी बाहुल्या. भिंतीवरचं मॉर्डन आर्टचं पेंटींग. बाजूस आकर्षक वॉलक्लॉक. कोपऱ्यात ठेवलेला रंगीत टीव्ही. खालच्या खात्यात डीव्हीडी. सीडीज्. बाजूस कोपऱ्यात सोफ्यालगत मोठ्या स्टँडचा नाईट लँप. छोट्या स्टुलावर टेलिफोन. कांचेरी कपाटं - त्यात मांडलेली विविध पुस्तकं - फाईल्स्. कोपऱ्यात टीएफटी कॉम्प्युटर. सारंच कसं सुबक आकर्षकरित्या मांडून ठेवलेलं होतं.

सीडी संपली तसा ब भानावर आला. "सॉरी हं. माझं हे असंच. भान रहात नाही." अ चटकन पीसीजवळ गेला नि त्यानं कॉम्प्युटर बंद केला.

क्षणभर दोघंही काही बोलले नाहीत.

"हो ! तर काय सांगत होतो ? तशी आमच्याकडची सारी तुमचं नावं काढायची कधीकधी. पण, तुमच्याकडं येणं जमलं नाही एवढं मात्र खास." ब ने सोफ्यात रेलत म्हटलं.

"म्हंजे, त्याचं काय झालं साहेब, मी क्लार्क म्हणून काम करीत असताना माझं अपूर्ण राहिलेलं इंजिनिअरिंग मी पूर्ण केलं. इंटरनेटवरती एका ऑईल कंपनीचा ऑनलाईन इंटरव्ह्यू दिला नि लगेच जॉब मिळाला. मग, नागपूरची क्लर्कची नोकरी सोडून सरळ आसामात. गोहत्ती. केमिकल इंजिनिअर म्हणून पन्नास हजार माहवारीने जॉईन झालो. त्यामुळे - धुळ्यात पुन्हां येणं फारसं झालं नाही. जवळजवळ नाहीच !"

"कां ? धुळ्याला कुणी नाही ?"

"नाही. धाकट्याला कोल्हापुरात नोकरी

मिळाली. आईवडील वृद्धावस्थेमुळे त्याच्याकडेच राहतात. धुळ्यातलं घर बऱ्याच वर्षापूर्वी विकलं. अ उत्तरला.

ट्रेमध्ये पोह्याच्या डिशेस घेऊन दिप्ती आली, तेव्हा त्याची खात्रीच झाली कीं, घरात आदिती नाही. मग, ती कुठे बाहेर-बाहेरगांवी तर गेलेली नाही ना ?

'अग, आई कुठाय तुझी ? तूच करतेस की, काय सगळं ?" हिंमत एकवटून अ ने दिप्तीला अखेर जाणीवपूर्वक विचारलंच.

"ती गावी गेलीय. आजीला बरं नाही. म्हणजे आईच्या आईला. दहापंध्रा दिवस राहणार आहे ती तिथे. परवाच तर आम्ही आलो तिथनं. पप्पा नि मी."

"अच्छा. म्हंजे आईशी भेट आता अशक्य म्हणायची." अ निराशा लपवित उसनं हसत सहजतेने बोलला.

"पुन्हा या अंकल कधीतरी."

"अग, एवढ्या दुरून ? त्यात ऑफीस, कामं. सारं बघावं लागतं. पाहू कधीतरी.

"तुमच्या सोईनं या. ऑंटीलाही आणा हं सोबत. एअरने तर यायचं." दिप्ती किचनमध्ये गेली.

मग, क्षणभरानं ब ने अ ला हळू आवाजात म्हटं, "या. पण, जरा लवकर. कारण माझी बदली आता चेन्नईला झालीय्. केव्हा रिलिव्ह करतील सांगता येत नाही." पोहे खात अ ने ब कडे चष्म्यातून रोखून पहात म्हटलं.

"चेन्नई ?"

"हो. अहो नोकरी म्हटली कीं, कुठंही जावंच लागतं. ऑर्डर इज ऑर्डर."

मग दोघांचा पोहेचहा आटोपला.

आदिती घरीच नसल्याने अ मनातून निराशला असला तरी त्याला कां कुणास ठाऊक ताणरहित मोकळं हलकंहलकं वाटू लागलं होतं. असं का व्हावं याचं त्यालाच क्षणभर आश्चर्य वाटलं.

बाहेर अंधार गडद होऊ लागला होता. बंगलीतील खोल्यात मंदसा दुधाळ प्रकाश पसरला होता. टॉमी अधनंमधनं आतबाहेर करीत कधी दिप्तीच्या पायाशी तर कधी ब शी अंगचटीला येत लाडावत होता. ती दोघंही त्याला मायेनं कुरवाळीत होती. एकदा अ ला तो मोह झाला, तसा टॉमी त्याचेवर गुरकावला. मग, त्याने त्याचा नाद सोडला.

ब ने कुडत्याच्या खिश्यातून सिग्रेट पाकीट, माचीस काढली. अ पुढे धरली.

"नो. थँक्स्. मी घेत नाही. तुम्ही घ्या."

"मी घेतो. पूर्वी फार नाही घ्यायचो. आता मात्र दिवसाला किमान दोन पाकिटं लागतात मला."

अ गप्प.

"तुमची बायको-पोरं." ब ने ओठात सिग्रेट पेटविली. झुरका घेत नाकातोंडातनं धूर सोडला.

"आहे नं. सगळी गोहत्तीत. सोबतच राहतात."

"मुलं ?"

"दोन आहेत. मुलगेच. एक आर्किटेकला सेकंड इअर करतो. तर दुसरा बी.ई. केमिकल आहे."

"आणि मिसेस ?"

"ती-शी इज हाऊसवाईफ. फक्त घर सांभाळणे. तशा घरकामासाठी मोलकरणी आहेतच."

"गोहत्तीत राहून बरीच वर्षे झालीत वाटतं ?"

"जवळजवळ पंध्रा वर्षे. आता तेथेच सेटल व्हायचं म्हणतात मुलं. म्हणून बंगला-गाडी सारं करून टाकलं."

"आम्हीही येथेच सेटल व्हायचं ठरविलंय. अहो कितीक वर्षे झालीत इकडे येऊन."

क्षणभरानं अ नेच पुढे बोलणं सुरू ठेवलं, "न्यूयॉर्कहून सुभाषची काही खबरबात ?"

"मजेत आहे तो तिकडे. बायको, एक मुलगा-मुलगी आहे. शिवाय नानाही आहेत. बेटा इकडे यायला नाही म्हणतोय."

"आमची पोरंही म्हणतात इंग्लंड-अमेरिकेत जॉब करू. म्हटलं करा. तुमचं टॅलेंट दाखवा. मग, कुठंही जा जगाच्या पाठीवर."

ब ने सिग्रेटचं थोटूक ॲशट्रेत चुरगाळलं नि बसल्या जागेवरनं दिप्तीला आवाज दिला. दिप्ती आली.

मग, ब ने अ कडे पहात विचारलं, "तुम्हांला जेवायला चिकन चालेल ना ?"

"हो. पण-उगीच त्रास घेऊ नका. कुठलीही भाजीपोळी चालते मला."

"अंकल, चिकन खाच माझ्या हातचं !" दिप्ती बोलली. "पप्पा, चिकनच आणा."

ब च्या खिशात त्याचा मोबाईल वाजला तसा त्याने ताडीने खिशात हात घालून तो बाहेर काढला. मग, तो कुणाशी काहीवेळ इकडेतिकडे फिरत मोबाईलवर बोलत राहिला.

ब ने कपडे केले नि मोटारसायकल, थैली घेऊन तो बाहेर पडला.

टॉमीची आता अ शी चांगली ओळख झाली होती. तो बिनदिक्कतपणे अ भोवती घोटाळू लागला होता. घरात-बाहेर पळत होता.

अ अंगणातल्या छोट्याशा बागेत सहज फेरफटका मारू लागला. अंधारल्या उजेडातली पानंफुलं-झाडंझुडुपं न्याहाळू लागला. झुल्यावर टेकताच क्षणात त्याला सभोवार निशिगंधाचा सुगंध दरवळत असल्याचं जाणवलं. त्या गंधानं तो चमकला. मोहरून निघाला. सुखावला.

आदितीला निशिगंधाची फुलं खूप आवडायची, त्याच्या गंधानं ती वेडीपिशी व्हायची. मग, फुलांचा शोध घ्यायची. कधीकधी ती फुलं तोडून केसात माळायची. तिचा लांबसडक काळाभोर चमकदार केशसंभार गंधानं दरवळून जायचा.

आदितीने मुद्दामच येथेकुठे निशिगंध लावून घेतला असेल. तसं बागेचं वेडंच आहे तिला. धुळ्यात ती आपल्याकडे नेहमी बागेत चलायचा आग्रह धरायची. हट्टालाच पेटायची. तिच्या बागेतल्या कवितेतल्या ओळी आजही आठवतात.

पान पान झालं गौळण । वारा गातो मारीत उड्या।
चोरून नेल्या कृष्ण होऊनी । जरतारी दवांच्या साड्या।

क्या बात है ! खरी कवयित्री-आदितीच ! पुढे, हीच कविता अत्रेंच्या दैनिक मराठातून रविवार पुरवणीत छापून आली तेव्हा कोण आनंद झाला होता तिला. आणि तिच्यापेक्षा आपल्याला ! खरं म्हणजे तिच्या कवितांनीच वेडावलो आपण आणि नकळत दोघंही परस्परांच्या प्रेमात पडलो. आज-खरंच आदिती घरी हवी होती. तिच्या सहवासात तिच्या नव्याजुन्या कविता तिच्या तोंडून मनभरून ऐकता आल्या असत्या.

मग, अ पूर्वस्मृतीत भारावल्यागत काहीवेळ गढून गेला.

अ भानावर आला तसा तो व्हरांड्यात आला. दिप्तीशी गप्पा माराव्यात म्हणून आत घरात आला.

दिप्ती कॉम्प्युटरवर काही काम करीत होती. रजिस्टरमध्ये काही नोंदी घेत होती.

"अंकल, तुम्हाला काही ई-मेल करायचा का घरी ?"

"नो नो. एखाद्या प्रॉजेक्टसाठी टूरवर असलो की, सहसा घराशी संपर्क ठेवीत नाही. कारण, त्यामुळे अनावश्यक अडथळेच येतात. अग, मोबाईलसुद्धा बऱ्याचदा मी ऑफ करून ठेवतो."

दिप्ती की-बोर्डची बटणं दाबीत स्क्रीनवरचे चार्ट न्याहाळू लागली.

क्षणभरानं अ ने दिप्तीला विचारलं, "अग, तुझी आई अजूनही कविता करते का ग ?"

"हो, अहो, वेड आहे तिला कवितांचं ! वेड ! मराठीच काय आता तर कन्नडमधेही लिहीते कविता."

"अरे वा ! कन्नड मधेही ?"

"मग ! आणि हो. तिचं मराठी कवितांच पुस्तकही येत्या दोनतीन महिन्यात प्रकाशित होईल. पुण्याचे प्रकाशक आहेत."

"काय सांगतेस काय दिप्ती ?" अ आनंदला.

"हो. 'रानवारा' कविता संग्रहाचं नांव आहे."

"तुला आवडतात का ग तिच्या कविता ?"

"मला आवडतात. खूप. छान लिहिते कविता आई. पण, पप्पांना मात्र नाही आवडत तिचा हा छंद."

"कां ?"

"ते म्हणतात तिच्या कवितेत सतत कुणाचातरी विरह, वेदना, दुःख, प्रेमभंग असं येत असतं. ती दुःखानं ओथंबलेली कविता वाटते त्यांना. निराशावाद डोकावतो तिच्या कवितेत. माणसानं सतत आशावादी असायला हवं. हेच जीवनाचं सूत्र आहे असं ते म्हणतात."

"अगं, निराशावाद हेही जीवनाचचं एक रूप आहे. दुःख आहे म्हणूनच सुखाची ओळख आहे. हे सारं नाकारून कसं चालेल ?"

दिप्ती पुढे बोलली नाही. तिच्या कामातली गती नि एकाग्रता पाहून अ नेच पुढे बोलणं थांबविलं.

तो मुकाट कोपऱ्यातल्या सोफ्यात बसला. मग, क्षणभरानं त्यानं खिशातनं मोबाईल काढला नि त्यावर क्रिकेट, कॅरम, फुटबॉल आणि गेम्स् मुकाट खेळत बसला. आलटून पालटून.

ब हॉलमधे केव्हा येऊन पोहोचला अ ला कळलेच नाही. त्याने मान वर केली तेव्हा पुढ्यात ब ला पाहिले.

क्षणभरानं ब ने अ ला विचारले, "तुम्हीं ड्रिंक वगैरे घेत असालंच.

"घेतो कधीमधी. पण, सवय, व्यसन नाही."

"गुड ! बरं झालं तुम्ही ड्रिंक घेता. नाहीतर मला एकट्यालाच घ्यावं लागलं असतं. मी घेतो. आज तुमची कंपनी मिळेल एवढंच."

"आज नको. राहू द्या.

"अहो, चिकन-मसाल्याचं जेवण म्हटलं कीं, त्याआधी ड्रिंक हवचं. त्याशिवाय जेवणालाही मजा येत नाही."

पुढे अ काही बोलला नाही.

"मी रोजच घेतो. जेवणाआधी. पूर्वी नव्हतो घेत पण आता-घेतल्याशिवाय राहवत नाही." ब चा स्वर बदलल्याचं अ ला जाणवलं.

ब ने उठून किचनमधनं दोन रिकामे ग्लास, आईसबॉक्स, खारे काजू आदि आणलं. पाण्याचा जग आणला. सारं टीपॉयवर ठेवलं.

अ ला काहीसं आश्चर्य वाटलं. ब ड्रिंक वगैरे आणेल व आपणास पिऊ घालील असं त्याला वाटलं नव्हतं. पण, आजकाल ड्रिंक म्हणजे नवल उरलं नाही. म्हणून त्याने ते फारसं मनावर घेतलं नाही.

ब ने कपाटातून व्हिस्कीची बाटली काढली. टीपॉयवर ठेवली. मग, कॉम्प्युटर सुरू करून कमांड्स् देत हार्डडिस्कवरच्याच काही निवडक गझल निवडल्या नि त्या सुरू केल्या. गझलचे दर्दभरे स्वर हॉलमधे मंद आवाजात रेंगाळू लागले.

एव्हाना, दिप्ती किचनमधे जेवणाचं करण्यात गुंतली होती.

ब ने व्हिस्कीची बाटली उघडली. टीपॉयवरच्या रिकाम्या ग्लासात एकएक पेग भरला. त्यात बर्फाचे क्यूबस् टाकून पुरेसं पाणी ओतलं.

अ नि ब च्या मध्ये टीपॉय होता. ब ने सोफ्यात रेलत सिग्रेट पेटविली. एक लांबसा झुरका घेत नाकातोंडातून धूर बाहेर सोडला.

मग, दोघांनी चिअर्स करीत ग्लास ओठाशी लावले. घुटके घेतले. ब ने गझलवर ताल धरला.

बराच वेळ गेला तशी अ ला ब ची स्तब्धता असह्य झाली. तसं त्यानं बोलणं काढलं,

"गझलमधे पूर्णतः आत्म्याचा भाव ओतल्यासारखा वाटतो. इतर काव्यप्रकारात असं काही वाटत नाही असं मला वाटतं."

"एस. आय ॲग्री. आमची आदितीही कविता करते. दिप्तीची आई. माझी बायको. पण, पण, तिच्या कवितेला गझलची सर नाहीच. नो !"

"गझल गझल असते. कविता कविता असते. खरं म्हणजे गझल हीही एक कविताच असते. गझल, रुबाया, गाणी, लावणी, या साऱ्या मुळात कविताच असतात. कवितेचीच ही रूपं पण, वेगवेगळ्या धाटणीची -"

ब नुस्ता व्हिस्कीचे घोट घेत राहिला मग काही वेळानं बोलला, "तुमचं बंगलोरातलं काम आटोपलं वाटतं ?"

"हो. ऑफीसची कामं होती. सारी आटोपलीत."

"आणि-योगायोगानं तुम्हांला आमचा पत्ताही कळला होताच-म्हणून तुम्ही येणं काढलं इकडे. हो नं ?"

"यस. बरोबर आहे तुमचं म्हणणं. म्हटलं पत्ता काढल्यावर भेटीला न जाणं बरं नाही."

"गेल्या तीसएक वर्षाच्या अंतरानं तुम्ही भेटीला आलात याचं खरंच मला आश्चर्य वाटतं. तुम्हाला नाही वाटत ?" ब ने नाकावरचा चष्मा सावरीत नाकातोंडातनं धूर सोडीत म्हटलं.

ब ने हा प्रश्न मुद्दाम खोचून विचारल्यागत अ ला वाटलं.

"खरं आहे तुमचं म्हणणं. पण, मला कुणाचाच पत्ता माहीत नव्हता. कालपावतो. नानांची बदली, नंतर ते पुढे कुठे गेलेत, मला कुणाकडून काहीही माहिती मिळाली नाही वा मीही ती मिळविण्याचा प्रयत्न केला नाही असं म्हटलं तरी चालेल."

अनुक्रमणिका

"खोटं तर बोलत नाही ना तुम्ही ?" ब ने सरळ चष्म्याआडून अ च्या डोळ्याला डोळा भिडवीत प्रश्न टाकला.

"अहो, यात काय खोटं बोलायचं ?" अ ब कडे पहात सहज बोलला. त्याला हसू फुटलं. सहज कीं, जाणीवपूर्वक, त्याचं त्यालाही कळलं नाही. आदिती नि आपल्या प्रेमासंबंधी यांना माहिती आहे कीं, काय या शंकेने अ शहारला. त्याच्या उराची धडधड वाढली पण त्याने ती चेहऱ्यावर येऊ दिलं नाही.

"अहो, आतापावेतो तर मला नाना, मावशी, सुभाष बद्दलही काही माहिती नव्हती. तुम्हीच मघा माहिती दिली." अ ने उरलासुरला पेग एका दमात संपविला.

"ओऽसॉरी हंऽ. माझं हे असं होतं कधीकधी. मलाच काही कळत नाही." ब ने दोघांच्या रिकाम्या ग्लात व्हिस्की ओतली.

"तुम्ही लेखक आहात असं मी ऐकून आहे."

"एवढं तेवढं लिहीतो. कुठंतरी छापून येतं एवढचं."

"हाँ-म्हणजे लेखकच झालेत ना तुम्ही !" ब ला व्हिस्की चढल्यासारखी झाली. त्याचे शब्द ओठात अडखळल्यासारखे होऊ लागले.

"कल्पना करा-काय म्हणतोय मी ?"

"कल्पना करा."

"हं. कल्पना करा. तुम्ही लेखक ना-म्हणून विचारतोय. कल्पना करा कीं, एखाद्या पुरुषाला त्याच्या लग्नानंतरच्या पहिल्या म्हणजे मधुचंद्राच्या रात्रीच त्याची बायको, तिचं कुणा दुसऱ्या पुरुषावर प्रेम आहे हे-हे मनातलं गुपित सांगते, तेव्हा त्या पुरुषाची काय अवस्था होत असेल ? कल्पना करा."

अ शहारलाच !

"नाही म्हंजे-तुम्ही लेखक. म्हणून विचारतो." ब ने अ च्या नजरेला नजर भिडवीत विचारलं.

अ थक्क होत क्षणभर ब कडे नुस्ता पहात राहिला. मग, भानावर येत कसाबसा ओठांची थरथर दाबीत उत्तरला, "शब्दात सांगणं-तसं कठीण आहे. कठीणच."

ब ने उरलेला पेग एका दमात घटाघटा पिऊन रिकामा ग्लास टीपॉयवर ठेवला. मग, दीर्घ सुस्कारा टाकीत जड आवाजात अडखळत बोलला, "मी-मी-ती अवस्था अनुभवलीय. हो-मी. ॲडरस्टँड यू ?" ब ने सिग्रेटीच्या धुराचा लोट नाकातोंडातून भकाभका बाहेर फेकला.

भूगर्भात अणुस्फोट व्हावा तसा अ हादरला. जागच्या जागी थरथरला.

ब बोलला, "कल्पना करा. त्यावेळी माझी मनस्थिती कशी झाली असेल ?"

अ गप्प होता. क्षणभराने ब नेच म्हटलं, "तुमचं-नि-आदितीचं प्रेम होतं. हो ना ?"

"खोट्टं ! खोट्टं आहे-हे सर्व. आदितीचं नव्हे. फार तर फक्त माझंच प्रेम होतं म्हणा हवं तर. एकतर्फी-होतं-एकतर्फी."

"एकतर्फी ?"

"हाँ. एकतर्फी. आणि एकतर्फी प्रेमाला प्रेम म्हणत नाही." अ बोलला. अडखळला.

"चूक ! एकतर्फीच असतं तर तिने पहिल्या रात्रीच माझ्याजवळ ही गोष्ट स्वतःहून सांगितलीच नस्ती. तिच्या प्रेमाची उत्कटताच इतकी प्रबळ होती की, तिला ते लपविताच आलं नाही. उत्स्फूर्तपणे ते बाहेर आलं -"

"माय गॉड ! अहो-सारंच मला अनाकलनीय आहे. तुमचा-तुमचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतो. गैरसमज."

"खुद्द आदितीनेच मला तुमचं नांव सांगितलं. स्वतःहून. तिचं खरंच प्रेम होतं तुमच्यावर. पण, ती ते इतर कुणाजवळ लग्नाआधी सांगू शकली नाही. दुर्दैव तिचं-तुमचं कीं माझं-हे अजूनही मला कळलं नाही." ब ने पुन्हा सिग्रेट पेटविली नि झुरका घेत तारवटल्या डोळ्यांनी तो पाठीशी रेलला. स्वतःला फेकल्यासारखा.

अ ची मनस्थिती विलक्षण अवघड झाली होती. त्याला काय बोलावं कळेना. "मला-खरंच माहीत नाहीए. सुभाषने तुमच्या लग्नाची पत्रिका पोस्टाने मला माझ्या ऑफीसच्या पत्त्यावर पाठविली-तेव्हा पत्रिका पाहूनच मला प्रचंड धक्का बसला होता. कारण, याबाबतीत मी अनभिज्ञ होतो. मला आदितीने

आधी यासंबंधी कधी कळविले नव्हते वा कसलाही संपर्क साधला नव्हता. शेवटी मीच माझ्या मनाची समजूत काढली. एकतर्फी प्रेम मुळात प्रेम नसतंच. स्वत:चा मूर्खपणा विसरण्यासाठी दूरवर नागपूरला बदली करून घेतली मी. पुढे दुसरी नोकरी शोधून आसामात गोहत्तीला गेलो. गोहत्ती."

मग, दोघंही काहीवेळ गप्प बसले. मुकाट ड्रिंक घेत राहिले - काहीवेळानं अ मधेच हंसला. वेड्यासारखा. नि अडखळत म्हणाला, "प्लीज, फरगेट इट. या साऱ्या जुन्या गोष्टी झाल्यात आता. ओल्ड स्टोरीज्. आपण दोघांनीही आता पन्नाशी ओलांडलीय. निरर्थक आहेत - आता या साऱ्या गोष्टी. फरगेट इट....

"मग-भेटीला येथे कां आलात-इतक्या वर्षांनी ? व्हाय ?" ब ने चष्म्याआडून अ च्या नजरेला नजर देत म्हटलं.

अ गोंधळला. क्षणभरानं बोलला, "सहज. अगदी सहज."

इतक्यात दिप्ती आली. 'पप्पा, तुमचं आटोपलं असेल तर ताटं लावू का ?"


"वाढ, येतोच आम्ही." ब बोलला.

मग, दोघंही स्वत:ला सावरीत किचनमधे आले बेसिनमधे हाततोंड धुऊन डायनिंग टेबलाशी बसले. दोघांनाही ड्रिंक चढलेलं दिसत होतं.

"ड्रिंकचा त्रास झाला नाही ना जास्त ?" ब ने अ ला विचारले.

"नो. नो. अहो-अधूनमधून बॉडी ओव्हरऑइलिंग व्हायला हवी म्हणतात अशी.

जेवताना अ ने दिप्तीच्या स्वयंपाकाचं तोंड भरून कौतुक केलं.



ब ला उदासवाणं वाटू लागलं तसा त्याने कोपऱ्यातला पोर्टेबल टीव्ही सुरू केला. त्यावरील सिनेमाची नाचगाणी पहात दोघांनी जेवण उरकलं.

रात्रीचे बारा वाजत होते.

"निघायला हवं. एकला ट्रेन आहे." अ बोलला. त्याने लगबगीने कपडे केले. सूटकेस आवरली नि तो जाण्यासाठी व्हरांड्यात आला.

"अंकल, पुन्हां या हंऽ.." दिप्ती बोलली.

"मी येतो-तुम्हाला सोडायला-गेटपर्यंत." ब बोलला.

अ ला त्याचा आग्रह मोडता आला नाही.

बाहेर सर्वत्र दाट अंधार पसरलेला होता. रस्त्याच्या दुतर्फा असलेले सोडीयम व्हेपरचे दिवेच काय तेवढे प्रकाश ओकत उभे होते. रातकिड्यांचा किर्र आवाज अधेमधे झाडीतला अंधार चिरत होता. बाकी सर्वत्र शुकशुकाट होता.

ती दोघं मुकाट्यानं रस्त्याने चालत होती. अ च्या हाती त्याची सूटकेस होती.

"आदितीशी भेट झाली असती तर-बरं झालं असतं." शांतता भंग करीत अ ने अखेर ब ला विचारलं.

"आता-आता कसली भेट तुमची आदितीशी ?"

"म्हंजे ?"

"तुमची नि तिची भेट कशी शक्य आहे ?"

"मी-मी नाही समजलो."

ब च्या प्रश्नांनी अ गोंधळला होता.

"अहो, आदिती वीस वर्षापूर्वीच वारली आहे."

ब च्या ह्या अनपेक्षित उत्तरानं अ जागच्याजागी थबकला. हादरला. विजेचा प्रचंड लोळ अकस्मात अंगावर कोसळावा आणि उभां देह पेटावा असं त्याला झालं.

"काय ? अहो-सांगता काय तुम्ही हे ?"

"येस. शी इज डेड. आदिती वीस वर्षापूर्वीच वारली. तिने-एके दिवशी घरात एकटी असताना स्वत:ला जाळून घेतलं. आत्महत्या केली. मृत्यू कवटाळला." ब अ कडे पहात शुष्कपणे बोलला.

"माय गॉड ! नो ! नो ! नाही. तुम्ही-तुम्ही हे सर्व खोटं सांगता आहात मला. दिप्तीने-तुम्ही तर मघाशीच मला सांगितलं की, आदिती घरी गांवी गेली आहे म्हणून ? दिप्तीची आजी आजारी आहे म्हणून तिच्याजवळ थांबण्यासाठी-" अ हातवारे करीत वेड्यागत बोलू लागला.

"हो. बरोबर आहे ते. माझी ती दुसरी लग्नाची बायको आहे. आदिती माझी बायको असल्याने तिच्या मृत्यूनंतर मी हिंदू परंपरा, रूढीनुसार दुसऱ्या बायकोचं नांवही आदितीच ठेवलं आहे."

"ओ गॉड !" अ जागच्या जागी थरथरू लागला. हातात सूटकेस धरणंही त्याला अशक्य होऊ लागलं. त्याने सूटकेस खाली रस्त्यावर ठेवली नि लटपटत उभा रहात ब च्या तोंडाकडे वेड्यागत पहात राहिला. मुकाट.

मग, ब च पुढे बोलला, "दिप्ती-माझी नि आताची माझी बायको आदितीची मुलगी आहे. फॉर युअर इन्फॉरमेशन. आणि योगायोगाने माझी आताची बायको आदितीही एक कवयित्रीच आहे. कवयित्री. हा निव्वळ योगायोग म्हणा हवं तर." ब शांतपणे बोलला.

तेवढ्यात मागून एक रिकामा ॲटोरिक्षा कॉलनीतून येताना दिसला तसा ब ने त्यास हात दिला. ॲटो जवळ येऊन थांबला.

"साबको रेल्वेस्टेशन छोड देना."

अ यंत्रवत ॲटोत बसला. ब ने त्याची सूटकेस उचलून आत त्याच्याजवळ दिली.

"या आता." ॲटो सुरू होताच ब ने हात हलवित अ ला निरोप दिला. अ ला निरोपादाखल हातही उचलता आला नाही. सुन्न होऊन तो ॲटोत बसला होता. नजर शून्यात होती.

ब बंगलीवर घरी पोहोचला नि आल्याआल्या त्याने स्वतःला सोफ्यात झोकून दिलं. क्षणभर त्याला अस्वस्थ, उदासवाणं वाटून गेलं.

दिप्ती किचनमधे आवराआवर करीत होती.

मग, तो आयुष्यात पहिल्यांदाच स्वतःशी मनमोकळा हसला. खळखळून हसला. आणि स्वतःशीच बोलू लागला. मनातल्या मनात.

आदितीने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केल्याचं नि ती वारली असल्याचं आपण त्याला खोटंच सांगितलं. साऱ्या घटना खोट्या ऐकविल्या. कारण, आदितीचं जिवंत अस्तित्वही त्याच्या मनात, आपल्याला नको आहे. तो पुन्हा आपल्याकडे येऊ नये म्हणून आपण मुद्दाम आपली बदली चेन्नईला झाल्याचं त्याला ऐकविलं. आपला मोबाईल नंबरही आपण त्याला चुकीचाच दिला. घरचा फोननंबरही चुकीचा दिला. हे सारं खोटं आपल्याला हवं होतं. ह्या खोटेपणातच आपलं खरं जगणं होतं. खरं समाधान होतं. खरं सुख होतं.

ब पुन्हा स्वतःशीच हसला. हसत राहिला.

आता-आदिती एका वेगळ्या अर्थानं त्याच्या मनातून पार पुसली जाणार. आणि हेच पुसणं आपल्याला हवं होतं....त्याच्या मनाच्या जळण्यासहित.

दिप्ती किचनमधे जेवत होती तोपर्यंत थांबणं आवश्यक असल्याने ब सोफ्यातून उठून कोपऱ्यातल्या पीसीजवळ गेला. खुर्चीत बसत त्याने कॉम्प्युटर सुरू केला. स्क्रीन प्रकाशानं उजळून निघाला. मग, त्याने गेम्स् फाईल ओपन केली नि त्यातला एक गेम निवडला. अक्षरांचे तुकडे करून ते परत जोडायचे.

ब ने 'A' अक्षर स्क्रीनवर घेतलं नि लगेच माऊस नि कर्सरच्या साह्याने 'A' वर क्लिक केलं तसं 'A' चे असंख्य तुकडे होऊन ते स्क्रीनभर इतस्तः विखरून-स्थिर झाले. मग, ते तुकडे तो जुळवून 'A' -पूर्वीचंच अक्षर तयार करू लागला. तुकडे जोडता जोडता त्याची दमछाक झाली. केव्हातरी क्षणभराकरिता त्याचा डोळा लागला. त्या मिटलेल्या डोळ्यातल्या अंधारातही त्याला तो स्पष्ट-अस्पष्ट दिसू लागला. टीएफटीच्या स्क्रीनवर तो विखुरलेले तुकडे जुळवितोय पण, अपेक्षित अक्षर तयार होत नाही. बराच वेळ जातो अन् अनपेक्षितरित्या तुकडे जुळून अक्षर तयार होतं. तसा तो आनंदतो. हर्षोद्‌गार काढीत लहान मुलासारखा टाळ्या पितो. टाळ्या पिटता पिटता हळूहळू तो मान वर करतो नि हादरतोच.

देहाला चेहराच नसतो !

खडबडून 'ब' डोळे उघडतो. समोरच्या स्क्रीनवर अक्षराचे तुकडे इतस्तः पडून असतात. त्याच्या मुठीत माऊस असतो नि कोपऱ्यात स्क्रीनवर कर्सर-त्याच्या हालचालीची वाट पहात असतो.

अ ला ट्रेनमधे खिडकीशी जागा मिळाली. सेकंडक्लासचा अनरिझर्वड् डबा असला तरी गर्दी तशी नव्हतीच. अ ने सूटकेस बर्थवर ठेऊन दिली नि खिडकीशी डोकं टेकवून तो निपचित पडून राहिला.

ब सोबतचा पूर्ण काळ तुकड्यातुकड्यांनी त्याच्या पुढ्यात आला.

ब शी आपण खोटं बोललो. तीसएक वर्षांनी अकस्मात आदितीचा पत्ता कळला. मुंबईतच. कुणाकडून तरी. तिला पहायला, भेटायला उत्सुकतेपोटी ऐपत नसतानाही थेट महाराष्ट्रातून कर्नाटकात, या शहरात रिझर्वेशन नसताना रेल्वेत धक्काबुक्की खात आलो. शहरातल्या भणंग भागातल्या एका फडतूस, स्वस्तातल्या लॉजमधे कॉमन हॉलमधे थांबलो. श्रीमंत, उच्चभ्रू असल्याचं ब च्या मनावर बिंबविलं. हे खोटंच आपल्याला हवं होतं. ह्या खोटेपणातच आपलं खरं जगणं होतं. समाधान होतं. आपण त्याला दिलेला मोबाईल नंबरही चुकीचाच मुद्दाम दिला.

अ पूर्वीचीच क्लार्कची नोकरी करीत होता. फक्त त्याने बदली मागून घेतली होती. नागपूरहून-मुंबईत. प्रचंड, अवाढव्य, कोट्यावधी लोकसंख्येच्या भरगच्च मुंबईतल्या एका उपनगराच्या कोपऱ्यातल्या बकाल वस्तीत तो भाड्याच्या खोलीत रहात होता. एक सामान्य आणि भांडकुदळ बायको; दोन तरुण, बेकार, उडाणटप्पू मुले नि सतत अंथरूणाला खिळून असलेले वृद्ध वडील. रडत रखडत. दारिद्र्य रेषेखालील भकास, अस्वस्थ, फाटकं जीवन जगत...

ट्रेनचा भोंगा वाजला तसा अ दचकून भानावर आला. त्याने खिडकीतून बाहेर पाहिलं. ट्रेन सुरू होऊन डबे सरकू लागले होते. त्याचवेळी बाजूच्या ट्रॅकवर विरूद्ध दिशेला जाणारी एक प्रवासी ट्रेन उभी होती. त्याने सहजच विरुद्ध बाजूस वळून फलाट पाहिला तसे त्याला आश्चर्य वाटले. तो ज्या ट्रेनमधे बसला होता ती ट्रेन सुरूच व्हायची होती. त्याने पुन्हा खिडकीतून बाजूस जाणीवपूर्वक पाहिले-खरे तर, बाजूच्या ट्रॅकवरील विरुद्ध दिशेला जाणारी ट्रेन सुरू होऊन तिचे डबे पुढे सरकत जात होते. मग, हे असं कां होतं ?

अ गालातल्या गालात हसला. शुष्क. काच टिचून तुकडे पडल्यागत.

■ ■ ■

वर्गणीदारांसाठी सूचना

१. 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
२. 'युगवाणी' हे त्रैमासिक स्वरूपात निघणार असून एका वर्षातील चार अंकांची वर्गणी १०० रु. आहे.
३. वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाचा) स्वीकारण्यात येईल.
४. सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
५. वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
६. वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.
७. मनीऑर्डर फॉर्मवर 'संदेशासाठी असलेल्या रिकाम्या जागेत' वर्गणीदारांनी स्वतःचे नाव व पूर्ण पत्ता लिहिणे अतिशय जरूरी आहे.

पत्ता १. 'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४००५
२. विदर्भ साहित्य संघ, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४००१२.

।। नवी चळवळ आता कुणब्याची ।। ◗ संतोष पद्माकर पवार

आता कुणब्याने
ओळखाव्या खाणाखुणा
पिकवावा दाणा
स्वत:पुरता

आपली भाकरी
आपुनच खावी
कोठाराची भर
करू नये

देवधर्म नको
नको वाऱ्या पंढरीला
पाहिल्या बा म्हणावे
तुझ्या खेळी.

दारी घरी कुणी
राहू देऊ नये उभा
सांगावे हा कुणबा
सुधारला आता

ऊस आणि कापूस
झाले आपलाले वैरी
एकसुद्धा पेर-कैरी
बाळगू नये

जग मरणार
नाही साखरेवाचून
कुणी कपड्यावाचून
जरी राहो.

दूध दुभत्याचे
काढू नये पसारे
गाय खोंड वासरे
माजो द्यावी

पुढारी पेंढारी
अशी थोरली माकडे
त्यास मारून लाकडे
सरणावी

जर पिकले रानात
पोटा पेक्षा जादा
त्याची गाय गुरा
वैरण करा

चारो मेरी हातालागी
दगड ठेवावे वेचून
आणि काढावे चेचून
आले भिकमांगे

शेठ साहुकार
आणिक दलाल आडते
यांचे फाडावे कुडते
दिसताची

शेताची उठाठेव
करा म्हणा कुणीपण
जातीचा एकपण
नाही यायचा

फळे धान्य दूध
स्वत:पुरते करावे
दुसऱ्यास देण्या म्हणा
देव आहे

पिकवू नये जादा
फिरू नये बाजारात
भिकाऱ्याच्या परी गत
ठेवू नये

रानात राखावे
मस्त शिकारी कुतरे
आणि फाडावी फोतरे
येणाऱ्यांची

गरीब मजूर
कोणी येता घराला
लावावे कामाला
भाकरीवर

घासातला घास
द्यावा अशा राबणारा
आणिक हरामखोरा
लाथ द्यावी

भट भिक्षुकाला
देऊ नये थारा
माराव्या पैजारा
अशालागी

विकू नये शेत
विकू देऊ नये कुणाचे
कुदबे पिकपहाणीचे
करूच नये


चाल ढोपरावर
सांगावे सरकारा
टाका दाम म्हणा सारा
मागचा राहिला

लाखाचा पोशिंदा
नको पुरस्कार
हाच तिरस्कार
नडलेला

वामने घातला
बळीराजा पाताळी
आता म्हणा पाळी
वामनाची

झाले गबर बोकडे
कुणब्याच्या जीवावर
सुरी त्यांच्या शिरावर
येऊ द्यावी

अशी चळवळ
खाशी करावी एकदा
भामट्यांची आपदा
होवो द्यावी.



॥ ब्राण्ड एम्बॅसेडर ॥ ▸ सुनील अभिमान अवचार

वर्गात शिकवता शिकवता
मॉडर्न हिस्ट्री
मुलांना सहजच एक प्रश्न केला...
कोण व्हायचे आहे तुम्हाला ?
तुमचा 'आयडॉल' कोण ?
सायंटिस्ट स्टिफन हॉकिंग्ज
की
अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन
की,
अंतराळवीर सुनीता विल्यम्स....

मी एक एक नाव पुढे करत असतानाच -
मुलांनी हलवली मान नकारात्मक
तेव्हा शंकेची पाल चुकचुकली मनात माझ्या
पहिल्या रांगेतला मुलगा
उठला अन् म्हणाला
"मला, व्हायचंय ब्राण्डएम्बॅसेडर कोकाकोलाचा !!!
दुसरा - त्याच्याच कॉलनीतला, म्हणाला
"मला, ओडाफोनचा !"
नंतर मुलगी म्हणाली
"मला, व्हायचे आहे लक्स-गर्ल !"
मागच्या बाकावरील पोरं झोपडपट्टीतले
मुक्या बहिऱ्यागत केवळ पाहत राहिले मटमट
अन्
माहितीच्या विषमतेचे अंतर भारी पायाने
कापत गेले.

इ-स्फोटात माझ्याच वर्गात दोन तट पडले.
एवढ्यातच तास संपल्याचा टोल पडला
आणि माझ्या मेन्दूने वेग धरला...
ब्राण्ड एम्बॅसेडर
असतो मॉडर्न हिस्ट्रीचा स्टार
मॅन ॲण्ड वुमन
मॅन असतो टिंबो
वुमन बिंबो....
हॉलीवुड / बॉलीवुड / लॉलीवुड / टॉलीवुड मधील
क्रिकेटर-टेनिसपटु-बॉक्सर-
गोल्फर-ग्रॅंडपीक्स-डब्ल्यू.डब्ल्यू.एफ.
इत्यादी....आणखीही....

ब्राण्ड एम्बॅसेडर
असतो भव्य साईन बोर्डवर कॉन्फिडन्सने
प्रॉडक्टची जाहिरात करीत
कधी सिगार
कधी विआग्रा
कधी शॅम्पेन
कधी कधी
सोशल अटॅच म्हणून
पोलिओ डोस पाजण्याची किंवा
रक्तदान / नेत्रदान / 'बालिका अर्भक वाचवाऽ'
म्हणून विनंती करीत.
ब्राण्डएम्बेसेडरला
अदबीने म्हटल्या जाते सर / मॅडम / मेमसाहेब
फाईव्हस्टार मधून बाहेर पडताना
मारतो त्याला सिक्युरिटीगार्ड सॅल्यूट
गाडीचा दरवाजा उघडल्या जातो.
त्यानंतर बसतो ड्रायव्हर गाडीत....
शासकीय दरबारी असतो त्याला दर्जा VVIPचा
त्याच्या झेडप्लस साठी
वाढतो देशावर कर्जांचा डोंगर

ब्राण्डएम्बेसेडरच्या वाक्यात असतात
बाऽस्टरऽऽ
सुऽऽजलेसऽ
शेऽऽटॉपऽ
गेटाऊटऽऽऽ

असे ब्रिटिश / अमेरिकन इंग्रजी उच्चार...
त्यांच्या समोर शेफर्डस् / बुलडॉगच्या तुलनेत देशी
माणूस असतो लाचार

ब्राण्डएम्बेसेडर म्हणजे
उँचे लोग उँची पसंत....
रम रमा रमी में है दंग....
उँचा सुट उंची उंची गाडी....
उँची सिगार उँची दारू
उँचा बंगला उँची गाडी
उँचा कद उँची अहमीयत
उचले लोग उँची पसंत....

ब्राण्डएम्बेसेडर
गुडविल म्हणून
डेली न्यूज / हिन्दू / टाईम्सच्या
पेज थ्री मध्ये
कधी मायेने बालकामगाराचा मुका घेत....
एड्स ग्रस्तांसाठी चॅरिटी शो करीत....
चाहत्याच्या गर्दीत सिगनीचर देत...
फोटोच्या चमकत्या स्नॅप मध्ये
विवस्त्र वस्त्रातील गर्लफ्रेन्ड्सच्या मिठीत
२ ऑक्टोबरला काततो सूत, घेतो समाधीचे दर्शन
मदर तेरेसाच्या फोटोसोबत काढतो फोटो
आणतो भावूक होवून डोळ्यांत पाणी....
वर्ल्ड सेन्टर मध्ये मृत्यूमुखी
पडलेल्यांच्या नातेवाईकांची करतो सांत्वना....
लेट नाईट कॉर्पोरेट वर्ल्ड / पोलिटिशियन्सच्या
'रेव्ह' पार्ट्यांना राहतो हजर...
कायमस्वरूपी चॅनलवर चर्चेत
कधी अण्डरवर्ल्डशी साटेलोटे असल्याची चर्चा
कधी बुडवला आयकर म्हणून
कधी क्रिकेटवर लावला सट्टा म्हणून
गे / हिप्पीचा सभासद असल्याची तो देतो जाहीर
कबुली.
हा असतो शांघाय सिटिव्हॅलीतला मोगली....

त्याचा मेन्दू - माझा मेन्दू
दोघांचे मानवी मेन्दू
एक सारखेच असतील काय ?
मला पडतात एवढे प्रश्न
त्याला पडत असतील काय ?
त्यालाही मतदानाचा अधिकार ?
त्यालाही काही कर्तव्य ?
तरीही त्याला चढवावे - उतरावे लागत
असतील 'नकाब' ?
एक सैतानी - दुसरा मानवतावादी
एक हसरा - दुसरा रागीट
एक आनंदी - दुसरा कष्टी
त्याच्या ही वाट्याला असेल का ?
एक हृदय बरोबर ओली जखम
एक हृदय बरोबर पिसांचा सपर्श
त्याचा मेन्दू + निद्रा + भूक + मैथून = रेस
ट्रॅफिक सिग्नलावर स्वतःच्या मालकीची
इंपोर्टेड गाडी थांबल्यावर
आशाळभूत नजरेचे मूल हातात कटोरा घेऊन
गाडी पुढे येताच
त्याचे डोके झाले असेल का सुन्न ?
वॉशिंग्टनच्या दिशेने विमान 'टेकऑफ' करताना
त्याला दिसली असेल का जमीन झोपड्यांनी
व्यापलेली ?
शेतकऱ्यांच्या आत्महत्येची न्यूज हेडलाईन
पोहचली असेल का त्याच्या नजरेपर्यंत
रेबॅन गॉगल मधून स्वतःचा
सूट न्याहळताना....
त्याला आठवत असतील का कामगारांची बोटे....
'अनटचेबल' या शब्दाचा सोशल रेफरन्स ?
ग्लोबल वॉर्मिंगची दाहकता ?
'भटके-विमुक्त' कोणत्या देशात राहतात ?
दंगलीत कोण जातो होरपळल्या ?
वर्ल्डच्या तुलनेत
इंडियाचा ह्युमन इंडेक्स ?
फोमच्या गादीवर लेटल्यावर त्याला
पडत असतील असे प्रश्न ?
हे प्रश्न ते प्रश्न प्रश्नच प्रश्न
त्याच्या प्रश्नात माझ्या प्रश्नात
मल्टिप्लेक्स ते झोपड्या पर्यंतचे अंतर
अंतर ओलांडताच रामलीला मैदान दिसले

अनुक्रमणिका

रामलीला मैदानात मेला दिसला
मेल्यात दिसला नंदीबैल
नंदीचा खेळ सुरू झाला
धनुकलीच्या तंतु वाद्यासोबत ढोल साथ देऊ लागला.
नंदीच्या पाठीवर झूल
पायात घुंगरे,
शिंगे रंगविलेली...
गळ्यात घंट्यांची माळ, शिंगांना शेंब्या
म्हटलं हाच असू शकतो
वर्तमानातला ब्राण्ड एम्बॅसेडर बांग्या
गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ
नंदी मल्टीनॅशनलचा होऽऽ
नंदी कार्पोरेट वर्ल्डचा होऽऽ
इलेक्ट्रॉनिक / प्रिन्ट मिडियाचा लाडका होऽऽ
सिटी व्हॅली वरून आला होऽऽ नंदीऽऽ
नंदीने मान डोलावली की प्रश्नाचे उत्तर
'एसऽऽ'
गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ

अवंदा प्रॉडक्टला चांगला भाव येईल का ?
कंपनीच्या शेअर्सचे मार्केट रेट वाढतील का ?
धन्याच्या कणग्याला बरकत येईल का ?
धन्याच्या वंशाचा दिवा मिलियन्स डॉलरचा
मालक होईल का ?
कंपनीच्या मालकीन बाईला बॉलीवुडची सुनमुख
पाहण्याचा योग अवंदा हाये काय ?
गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ गुबूऽऽ

ब्राण्ड एम्बॅसेडर म्हणजे
मल्टी नॅशनल जोकर
मूल्यांना ठोकर...
ब्राण्ड एम्बॅसेडर
ग्राहकांच्या डोळ्यात फेकलेली धूळ....
विरती न्याय मूल्यांचे मूळ
ब्राण्डएम्बॅसेडरचे सुरू आहे समकालात युद्ध
नव्यापिढीने कसा करावा हा 'ऑयडॉल' रद्द ?
गुबूऽऽ गुबूऽऽ
गुबूऽऽ गुबूऽऽ

।। बुजगावणं ।। ▸ सुभाष किन्होळकर

वावरात बुजगावणं असलं म्हणजे
चक्कर मारायचीही गरज नाही -
सहजच येऊन जातं मनात,
बोरीच्या झुडूपावर टाकताना
फाटका पायजमा.

बुजगावणं असलं की
धाडस होत नाही पाखरांचं
हल्ला करायला
कणसावर -
असला भ्रम केळ फोल.

पाखरं असतात हुशार
चलाख
लागत नाही त्यांना वेळ कळायला
माणसाच्या अस्सल हालचाली
काहीसं भीत पण मनाच्या धिटाईनं
करतात आगेकूच
बुजगावण्याकडं....

तंगडी ओढताच बुजगावण्याची
उलगडतं रहस्य

दुपारच्या वेळी आपली आकस्मिक नजर -
भरून जाते धडकी,
बुजगावण्यावर पाहून
पाखरांच्या कुस्त्या....

॥ 'ऋतुस्पर्श' : एक शलाकापरीक्षा ॥

डॉ. आशा सावदेकर

साहित्यनिर्मिती का, कशी आणि कशासाठी या प्रश्नांचा शोध घेऊ गेलो तर मानवी मनाची विविध पातळीवरील, विविध प्रकारची, गुंतागुंतीची सूक्ष्म स्पंदने प्रकट करणे हाच साहित्यनिर्मितीचा खरा झरा आहे. या निर्मितीसाठी जी साधने वापरली जातात त्यामागेही मनाच्या शोधाचा, जीवनाकडे बघण्याच्या दृष्टीचा आणि निर्मात्याच्या खोल मनातील मूल्यसंकल्पनांचाच अनुबंध असतो. आपल्या मनाला ग्रासणाऱ्या अनेक दु:खांचा, वेदनेचा शोध घेताघेता आधुनिक मन मानसिक, बौद्धिक, आध्यात्मिक आणि कलात्मक पातळीवरून वेगवेगळे विचारव्यूह रचू पाहते आणि त्यातून व्यक्तिकेंद्री, प्रयोगशील, तत्त्वचिंतनपर, गूढ, गुंतागुंतीची निर्मिती होऊ लागते. या संपूर्ण निर्मितीमागे - मग ती कोणत्याही वाङ्मयप्रकाराची असो - आजच्या काळात महत्त्वाचा भाग असतो आत्मशोधाचा. त्यासाठी वर्तमान वास्तव, स्व-भूमिका यातून आजवरच्या संपूर्ण वाङ्मयीन संस्कृतीचीच झाडाझडती घेतली जाते. मग ही निर्मिती समाजमनाचा, संस्कृतीचा एक भाग बनते. प्रयोगशील रचनाबंध, मानसप्रवाहांच्या आंतरिक गाभ्याला भिडण्याची ऊर्मी आणि साहित्य व जीवन यांच्या अनुबंधाची ओढ यातून खूप खोल, काहीसे वेगळे निर्माण होताना वाङ्मयप्रकार एकमेकात मिसळतात, विलग होतात, एकमेकात गुंफले जाऊन खूप काही सांगू इच्छितात. यात जाणीवपूर्वकता असतेच असे नाही, असे का घडावे याला एकच एक ठाम उत्तरही नसते. साहित्याच्या वहिवाटीत काही गोष्टी घडून जातात. मानवी जीवनव्यवहारात कलेला दिले जाणारे गौणत्व, ललित साहित्यात वास्तव-अवास्तवाची गल्लत, उपयुक्ततावाद आणि कलावंताचे स्वातंत्र्य यातून निर्माण होणारी गफलत यातून वाङ्मयप्रकारांच्या संमिश्रतेकडे, मिसळणीकडे, घुसळणीकडे आणि त्यातून निर्माण झालेल्या वेगवेगळया आकारांकडे समीक्षेने आणि वाङ्मयेतिहासानेही कधी नीटपणे पाहिलेच नाही.

त्यातल्या त्यात ललित गद्य - ललित निबंध - ललितबंध अशा संज्ञा, त्याचे रूप, त्याची बदलती जाणीव याकडे पाहणाऱ्यांनी एकतर त्याचा रूक्ष कीस काढला, कधी गुळगुळीत जाणिवांनी सरधोपट विचार केला तर कधी त्याची चिकित्सा करण्याची भूमिका घेतली, पण खरी चिकित्सा केलीच नाही. कधी ललितरम्यतेच्या पायघोळ झग्यात त्या वाङ्मयप्रकाराला अडकवून तर कधी त्यावर एखादी 'काव्यात्म निबंध' अशी गुळगुळीत चिठ्ठी डकवून त्याला सूक्ष्मदर्शक यंत्राखाली धरून न्याहाळण्याचा प्रयत्न करणेच टाळले.

ललितलेखनाच्या संदर्भात दुर्गाबाई भागवत म्हणाल्या होत्या - "कवितेप्रमाणेच ललित लेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते" - ते अगदी खरे आहे. ललित बंध जाणतेपणी, ओढून ताणून काव्यात्मता पांघरत नाही. या सृष्टीच्या अजस्र पसाऱ्यात कितीतरी भावरहस्ये दडलेली

असतात. त्यांचा प्रत्यय जेव्हा कलावंताला येतो तेव्हा त्याच्या प्रतिभासंपन्न व्यक्तित्वाला पंख फुटतात. त्याला लालित्यपूर्णतेचे उसने दागिने नकोसे वाटतात. मग त्याचे मन जीवनाच्या मूळ लसलसत्या, रसरसत्या कंदाशी संवाद करू लागते. त्यात लय असते, नादाची रुणझुण असते, शब्दांच्या वजनाचे भान असते. तो त्याच्या अंतर्यामीचा स्वर असतो जो निसर्गाशी जुळून जातो; मगच अस्सल ललितबंधाचा जन्म होतो.

ललितबंधातील 'नॉस्टेल्जिया' हा अनेक टीकाकारांच्या टीकेचा विषय आहे. एक पाश्चात्य लेखक म्हणाला होता की कोणताही कलावंत आयुष्यभर कलानिर्मिती करतो म्हणजे आपले आत्मचरित्रच लिहीत असतो. आपले बालपण, आपल्या भूतकाळाच्या आठवणी, आपल्या घडणीचा काळ हा प्रत्येकाच्या अस्तित्वाचा, अस्तित्व टिकविण्याचा आणि बिंबवून ठेवण्याच्या वृत्तीचा अटळ भाग असतो. त्यामुळेच तो अटळ भाग 'स्व'ला तपासण्याच्या वाटचालीत अपरिहार्य असतो.

विंदा करंदीकरांच्या ललितबंधात त्यांचे बालपणच्या स्मृतीतील कोकण येते. कारण तेथल्या निसर्गाचे, लोकसंस्कृतीचे अस्सल संदर्भ कलावंतांच्या जडणघडणीशी निगडित असल्यामुळे ते अपरिहार्यपणे काव्यात्म आत्ममग्नतेतून परावर्तित होत राहतात. मात्र हीच कलावंताची आत्ममग्नता भावविवशतेत परावर्तित होत असेल तर मग कुठलेही लेखन अस्सलतेपासून दूर जायला किंबहुना जीवनविमुख व्हायला वेळ लागत नाही.

चंद्रशेखर जहागीरदारांसारखा समीक्षक जेव्हा एका निबंधामध्ये ...ज्या कारणांसाठी मराठीतील कौटुंबिक नाटके, बराचसा विनोद, ऐतिहासिक-रोमँटिक कादंबऱ्या निर्माण होतात, त्याच कारणांसाठी ललित गद्याची निर्मिती व आस्वाद, हेही घडतात असे म्हणावे लागेल" (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, पृ. २१२) असे म्हणतात. तेव्हा मात्र हे ललितबंधाच्या काव्यशरण वृत्तीवर तुटून पडणे ठरते मात्र त्यातील काय अस्सल आणि किती नक्कल हे कळल्याशिवाय, कळवून घेतल्याशिवाय असे 'तुटून पडणे' योग्यही नसते.

खरे तर काव्यात्मकतेशी नाते जुळवून अनेक वाङ्मयरूपे सिद्ध होतात. काव्यात्मता कथेत, कादंबरीत असते तशीच ती नाटक, ललितबंध, आत्मचरित्र यातही असते, असू शकते. त्याचे प्रमाण कमी-जास्त कलावंताच्या व्यक्तिमत्त्वानुसार आणि दृष्टीनुसार बदलत असते. दुःखाशी, वेदनेशी काव्यात्मतेचे जवळचे नाते असते आणि ते मुळापासून असते - वरवरचे नसते.

प्रा. महेश एलकुंचवारांच्या 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' या ललितबंधात लहानपणची एक रूक्ष, वात्सल्यापासून तोडून टाकणारी वडिलांची आठवण आहे. ती तडफड, ते दुःख त्यांच्या मनाला निववते असे ते म्हणतात. त्या बंधाच्या शेवटी अगदी लहानशी कोवळी आठवणीची लकेर आहे. एका तडफडत्या रात्री धडपडून उठून सुरईतील गार पाणीपिऊन समोर पाहिले तर त्या मनाला "सृष्टी दुधात नाहात होती व सहस्रमुखांनी गात होती;" असा भास होतो. लेखकाला वाटते की सृष्टी आपल्या गाण्यात सामील होण्यासाठी त्याला आमंत्रित करते आहे. मग त्यांचे मन कृतज्ञतेने भरून आले. यात एक मानससाक्षात्कार आहे जो त्या वेळच्या मानसशारीर स्थितीशी जुळलेला आहे, तो खोटा नाही. तो अनुभव त्या कलावंताला उचंबळवतो तितकाच वाचणाऱ्यालाही अस्सल प्रामाणिकपणाने आपल्यात सामावून घेतो.

प्रा. एलकुंचवारांच्या 'मौनराग' या ललितबंध संग्रहाच्या शेवटी 'राग ललित' हा समारोप आहे. तो ललितबंधाच्या अस्सल प्रकृतीवर प्रकाश टाकणारा आहे. त्यांच्या मते ललितलेखनाचा विकास झाला त्यात प्रत्येकाला वेगळे सांगायचे आहे आणि त्यांना 'आपापली म्हणून एक निश्चित शैली' आहे. मुख्य म्हणजे ही वैशिष्ट्ये त्यांच्या 'मनोधारणेतून' जन्माला आली आहेत. "आत्मपरता हे ह्या प्रकारच्या लेखनाचे व्यवच्छेदक लक्षणच आहे आणि त्यातच, मला वाटते, ललित गद्य ह्या लेखनप्रकाराचे सामर्थ्य आहे." (मौनराग पृ. ११२)

खरे तर ललितबंधातील अनुभव हा स्पष्ट नसतो, तो संदिग्धच असतो. कारण तो शब्दातीत असतो. त्या अनुभवाने लेखकालाच एका अनोळखी जगात फिरवून आणले असते. तो शब्दातीत अनुभव

शब्दांच्या घसरत्या, नाजूक अशा चिमटीत पकडणे ही किमयाच असते. मग कधी कधी पुस्तकी भाषा अपुरी पडते आणि लोकभाषाच मदत करते.

हे ललितबंधाचे नवे, वेगळे आकलन अलीकडच्या एका आकाराने आगळ्यावेगळ्या पुस्तकाने मला पुन्हा एकदा घडवले - ज्याचे नाव आहे 'ऋतुस्पर्श' आणि लेखक आहे श्याम पेठकर. सत्तेचाळीस ललितबंधांचे हे पुस्तक आहे अगदी लहानखुऱ्या एकशेसाठ पानांचे.

कथा आणि ललितबंध यांची सरमिसळ गंगाधर गाडगीळांच्या कथेत होती, श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललितबंधात कथात्मता होती, व. पु. काळ्यांनी 'पार्टनर' कादंबरीला 'नाट्यांबरी' बनवले होते, भावगीत-नाट्यगीत-गद्यगाणी असे संकर होऊन बसलेले वाङ्मयप्रकार मराठीला नवे नाहीत. हे सगळे का घडते ? कसे घडते ? याचे एकच उत्तर आहे लेखकाला जे मांडायचे आहे ते ज्या रूपात स्फुरते आणि जसे अवतरते त्यावर वाङ्मयरूप ठरते. अनुभव आणि तो टिपणारे मन यांच्या संबंधावर कलाकृतीचा आकार ठरतो हेच खरे !

ललितबंधांच्या संदर्भात काव्यात्मतेचा अर्थ पुन्हापुन्हा तपासून पाहणे, आतून न्याहाळणे हे महत्त्वाचे ठरते. ललितबंध हे असे वाङ्मयरूप असते ज्यात आत्मनिष्ठा मोलाची पण ते समूर्त होताना खाजगीपण गळून पडून एका विश्वात्म भावाशी तद्रूप होणे हे जास्त महत्त्वाचे. प्रा. महेश एलकुंचवार यांनी 'मौनराग' या ललित बंधांच्या संग्रहात 'राग ललित' असा समारोप केलेला आहे. त्यात त्यांनी अत्यंत जबाबदारीने एक विधान केले आहे ज्याला अनुभवस्पर्श आहे आणि खोली आहे. ...लेखकाने स्वतःचा 'मी'पणा एका मोठ्या सार्वभौम 'मी'पणात वितळवला नाही तर त्या अनुभवाला कलेचे स्वरूप प्राप्त होत नाही." (मौनराग पृ. ११३) इथे 'वितळवणे' मध्ये अग्निप्रवेश करून तावून सुलाखून घेण्याची भावना आहे.

ललितबंध हा असा वाङ्मयप्रकार आहे ज्यात कोणताही अनुभव एकटा नसतो, तो समूहाने अवतरतो. एकाच अनुभवाला चिकटलेल्या पंचेंद्रियांच्या संवेदनांसकट तो लोलकांच्या समूहातून अधिक प्रकाश परावर्तित करणाऱ्या पैलूदार झुंबरांसारखा असतो. जे शब्दांच्या पल्याडचे आहे, ते एका शब्दात मावत नाही. त्यामुळे शब्द घडवले जातात.' असे कवितेत घडते, कथेत घडते आणि ललितबंधातही.

श्याम पेठकर यांच्यासारख्या तरुण, लहान गावात वाढलेल्या, ग्रामजीवनातील मुळांशी सतत संवाद करीत मोठे झालेल्या कलावंताला काव्यात्मतेचे एक वेगळे भान असते. तो ऋतूंकडे बघत नाही, पाहत नाही, त्याला त्यांचे 'दर्शन' घडते आणि ते आंतरिक असते. विशिष्ट मातीत विशिष्ट रोपटी फुलावीत, फुलाफळांनी डवरावी आणि त्यात त्या प्रदेशाच्या मातीचा गुण असावा तसे हे 'देश्य' लेखन आहे त्यात संवेदनशील मनाचे तरंग आहेत, उत्कटता आहे, चिंतनशील मूळकंदात विरघळलेली काव्यात्मता-अंतर्मन-आंतरिक स्पंदन भिनलेले आहेत. ते मुद्दाम अलवार, कोवळ्या भावस्पर्शात बुचकाळलेले नाहीत, ते अंगभूत आहेत.

वसंतऋतूबद्दल लेखक म्हणतो - "वसंत म्हणजे रंग, गंध आणि स्वरांचे संधिपर्व." (ऋतुस्पर्श पृ. ७) 'पाऊसवेणा' मध्ये शब्द येतात - "ग्रीष्माच्या विरहात होरपळत असतानाही शुष्क डोळ्यांच्या विरहिणीनं मनाच्या कोपऱ्यात ओलावा कायम ठेवलेला असतो." (पृ. ३९) मला प्रश्न पडतो - विरहाचा ग्रीष्म ? की ग्रीष्माचा विरह ? हे तर मर्ढेकरांच्या 'जशी धोब्याची मऊ इस्तरी....' असं झालं ! आणखी एका ठिकाणी पेठकर लिहितात - "समुद्र ओलांडून येणारी निळ्या डोळ्यांची पाखरं डोळ्यात ढग आणि चोचीत पाणी जमवून ठेवतात."

दुःखाची गाणी अधिक गोड असतात कारण ती उमाळून येतात जिवाला झोंबलेल्या वेदनेतून. ही अनावर दुःखाची कासाविशी कोकिळेच्या अस्सल गावरान प्रतिमेतून येते. "कोकीळ पाऊसगाणं गाऊ लागली की पाऊस येतो. पावसाचा अन् या गोष्टींचा जवळचा संबंध आहे. मोहोर फळला आणि आंब्याची झाडं जडावली की कोकिळेला आपल्या पिलांची आठवण येते. पण सुरांना गाण्याचा शब्द दिला असल्यानं ती परत फिरू शकत नाही. अधूनमधून ती काळ्या पक्ष्यांच्या थव्यांमध्ये आपली पिलं शोधते. हवेला पाण्याचा वास आला की मग मात्र ती अस्वस्थ

होते. तिचं असं केविलवाणं होणंही मोठं सुस्वर असतं. पाऊस येण्याआधी आपली पिलं शोधण्यासाठी कोकीळ सैरभैर झाली असते.... (पृ. ३७) कोकिळेचा असा 'वंशशोध' लेखकाच्या मनाला झोंबलेला आहे. म्हणून आतून एक प्रश्न उमटतो - "कोकिळेच्या कातर ताना हवेत विरून जात असतील का, की वर कुठंतरी अवकाशातही त्या आपलं अस्तित्व कायम ठेवत असतील ?

'सखी' बद्दल बोलताना लेखक लिहितो ...तसं सखीचं अन् आपलं शरीरसंबंधातून किंवा शरीरसंबंधासाठी निर्माण झालेलं कुठलंच नातं नसतं, ...बदलणाऱ्या प्रत्येक गरजेला आपली ओंजळ देण्याची क्षमता आणि इच्छा फक्त सखीतच असते." (पृ. २८)

लयलावण्याचे दर्शन घडविणारी ही शैली आशयाचे वेष्टन नसते, तो कलावंताच्या दृष्टीचा अपरिहार्य असा घटक असतो. मनातल्या आशयाला सामावून घेणाऱ्या अनुभूतींना आणि तज्जन्य प्रतिमांना अलगद धरणाऱ्या ओंजळीचे नाव असते शैली. मग या काव्यात्म, लोकबंधाच्या गूढात दडलेल्या शब्दांमध्ये काही कथाही अलगद सामावतात. त्या कथा श्याम पेठकर यांनी फक्त टिपल्या नाहीत तर त्या आशयसंलग्न असल्यामुळे त्या सहजपणे ललितबंधात इथे अवतरल्या आहेत. खरा ललितबंधकार हाही जीवनाचा अन्वय लावीत असतो. तो सुंदर शब्दांचे ढीग रचीत नाही, त्याचा स्वतःचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण असतो. म्हणूनच तर ललितबंधात एवढी विविधता, सुंदरता, विशालता आणि गहनता आलेली आहे. ललितबंधाला काहीही वर्ज्य नाही. त्यात कथा विरघळते, विचार विरघळतो, गूढे विरघळतात, एक करांगुलीचा स्पर्श साध्या विषयाला झळाळी देतो. गणितात प्रत्येक ठिकाणी एकच एक उत्तर असते, जीवनानुभवात तसे नसते. जीवन खूप अंगांनी बहुरूपी असते, ललितबंधकार आपल्या विशेष दृष्टीने पाहू शकतो. म्हणूनच ललितबंधात लालित्य असले तरी त्यात लेखकाची मूल्यनिष्ठा असतेच असते, तोच तर त्याच्या आत्मत्वाचा स्पर्श आहे.

श्याम पेठकर यांच्या ललितबंधात विरघळलेल्या कथाही अशाच आतून अलगद उगवत गेलेल्या आहेत. त्यातील दुःख आणि जीवनस्पर्श यांनी ललितबंध समृद्ध झालेला आहे. 'हिरवा डंख' हा ह्या पुस्तकातील ललितबंध दुःखस्वीकाराने सुरू होतो. "डोंगराचे दुःख ओंजळीत घेऊन पाऊस मग काळ्या कातळाच्या कड्यावरून नदीत झोकून देतो." असे शब्द निनादवत धबधब्याच्या ओघानेच तो संपतो तो एका अनाम अशब्द दुःखानं विहीर जवळ केलेल्या दिवाणजींच्या मुलाच्या विहिरीत तरंगणाऱ्या प्रेतापाशी ! वाड्याची मागे उरलेली मालकीण, जिला वाड्याच्या इभ्रतीचा उंबरठा ओलांडता आला नाही आणि जुळवलेले अनुबंध तोडता आले नाहीत. वाड्याचं माप ओलांडून आलेली घरधनीणही मीलनाच्या उंबरठ्यापाशी हिरवा चुडा गमावून बसते. उरतो फक्त कोसळणारा पाऊस !

हे ललितबंध साचेबंद नाहीत, त्यातील कथाधारा बंधनांनी तटतटलेली आणि प्राण जीवघेण्या बेंबीच्या देठाने अस्तित्वाला सामोरे जाणाऱ्या जीवांच्या दुःखांनी जगणे-मरणे यातून एकरस झालेली आहे. सुखाचे कण शोधताना वेदनेचे कण्ह भेटावे आणि दुःखाचे व्रण जपतच आयुष्याला सामोरे व्हावे लागावे अशा शोकात्मिकेच्या खुणा जीवनाचे सत्त्वदर्शन घडविणाऱ्याच असतात. कारण त्यात अनुभव झेलण्यातून उमटलेली भावलेणी आहेत, ती सुखाबरोबर दुःखाचेही सुस्कारे ऐकवतात. म्हणूनच त्यांना जीवनाचा सळाळता, भळभळता आणि प्रतिभेचा झळाळता स्पर्श लाभलेला आहे.

स्पर्शाच्या कितीतरी प्रतिमा या बंधांमधून पुढे येतात. स्पर्शही किती प्रकारचा असतो. कधी आघाताचा, कधी दिलाशाचा, जीवनधारे वाहायला शिकवणारा आणि कधी बेभानपणे वाहून जायला लावणारा स्पर्श ! बीज कुशीत घेतलेल्या जमिनीसाठी ह्या लेखकानं 'सुस्तावलेल्या नागिणी'ची प्रतिमा वापरलेली आहे. कारण जमिनीला अपार संदर्भ असतात. ती पुन्हा पुन्हा तरुण होणारी असते, पुन्हा पुन्हा लेकुरवाळी होणारी असते आणि नागिणीसारखी कात टाकून पुन्हा नव्या तारुण्याने बहरणारी असते. हे सगळे त्या प्रतिमेत सामावते. जीमध्ये उतट झालेली असते स्पर्शसंवेदना, शब्द

ती जिवंत करण्यासाठी असोशीनं धावत असतात.

"जमिनीत आत-आत ओल दाटून आली असते. पाऊसझडीत उनाड झालेला वारा आता थिजू लागलेला असतो. भल्या पहाटे वारा गारठतो. निःशब्द गावाभोवती मूक धुक्याचे आवरण चढत जाते. गावाची नजर चुकवून जमिनीतली ओल हळूच बाहेर येते. गवतावर दवथेंब तरारून येतात. मग पायवाटेवरून चालताना पावलांचे तळवेही हळवे होतात. अनवाणी पावलांची जमिनीशी सलगी होते" (ओथंब पृ. १२४)

एक माणूसपणाचं दुःख, माणूसपणाची ऊब, निसर्ग आणि माणूस यातील अतूट नातेसंबंध ह्या ललितबंधाला घेरून आहे असे दिसते. चिमणीच्या घरट्यात नेलेला जिवतीचा कागद, हळदकुंकू लावलेली वस्त्रं याकडे बाया प्रश्नार्थक पाहात नाहीत कारण दोघींनीही काडीकाडी करून संसार उभा केलेला असतो. पिलं उडून गेली की ह्या बाया आणि चिमण्या एकमेकींना सोबत करतात. लेखकाच्या डोळ्यात एक अनुभवाचं टिकलीएवढं तळं आहे, जे हळूहळू इतके व्यापक होत जातं की अवघे गाव, त्यातील सुखदुःखे, भूमी आणि आभाळ, सारं त्यात मावतं, मावू शकतं.

ललितबंधात अलगद ओवलेली व्यक्तिचित्रे रंगगंधांनी टवटवीत झालेली असतात. त्यात एखादी दंतकथा असते. या दंतकथेकडे बघताना "मनातील सुप्त इच्छांना आलेला गहिवर" म्हणून पाहण्याचे डोळस भावसंदर्भी भान श्याम पेठकरांनी जपले आहे. राजा एका जंगलात सापडलेल्या स्त्रीला राणी करतो. पण पुढे माहेरचे कुणी नाही म्हणून ती नावडती होते आणि आवडत्या तिला नाडतात. मग ती वारुळात हात घालते विषारी नागराज तिला दीड दिवसाचे श्रीमंत माहेर देतो. मग ती सांजेच्या आत परतते. वाटेत लक्षात येते की भावाने दिलेला नवरत्नहार तेथेच राहिला. परतते तर तो हार वारुळाला टांगलेला सापडतो. भासमान माहेर पण खरेखुरे वैभव तिला मिळते. खऱ्या अर्थाने अनुभवश्रीमंतीचा हा उल्लेख आहे. या दंतकथेची लिपी 'जाणीवेच्या स्पर्शाने' वाचता येते असे सुचवून हा ललितबंध वाचकाच्या मनात खूप खोल पाझरत जातो.

या ललितबंधातील प्रतिमासृष्टी फक्त निसर्गमय नाही, ती माणसाच्या अनुभवांशी इमान राखणारी आहे. गावातला पोस्टमन त्याच्या विटलेल्या रंगाच्या बॅगमधून धुरकट चष्मा काढतो, तुटलेल्या दांडीच्या ठिकाणी बांधलेला धागा डाव्या कानात अडकवून पत्र वाचतो. अशी दुसऱ्याची पत्रं वाचू नयेत. पण सासुरवाशिणीची पत्रं पानगळीला बळी पडलेल्या पानांसारखीच." (पानगळ पृ. १४०)

"पानगळ गावात येते तेव्हा गाव उघडे-बोडखे दिसू लागते. बाप गेलेल्या मुलासारखी जंगलात झाडांना सवयच असते बिनभरवशाच्या मोसमांची." (पानगळ पृ. १४०)

'जांभळ्या मैनांचा श्रावण' या ललितबंधात मैना, गवतफुले, श्रावण, सासुरवाशिणी, बांगड्या, कुंकवाचा करंडा असे सारे संदर्भ भेटत राहतात. मग प्रत्येक कौलघरातून 'भुकेचा धूर' निघायला लागतो. भाकरी थापणारे 'सौभाग्य भाकरीच्या कपाळावर आपल्या धन्याचे नाव हाताच्या रेषांनी उमटवू लागते. बांड्या बैलाचा धसमुसळेपणा पाहताना तिला धन्याचा धसमुसळेपणा आठवून आतल्या आत हसायला येते. हे मानससंदर्भ अवघ्या गद्यबंधाला आंतरिक स्पंदनांच्या टिपण्याचे सामर्थ्य आणि काव्यात्म सौंदर्य एकाच वेळी बहाल करून जाते.

अस्सल ललितबंध फक्त वर्णनापाशी थांबत नाही, तो मनाच्या अलवार कोवळ्या अंगांना स्पर्श करीत चिंतनशीलतेचे वेगळे वैभव आशयाशी जोडून टाकत असतो. म्हणूनच लेखक उजेडाच्या प्रार्थनेसाठी दिवे लावण्याची गरज नाही असे सांगतो. "....ज्या जळणाने काजळी धरते ते उजळणे म्हणजे प्रकाशणे नव्हे. ती आग असते. त्याने काजळी धरते. दिव्याच्या जळण्याने काजळ धरते. ते दृष्टी सतेज करते." हे लेखन मनाला साद घालते आणि दाद द्यायला लावते. प्राणपणाने आतून उजळले की सात्त्विक जळणे म्हणजे खरे काय ते कळून जावे.

सगळे संदर्भ संपले की उरतात वास्तवाचे कोरडे, हिशेबी तपशील. 'खतावणी' सारख्या ललितबंधात ऋतूंच्या बेईमानीला दुष्टाव्याचा गिलावा

देणाऱ्या माणसांमुळे गणितं चुकतात आणि सावकाराचं घर भरतं हे संदर्भ येतात. सालदाराचा लेक शहरातील दुकानात काम करायला जातो आणि लेकाच्या सायकलसाठी काढलेल्या कर्जावरचे व्याज वाढू नये म्हणून सालदाराच्या बायकोला सावकाराकडे पडेल ती कामे करावी लागतात. "भागाकाराचे गणित करून संबंधांचे हे सारे गहिवर सांभाळून ठेवावेच लागतात. गावाचे एकीकडे निसर्गाशी तर दुसरीकडे सावकाराशी असलेले बांधलेपण सुचवीत हा ललितबंध वास्तवाची आजची रखरख स्पर्श न करताही सुचवून जातो. कारण बांधलेपण हे दावणीचेही तर आहे. पांडे, पटवारी, तलाठी, तहसिलदार या नव्या बलुतेदारांचा हक्क म्हणून देणे फेडण्यासाठी गावाला 'बीजगणित' करावे लागते, ज्यात मातीची 'भूमिती' बिघडते अशा अस्सल वास्तवाशी नाते सांगत लेखक आपले अस्सलपण सिद्ध करून जातो.

वास्तवाच्या स्पर्शाने या ललितबंधाचे अर्थसामर्थ्य वेगळ्या दिशेने असे वाढवत नेले आहे. ज्याने गाव सर्वांगाने भोगले आहे त्यालाच हे शक्य होते; व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव यांची इथे आठवण होते. निसर्गाच्या लळ्यामधून त्याच्या कळा जाणण्याचे श्याम पेठकरांचे सामर्थ्य मला दुर्गाबाईंच्या वैभवी 'ऋतुचक्रा'ची पुसट आठवण करून देणारे वाटते.

ललितबंधांचे ललितगद्य, लघुनिबंध, ललित लेख, आठवणी, अनुभव हे सगळे प्रकार कालप्रवाहात एकमेकात मिसळत गेले आहेत. व्यक्तिचित्रे, प्रवासलेख, अनुभव यांच्याशी त्यांची घुसळण होऊन वेगवेगळी रूपे सिद्ध झाली आहेत. ही रूपे सिद्ध करण्यात त्या त्या लेखकाचा फार मोठा वाटा आहे. कधी त्यात गद्यप्रभाव वाढतो, कधी काव्यप्रवाह वाटतो पण महत्त्वाचे असते ते त्या लेखनामागे उभे असणारे समृद्ध व्यक्तिमत्त्व. या वाङ्मयप्रकारात संकर घडविण्यास वाव खूप, जीवनस्पर्श आणण्यासाठी लागणारी तपश्चर्याही मोठी आणि त्यातून उमटणारी अनुभव-भावचित्रेही मोठी. शैली हा त्यातला मोठा भाग असला तरी अनुभवाच्या अस्सल जीवनसंदर्भाबरोबर उमाळून येणारीच ती शब्दकळा असते. ती उसनी, तकलादू, बाध्य अशी नसते. लेखनाची जात ठरते ती त्या लेखकाच्या व्यक्तित्वसंपन्नतेमुळे आणि जीवन जगण्याच्या तद्रूपतेमुळे ! प्रत्यक्ष जीवनस्पर्श, जीवनचिंतन आणि त्यातून प्रकटणारे अनुभवाचे आविष्कार यांच्या कसदारपणावर त्याचे स्वरूप ठरते. आविष्काराचे रूपही कधी नुसते बेतलेले नसते. ते लेखनाच्या अस्सल उमाळ्यातून मातीतून फुटणाऱ्या अंकुरासारखे फुटत असते. अनुभवाचे अस्सल रूप, सूक्ष्मता, अनोखेपणा यातून मनामनाच्या पापुद्र्यांची वीण स्पष्ट होत जाते. त्यामुळे प्रत्येक ललितबंधनिर्मात्याचे भान वेगळ्या अर्थाने अनन्यसाधारण असते. कारण त्या प्रत्येक बंधामागे वेगळे चिंतन असते. एकाच झाडाला एकाच रंगाच्या विविध छटांची, विविध आकारांची फुले एकाच वेळी यावीत, ती वेगवेगळी असली तरी एकाच जातीची असावीत तसे एकाच लेखकाने लिहिलेल्या ललित बंधाचे असते.

खोटा आव आणण्यातून ललितबंध मुक्त झाला - १९५० ते १९६० ह्या दशकात. जुन्या रचनांना निरखीत, त्यातील बलस्थाने आपल्या नजरेने शोधीत, त्यात स्वीकार-नकाराच्या निवडीला स्वत्व-स्पर्शाने वापरीत-उजळीत प्रत्येकजण लिहत होता. मग १९५५ नंतर ललितबंधाने खऱ्या अर्थाने कात टाकली. अनेकार्थबदलता, अनेकार्थसूचकता आणि अनेकार्थसंदर्भांची बलवत्ता यातून नवा ललितबंध जन्माला आला. व्यक्तिमत्त्व जितके बहुआयामी, समृद्ध, हळुवार संवेदनशील, चिंतनशील, बुद्धिनिष्ठ तितके लेखन वेगळे. या सर्व सत्त्वगुणांच्या कमीजास्त प्रमाणामुळे ते ते लेखन त्या त्या निर्मितिसंस्कार आणि संदर्भांमुळे वेगवेगळे झाले. गो. वि. करंदीकरांमधल्या कवीने प्रतिमा, उत्कटता यातून त्याला नवे संदर्भ दिले तर इरावतीबाई कर्वे यांच्या मानववंशशास्त्रज्ञाच्या चिकित्सेने आणि दोन विश्वे एकत्र पेलण्याच्या स्त्रीत्वशक्तीने त्यात नवे बळ आणले. विचार आणि चिंतन यांचा अधिक वेगळा स्पर्श त्याला दुर्गाबाई भागवतांनी दिला. भाववृत्तीने त्या लहानशा गद्याला व्यापकता देऊन ठेवली होती

कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या दीपव्रती व्यक्तित्वाने.

अर्थवत्तेचे वेगळेपण, प्रतिमांचे अनाघ्रातपण, भाववृत्तींचे भारलेपण, कलावंताचे मुक्तपण, चिंतनशीलतेमधील अनुभवप्राधान्य, निसर्गाचे गूढ सामर्थ्य प्रत्ययाला आल्यामुळे निर्मितीप्रक्रियेतच निसर्गभानाचा स्पर्श अशा अनेक बलस्थानांमधून ललितबंधांची वाढ झाली. कुसुमावती, इरावती, दुर्गाबाई, व्यंकटेश माडगूळकर, विंदा करंदीकर, विजय तेंडुलकर, श्रीनिवास कुलकर्णी, मारुती चितमपल्ली यांनी या ललितबंधाला एक नवी परंपरा दिली. ललितबंध वाढला, विस्तारला; अधिक चिंतनगर्भ झाला आणि 'नॉस्टेल्जिक' वृत्तीच्या कोशातून अंतर्मुख भावस्थितीचे नवे स्मरणरंजनपर सामर्थ्य फुलपाखरू बनून बाहेर पडले. हे स्मरणरंजन म्हणजे कलावंताचे आपली मुळे तपासणाऱ्या आत्मशोधयात्रेतील महत्त्वाचे टप्पे होते. 'मी' ला 'नवा मी' सापडेपर्यंतची ती एक 'कोसला' अवस्था होती. म्हणून केवळ सौंदर्यानुभव, केवळ विचारवैभव यापेक्षा मानवी जागरूक व्यक्तिमत्त्वाच्या एका शाश्वत भानाकडे हा ललितबंध वळला.

श्याम पेठकर यांच्यासारख्या एकविसाव्या शतकात फुलू लागलेल्या ललितबंधकाराला हे सगळे विशेष आंदण म्हणून मिळालेले असतात. पण त्याचा चांगला उपयोग करून घेत आपल्या आत्मतत्त्वाच्या विस्ताराचा प्रयत्न करणे याबद्दल 'ऋतुस्पर्श'चे ओथंबलेल्या खुल्या दिलाने स्वागत होणे मला महत्त्वाचे वाटते. दमाणी पुरस्काराने तर आता या ललितबंधकाराचे यश ठळकपणे अधोरेखित करून ठेवले आहे.

खरा ललितबंधलेखक शेक्सपिअरच्या व्यापकतेचा वारसदार असतो. वर्तुळाच्या मध्यबिंदूचे नाते वर्तुळरेषेवरील प्रत्येक बिंदूशी सारखेच असावे तसे शेक्सपिअरला मॅकबेथ होता आले, लिअर होता आले, हॅम्लेट होता आले, ज्यूलियस सीझर होता आले आणि लेडी मॅकबेथ, हॅम्लेटच्या बापाचे भूत आणि ऑथेल्लो किंवा चेटकिणीही होता आले तसे ललितबंधलेखकाला सारे काही होता आले तर त्याचे सामर्थ्य अफाट, दीर्घजीवी आणि कालजयी होऊन जाते. मात्र समीक्षेने त्याकडे संमोहनअस्त्र वापरणाऱ्या साध्या माणसाकडे पाहावे तसे न पाहता लालित्याचा सांकेतिक आविष्कार म्हणून न पाहता, आभासी आविष्कार म्हणून न बघता; वाङ्मयीन संमोहनासारखे न बघता व्यक्तित्वाचा अस्सल संदर्भ जोडून व्यामिश्रतेच्या संदर्भातही पाहायला हवे. म्हणजे मग ललितबंध हा वाङ्मयप्रकार आपल्याला समग्रतेने समजून घेता येईल.

'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप' या ग्रंथात 'ललित गद्य' या चंद्रशेखर जहागीरदारांच्या निबंधावरील चर्चेत गणेश देवी यांचे प्रतिपादन या दृष्टीने मला मोलाचे वाटते. ते म्हणतात - "कवितेत सामान्याचं उदात्तीकरण तर नॉव्हेलमध्ये उदात्ताचं सामान्यीकरण होत असेल. ललित गद्यात कदाचित या दोन्हींच्या मध्यावर लेखक कुठेतरी येऊन थांबत असेल. जहागीरदार सलगपणाचा मुद्दा सलगपणे आणि सततपणे मांडत आले आहेत. पण माझं त्यांच्याशी एकच भांडण आहे की, ललित गद्यात ते अपेक्षितात त्यापेक्षा अधिक काव्यात्मता असू शकते आणि ती चांगली असू शकते." (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप पृ. २१८)

ह्या संदर्भात श्याम पेठकरांचे ललित बंध काव्यात्मता सांभाळतो असे म्हणण्यापेक्षा आंतर-सौंदर्यदर्शनाने मनाची असोशी आणि कासाविशी वाढवतो असे म्हणावेसे वाटते; कारण तिथे लेखकाचे काळीज असते आणि काळजापल्याडचे फणा काढणारे दुःखही ! कारण दुःखकाहूर हा अनादिअनंत विषय आहे.

निसर्गाच्या डोहातील अथांग उग्रता आणि कवेतील हिरवी शांतता एकाच वेळी चितारीत जीवनाच्या उगमाचे सौंदर्य आणि अंताचे गहिरेपण पेलून धरीत 'ऋतुस्पर्श'ने काळीजडंखाचे एक वेगळे विश्व खुले करून ठेवले म्हणून श्याम पेठकर अभिनंदनास पात्र आहेत.

■ ■ ■

॥ 'काहूर भैरवी' - तुळशीराम काजे यांची कविता ॥

▸ दा. गो. काळे

ज्येष्ठ कवी तुळशीराम काजे यांचे आतापर्यंत तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'नभ अंकुरले', 'श्रमिष्टाचे शोकगीत' आणि आता प्रसिद्ध झालेला 'काहूरभैरवी' हा संग्रह. खऱ्या अर्थाने 'श्रमिष्टांचे शोकगीत'पासून सुरू झालेला त्यांचा प्रवास, एक शोकात्म भान घेऊन...आज, आताच्या पिढीपर्यंत त्यांच्या स्वतःच्या संथ लयीत 'काहूर भैरवी' पर्यंत आलेला आहे. कविता, आणि एकंदर कवितेविषयीचे प्रश्न, प्रवाह, प्रभावाची चिंता या विषयीची कोणतीही बाधा, त्यांना प्राप्त झालेल्या अनुभवविश्वाच्या प्रकटीकरणासाठी आलेली दिसत नाही. अभिव्यक्तीसाठी संतांच्या कुळातील साधा, सरळ ठसठशितपणा त्यांनी अंगिकारलेला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रयोगाच्या प्रयोजनासाठी त्यांचे अनुभवविश्व रुसून बसलेले दिसत नाही. 'श्रमिष्टाचे शोकगीत' मध्ये 'स्व' आणि स्वेतर विश्वाच्या गाभाऱ्यात निर्माण झालेल्या काहूराला - भैरवीच्या माध्यमातून एक वाट ती करून देते. म्हणून ती आपल्या आसपास पसरलेल्या अथांग दुःखाचे पलीकडे जावून त्याची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न करत असते.

दुःख शाश्वत आहे, म्हणून सतत ते साक्षीला आहे. त्याचा विसर म्हणजे एकंदर कर्तव्यभावनेचा विसर आहे. दुःखाच्या गदगदल्या झाडाला अंत नाही...

कैसें दैव....देव,
देणें दुप्पट जाहले
मरण मागतां,
बीजांतून बीज आले

किंवा,

थांब इथे
...हं ! अशीच
शिल्प मला स्पर्शू दे
मीरेचा विषपेला प्राशू दे
थांबलेत तीरावर क्षणपक्षी
इथुनपुढे
साक्षीला तम आहे.

असे सूचन करून ही कविता श्रमिष्टाचे शोकगीतातून - काहूर भैरवीकडे जाताना दिसते. हे त्यांचे वेगळे असे दोन संग्रह नाहीत त्यांच्या अनुभवसंपन्नतेचा हा विस्तार आहे. म्हणून 'श्रमिष्टाचे शोकगीत' मधील कवितांना टाळून पुढे जाता येत नाही.

कवीला प्राप्त झालेल्या भोवतालामध्ये अनेक घटितं घडत असतात. सभोवताल पसरलेली माणसं, त्यांचं जगणं, परिस्थितीनुरूप त्यांच्यामध्ये वृद्धिंगत झालेल्या वाईट, चांगल्या प्रवृत्ती, लाचारी, सत्ता, दुःख, दैन्य, क्रौर्य, अगतिकता या गोष्टींचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे परिणाम कवीच्या संवेदनशील मनाला अस्वस्थ करीत असतो. त्यातून त्याचं पिळवटून टाकणारं 'म्हणणं' कवितेच्या रूपाने बाहेर येत असतं. कधी तो माणसाच्या अगतिकतेजवळ नम्र होतो, दुःखाने व्यापलेली 'भिंगुळवाणी' स्थिती व्यक्त करतो.

त्या सामूहिक संज्ञेचा वेध घेताना, संतांच्या वैभवाला साजेल अशी शब्दकळा तुळशीराम काजे व्यक्त करतात -

उरलो एकटा
वेढते निराशा
स्थिती, गती, भाषा
आकळेना

बधिरला मेंदू
ओढवेना घाणा
पंढरीचा राणा
भेटवा हो !

कवी स्वतःच्या स्थितीतून समष्टीचे सार्वकालिक भान व्यक्त करीत असतो. अनुभवातून आलेलं प्रत्यंतर सूज्ञ आणि समतौलिकपणे बाहेर पडण्याची घटना, 'स्व'चा एकंदर लोप करणारी असते. कवी सामाजिक उठावासाठी जे शब्द देतो ते लाकांच्या जीवनजाणिवेतून, प्रेरणांमधून उपजतपणे आलेले असतात. त्यांच्याशी संबंधित, असंबंधित घटनांशी कवी स्वतःला जोडून घेत असतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये निर्माण झालेलं काहूर कधी कारुण्यातून श्रद्धेच्या जागा घेतं, तर कधी भोवतालच्या क्रौर्यातून, क्रूरतेतून आलेलं कठोर असं वास्तवही व्यक्त करीत असतंच. 'विश्ववन्ही' ची भाषा त्याला स्वस्थ बसू देत नाही.

गांजल्यांनो आता
पेटवा रे भूक
होवोनिया एक
विश्ववन्ही

हा अन्यायग्रस्त मार्ग राजकीय अस्थैर्यातून येतो. काही टोळ्यांमध्ये सत्तेचे एकवटणे सुरू झाले की त्यांच्यातील सर्वहारा समाजासाठीचा विवेक नाहीसा होण्याची प्रक्रिया सुरू होते. अपरिमित स्वार्थाची मालिका सुरू होते. नीच, भ्रष्ट, ढोंगी लोकांचे राज्य सुरू असताना सामान्य लोक सत्तेच्या परिघावर लोटले जाण्याची प्रक्रिया सुरू होते. आणि त्यातून एक व्यवस्था जन्माला येते, ती सत्याच्या बाजूची कधीच असत नाही. हे राजकीय वास्तवही 'फक्त' या कवितेतून ते व्यक्त करताना दिसतात. यासाठी सामान्य लोकांसाठी 'क्रांती' झाली पाहिजे - याचे सूतोवाचही बऱ्याच कवितांमधून केलेले आहे. त्यामुळे क्रांतीप्रवणता हाही त्यांच्या कवितेचा उद्देश दिसून येतो. समाजरचनेमधील असमतोल त्यांना ठायीठायी अस्वस्थ करीत असतो.

कवी तुळशीराम काजे 'वैदर्भिय' मातीतील आहेत - कष्टकरी आणि शेतकऱ्यांचं दुःख त्यांनी जवळून पाहिलेलं आहे. यातील बहुतेक कवितांमधून शेतकऱ्यांविषयीची कणव दिसून येते, स्वातंत्र्यानंतरच्या एकंदर अवस्थेची जाणीव ते करून देतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्यासंबंधातील भाष्य त्यांनी प्रत्यक्षपणे कवितेतून केलेले नसले तरी - त्यांना दिलेल्या क्रांतीच्या प्रेरणेचे आयुध - आशावादी अवस्थेकडे घेऊन जाताना दिसते. रचनात्मक बदलासाठी प्रवृत्त करणारी शेतकऱ्यांवरील त्यांची कविता आहे -

दिंडीने का मिळे
कापसाला भाव
घालावा तो घाव
मुळावरी

त्याच्या घामावर पोसणाऱ्या 'दलाली' व्यवस्थेचे वाभाडेही त्यांनी काढले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टांचे मोल ते अधोरेखित करतात. प्रसंगी, नागवणाऱ्यास त्याची जागा दाखविण्याची ताकदही त्यांनी उभी केलेली आहे. दुःखाच्या निर्मितीचे मूळ कशात आहे, याचे भान त्यांना आहे. 'अज्ञानवंत, आस, मातीमोल, ह्या सारख्या काही कविता पाहण्यासारख्या आहेत.

वैश्विकरणाची प्रक्रिया केव्हाचं सुरू झाली आहे. खेडी ग्लोबल होत असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती विपरीत आहे. मूलभूत गरजांपासूनही माणूस वंचित आहे. विजेअभावी खेडी अंधारात चाचपडत आहेत. पाण्याचा ठावठिकाणा नाही. या पार्श्वभूमीवरील 'खंगलेला गाव' ही कविता भारतवर्षाचे प्रातिनिधिक चित्र उभं करते. वैश्विक पार्श्वभूमीही अशीच -

कोण वाढवितो
अस्त्रांचे ढिगारे ?
विषयुक्त वारे
कोणासाठी ?
राक्षसी सत्तेचा

व्यवहार हा चोख
विश्वाची या राख
खाणार का ?

जगातील महासत्ता याप्रकारे जीवनात अंत घडवित आहेत. सर्व स्तरावर शोषणाची प्रक्रिया सुरू आहे. महासत्तांविरुद्ध लहान देश, शहरांविरुद्ध खेडी, अशा झुंजी लावल्या जात आहेत. एक अनामिक दहशत सर्वत्र भरून राहिलेली आहे. ही संबंध प्रक्रिया अंधाराची ओढ असणारी आहे. असे कवीला सुचवायचे आहे. 'ग्लोबल वार्मिंग'चे भयसूचक परिणामही या परिस्थितीत माणसाचं अस्तित्व नष्ट करण्याइतपत वाईट आहेत. मग आपल्यासारख्या सामान्य माणसाकडे काय आहे ?

'ठेविले अनंते
तैसेंची राहावे'
रक्त शोषूं द्यावे
शांतपणे !

असेच म्हणावे लागते.

तुळशीराम काजे यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या लौकिक अशा चिंतनाबरोबर, मानवी अस्तित्वासंबंधी अलौकिक असं विश्वही त्यांच्या कवितांचा अर्थपूर्ण गाभा आहे असे जाणवते.

माझे कोण ? पुढे काय ? तुकड्यांच्या शिळ्या राशी
लूत भरलेली कुत्री घोटाळती प्रेतापाशी

जन्माच्या सोडवणुकीतून हाताला लागलेलं आयुष्य, जगाला सामोरे जाताना पडणारे अनेक प्रश्न, जगात चाललेल्या व्यवहारांचा, चांगल्या, वाईट गोष्टींचा अन्वयार्थ लावत, स्वतःला सतत तपासणं - हा या कवितांचा कवीचा छंद आहे. देहभर रुजलेला वासनायुक्त विखार, त्यातून ओसंडणारे अनवट विकार, अवती भोवतीच्या-अवकाशात सर्वत्र व्यापून असलेले पाहतांना त्यांचे मन कासावीस झाल्यावाचून राहत नाही. ह्या देहभर पसरलेल्या - मनाला कातिणीच्या जाळ्याची उपमा त्यांनी दिली आहे. प्रत्येकाने - आपल्याभोवती असे वासनेचे जाळे विणलेले आहे. त्यात सावजाची वाट पाहत, टपून बसणे फक्त त्या मनाला माहीत आहे. सर्वदूर न फिटणाऱ्या काळोखाचे राज्य येण्याची स्वप्नेच आपण सगळी पाहत आहोत, असे वास्तवही त्यांच्या लेखणीने अधोरेखित केले आहे. गेल्या शतकाचे संदर्भही देऊन पुढील काळाच्या गर्भातील असतेपणात आभासाचेच डौल आहेत; त्यामुळे निश्चित केलेल्या भवितव्यामध्ये कुठल्याच अर्थाच्या शक्यता जन्म पावतांना दिसणार नाहीत. सगळे फोलपणंचं दृष्टोत्पत्तीस येते.

'श्वासात आभास
पायावीण भिंत
गेल्या शतकांचे
फोल उदयास्त'

सर्वदूरपणे किडलेल्या व्यवस्थेचे पडसाद घुमत आहेत. त्या व्यवस्थेचा पायाच खोल अशा गर्तेतून वर आलेला नसताना; भवितव्याची स्वप्ने - केवळ स्वप्नेच राहण्याची खंत त्यांना आहे.

कवितेमधून प्राधान्याने व्यक्त झालेल्या सामाजिक बांधिलकीचा स्वर उपरा नाही. त्यांनी जवळून पाहिलेलं दुःख नुसत्या भळभळून वाहणाऱ्या जखमांचे स्रोत नाहीत. असलेल्या दुःखाची कारणे आणि सबळ अशी क्रान्तीदर्शी, दूरगामी चाहूलही त्यात पदोपदी साकारत असते. त्यांना आलेल्या 'कळवळ्याला' यथार्थ असे भान आहे. ते कवितेमधून आलेले आहे.

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे जग त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने आले आहे. व्यवस्थेपायी होणारी होरपळ आणि आर्थिक विषमतेची दरी त्यांना स्वस्थ बसू देत नाही. त्यातून संघर्षाला प्रवृत्त होण्यासाठीचे आवाहनही ते करतात. 'सावधानते'चा इशारा जाहीरपणे मांडताना त्यांची कविता 'बंडखोर' होताना दिसते. त्यातून त्यांची समाजाप्रती असलेली निष्ठा, बांधिलकी, धारणा स्पष्ट होत जाते. सश्रद्धतेपोटी निघालेली करुणा कवितेचे रुप घेते.

'दगडाच्या देवा
सुवर्णाच्या घंटा
श्रमिकांच्या भाळी
फिरे वरवंटा'

एकंदर व्यवस्थेबद्दलची चीडही कडवट असे सत्य प्रगट करताना कचरत नाही. त्यांच्या शब्द सामर्थ्याचा ओघ वेगवान रुपही धारण करतो -

घोषणा....वल्गना खंडीभर
पण प्रत्यक्षात कोरडा वारा
रक्तशोषक ढेकूण, डास
आहेत वेढून घरादारा
खरे तर, लोकशाहीत जमावी
प्रत्येकाने आपापली संस्कृती
पण वळवळतात विकृतीचे गोडवे
धर्म, कर्म, नासवून थोतांडी
भोंदताहेत विनम्र भावे

कवी अंतर्बाह्य चाललेल्या संघर्षाचा धनी असतो. आत आणि बाहेरील दोन्ही स्तरावर त्याचा सतत संघर्ष सुरू असतो. 'स्वेतर' विश्वातून प्राप्त झालेले अनुभवविश्वाचे संचित - एक कलावंत म्हणून त्याच्या अस्तित्वाची तयार असलेली मूस, या बळातून मिळणाऱ्या अंतःप्रेरणांचा 'साकव' तो निर्माण करीत असतो. अनुभवातून निर्माण केलेली संहिता सर्वस्पर्शी, सर्वगामी अवस्था असते. या पार्श्वभूमीवर 'वैतागवणवा' मधील ह्या ओळी - दोन वेगवेगळ्या स्थित्यंतरातील, दोन अवकाशामधील, निसर्गाच्या आणि शारीर स्थितीगतीतील साम्य प्रगट करताना दिसतात -

दिस काळजात काचा
रात्र मुकी बंद वाचा
मन तेजाब जळते
तन ढगाळ लोंबते

मानवी जीवनातील जन्म, तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व व मरण या चार जीवनावस्था अनुक्रमे सांगितल्या आहेत. त्याचा संबंध दिनचक्र, ऋतुचक्रातून थेट जीवनचक्राशी लावण्यात आला आहे. वरील चार जीवनावस्था व्यक्त करणाऱ्या या दिवस, ऋतुंच्या, प्रहरांच्या कथांमधून अनुक्रमे सुखात्मिका, शोकात्मिका या साहित्यप्रकारांचे आदिबंध उद्भवलेले आहेत. अशा प्रकारचा विचार समीक्षेच्या दृष्टीकोणातून 'नॉरथाप फ्राय' या साक्षेपी समीक्षकाने आपल्या स्वतंत्र दृष्टीतून साहित्यगत-आदिबंधासंबंधी मांडलेला आहे. तिच्यामागे त्यांचे वाङ्‌मयीन मानवशास्त्राचे (लिटररी ॲन्थ्रॉपॉलॉजी) प्रमेय उभे आहे. ह्या सगळ्या गोष्टी त्यांनी साहित्य प्रकाराला लावून दाखविल्या आहेत. ('समीक्षेची नवी रुपे' - प्रा. गंगाधर पाटील)

सांगण्याचे प्रयोजन असे की, व्यक्त, अव्यक्त, सगळा-भोवताल, त्यातील दृष्ट आणि सृष्ट सर्व शक्तीनिशी कलावंताच्या नेणिवेमध्ये 'मिथ'च्या रुपाने दडलेले असतात. आपल्या प्रातिभिक शक्तीद्वारे तो ते अर्थवाही करीत असतो. दिवस-रात्रीचा परस्पर संबंध, जीवनजाणिवेशी जोडून कवितेला अर्थपूर्णता, अर्थसघनता काजे यांनी प्राप्त करून दिली आहे.

काजे यांची कविता काही निर्वाणीच्या क्षणी कठोर झाली असली तरी, अंतस्थ असा एक नम्रपणा त्यांच्या केन्द्रानुवर्ती जाणिवेमध्ये, स्थायीभावासारखा वसलेला आहे. त्यांच्या अनेक कवितांमधून तो अनुभवास आल्यावाचून राहत नाही. आयुष्यभरासाठी शिक्षकी पेशा त्यांनी पत्करला होता. शिक्षकाच्या भूमिकेतून, शिकविणे हा स्थायीभाव असला तरी, कोणत्याही प्रकारचे साधन म्हणून धडे त्यांच्या कवितेने दिले नाहीत. ती एक साध्य बनून त्यांच्या आयुष्यामध्ये अवतरल्यासारखी भासते आहे. अनुभवातून शिकत राहणे. अगदी कवितेच्या संदर्भात सुद्धा, त्यांनी केलेले भाष्य एका कवीचे, कलावंताचे शिकणेच अधोरेखित करते -

या अशा चकव्याच्या
भाषेत
कविता म्हणजे तरी काय ?
अनर्थातून
अर्थ पसरत जाय
क्षितिजापलिकडे
वर दूध खाली साय
कविता म्हणजे तरी काय ?

हा संभ्रम नाहीच, अनुभवलक्षी आत्मभानातून आलेली ज्ञानाच्या उपरतीची कवाडे आहेत. कवीचा प्रवास सतत अधिक पारदर्शित्वाकडेच, सत्याकडे होत जातानाचा असतो. त्याप्रमाणे काजे यांची कविता अनुभवाच्या खोल तळात डोकावण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे, असे त्यांचे एकंदर कवितेसंबंधीचे अनुबोधन दृष्टोत्पत्तीस येते.

एकंदर कविता आणि कविताधर्मी पिढीबद्दल त्यांना अत्यंत आदर आहे. कवितेतून प्राप्त झालेलं भान जीवनवादी संकेताकडेच निर्देश करताना दिसते. त्यांच्या अनुभवाच्या केन्द्रस्थानी चालत्या बोलत्या

माणसांचा वावर सदैव आहे. त्यांच्या कवितेचा आलेख पाहताना असे म्हणता येईल 'भ्रमिष्टाचे शोकगीतातून' ध्वनित झालेली स्थिती मानवी अस्तित्वाचा अनवट असा अंधार घेवून प्रगटली होती. त्यांना प्राप्त झालेले प्रदेश भ्रमिष्ट अशा मनस्थितीतील - रुदनाचे - अलौकिक प्रदेश होते. धूसर अशा अनुभवाला मूर्त स्वरूप देताना - कवितेच्या केन्द्रस्थानी असलेली मानवी सृष्टी - या अंधारातून - काहूरातून शोधून आपल्या कवितेला योग्य अशा बळाने प्रस्तुत करते. आपली 'माणसासंबंधीची' जीवन जाणीव कवितानुभवाला साजेशा संरचनेमधून मांडून ठेवल्यासारखी सचेतन अशी ही कलावृत्ती आहे.

आडवळणाच्या खेड्यात सबंध आयुष्य घालवूनही, त्यांच्या समकालीन वास्तवाबद्दल ते सतत सजग राहिलेले आहेत. अंगोपांगासह मित्रत्व समजणे - एखादी व्यक्ती गुणवैशिष्ट्यासकट उभी करणे - क्वचितच साधण्यासारखी गोष्ट आहे. या संग्रहातील 'सदानंद रेगे' यांचेवरील कविता - वाचण्यासारखी आहेच. एखाद्या व्यक्तीला निश्चित अशी 'फ्रेम' देणे, त्याच्या आत्यंतिक प्रेमाची कबुली देण्यासारखी सुंदर गोष्ट आहे, खरी प्रेमपूर्ण श्रद्धांजली आहे.

तू काळोखाची पिसे खोवणारा
मस्त कलंदर
विक्षिप्तपणाचा तुला बहरावर बहर
तुझ्या अक्षरवेलीस
क्रुसावरून उतरून येशूने घातले पाणी,
कधी बुद्धही बसला
तिच्याखाली पद्मासनी
रानभर भरारलीत गंधर्वगाणी
शेवटच्या क्षणी तू काय आठवत असशील
सत्यकथा
की - तुकोबाची गाथा ?

जनमानसामध्ये पसरलेल्या आश्वासक अशा अंधाराचा पट 'काहूर भैरवी' मध्ये तुळशीराम काजे यांनी उघडा केलेला आहे. भैरवीच्या पोटी पुन्हा गीताचाच जन्म होतो. ते शोकात्म असेलही कदाचित परंतु धीरोदात्त असे कवच घेऊन, सतत मानवी अस्तित्वाभोवती नव्याने फुलत, झुलत असते. त्या अंधारभयाचे निराकरण करण्यासाठी आपण आपल्या परीने काही देणे लागत असतो. तसे देणे या कवीने या अथांग पसरलेल्या अंधाराला दिले आहे. हे देणे बाकी असतेच, वारंवार जन्मणाऱ्या पिढ्यांसाठी हे जीवनचक्र असेच असणार आहे -

होते काही देणे
त्याचसाठी
येथे झाले येणे -
फिटले न देणे
त्याचसाठी
वारंवार येणे -

'सत्यकथे'च्या साक्षेपी संपादकीय पोषण काळातील कवितेसंबंधीच्या निष्ठेने भारलेली ही कविता आहे. त्यांची कवितेबद्दल स्वत:ची अशी स्वतंत्र दृष्टी आहे. प्रयोगशील न होता, आपली अभंगवृत्ती आयुष्यभर जपताना - प्रत्यक्ष जीवनाकडे आशयसंपृक्त परिपूर्णतेतून ते पाहताना दिसतात. कोणत्यातरी परंपरेमध्ये सरमिसळून जावी अशी तिची वृत्ती नाही. स्वतंत्र असे अस्तित्व तिने आपसूकपणे जोपासलेले आहे.

'अल्पाक्षरत्व' हा तिचा आत्मा आहे. आशय व्यक्त करण्यासाठी योग्य, अचूक शब्दांची निवड ते लीलया करतात. त्यातून कवितेसंबंधीची निष्ठा व जीवनदृष्टीचा आलेख प्रत्ययास आल्याशिवाय राहत नाही. तेच तिचे मोठेपण आहे.

■ ■ ■

('काहूरभैरवी' - तुळशीराम काजे. काजे प्रकाशन
झेंडा चौक, राजापेठ, अमरावती
मे २००७, पृष्ठे ८०, किंमत १०० रु.)

अनुक्रमणिका

।। विदर्भातील नाटककार ।।

◗ उषा मा. देशमुख

'विदर्भातील नाटककार' या जिव्हाळ्याच्या विषयावर गेली अनेक वर्षे सौ. प्रतिभाताई कुळकर्णी संशोधनाचे काम करीत होत्या हे मला माहिती होते. पण आज इतक्या देखण्या स्वरूपात आणि भरगच्च मजकूर असलेला ग्रंथच त्यांनी पाठविला त्यामुळे खरोखरच अतिशय आनंद झाला. रंगमंचावर नाट्याशयाचे सादरीकरण होतांना जशी नेपथ्याची वैभवशाली मांडणी केलेली असते त्या प्रमाणेच या ग्रंथांची मांडणी नुसती मोहक नाही किंवा नुसती नेत्रसुख देणारी नाही तर अभ्यासपूर्ण अशी आहे. मुखपृष्ठ, मलपृष्ठ, नाटककारांची आणि कलाकारांची दुर्मीळ छायाचित्रे, भरगच्च माहिती आणि प्रत्येक नाटककाराची वैशिष्ट्यपूर्णता स्पष्ट करणारी आहे. कागद, छपाई, मांडणी, विभागणी, अनेकरंगी छायाचित्रांची योग्य निवड, टाइप, मांडणी, बांधणी सर्वच बाबतीत मराठीतील अग्रेसर ग्रंथप्रकाशनाच्या पंक्तीत हा ग्रंथ जाऊन बसतो इतका तो देखणा झालेला आहे आणि त्यामुळे लगेच वाचावासा वाटतो. माझ्यासारख्या वाचकास तशी सवय नाही त्यामुळे मराठी प्रॉडक्शनही सर्व निर्मितिमूल्यांनी वैशिष्ट्यपूर्ण होऊ शकते हे या संकलनाने सिद्ध केले आहे आणि त्यामुळे मराठी वाङ्मयाचेही प्रकाशक असे ग्रंथ काढू लागले आहेत याचा अभिमान वाटतो व त्यानिमित्ताने त्यांचे अभिनंदन करावेसे वाटते.

तीन भागात हे संकलन विखुरलेले आहे. पहिल्या भागात मराठीतील ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांची प्रस्तावना आहे, आचार्य अ. द. वेलणकरांचे मोलाचे बोल आहेत, प्राचार्य शेवाळकरांची शाबासकी आहे आणि लेखिकेचा परिचय आणि त्यांचे मनोगत आहे. दुसऱ्या भागात सारस्वतिजन्मभू असलेल्या विदर्भातील वाङ्मयीन पर्यावरणाचा धावता आलेख आहे. विदर्भातील मराठी रंगभूमी आणि विदर्भातील काही भागातील नाट्यविश्व आणि नाट्यचळवळ यांच्या संदर्भात अल्पसा परिचय घडविला आहे. त्यामुळे फार चुटपूट लागते. विदर्भातील नाटककारांचा शोध घेताना शहरे, तालुक्याची ठिकाणे, गावे, वस्त्या याठिकाणीही नाट्यप्रयोग हौशी मंडळी करीत असतात. त्यांचाही शोध सौ. प्रतिभाताईंनी घ्यावा. गेल्या शंभर वर्षात नाट्यसंमेलनात आणि साहित्यसंमेलनात झालेल्या नाटकांच्या नोंदीतूनही हा संदर्भ मिळू शकेल. तिसऱ्या भागात नागरी, दलित, झाडीपट्टी, स्त्रिया, पथनाट्य, बालनाट्य यांच्या नाट्यनिर्मितीच्या नोंदी केलेल्या आहेत. परिशिष्टात जन्मकालाप्रमाणे आणि सर्वसमावेशक अशी सूची आलेली आहे. परिशिष्टाच्या दुसऱ्या भागात संदर्भग्रंथ, संदर्भ लेख, संदर्भ नाटके, स्थलवर्णानुसार नाटककारांची सूची, नाट्यविषयक कायदे, नाट्यप्रयोग सादर करण्यासाठी करावयाची पूर्तता स्पष्ट करून ग्रंथ संपादिला आहे. येथे विदर्भातील नाटकमंडळ्या, नाट्यसंस्था, यांचाही परिचय यात हवा होता. रंगकर्मींची माहितीही फार मोलाची ठरली असती.

वैदर्भीय रंगभूमीच्या इतिंहासलेखनाचा दस्तऐवज असे या ग्रंथाला म्हणता येईल. ग्रंथ चांगला झालेला आहे पण एकाएका नाटककाराच्या नाट्यकलेचा विश्लेषणात्मक विचार झाला असता तर या ग्रंथाचे संदर्भमूल्य अधिक वाढले असते. अर्थात अजूनही दुसरा ग्रंथ सिद्ध करून सौ. कुळकर्णी यांना तसे करता येईल. तसेच संपूर्ण नाट्यविश्वात वैदर्भीय नाटककारांचे योगदान काय आहे ? आणि त्याचे स्वरूप कसे आहे, काही चारदोन नावे वगळता ताकदीचे नाटककार निर्माण का झालेले नाहीत, हाही शोध घेणे अगत्याचे ठरते. तरीही ज्यावेळी सौ. प्रतिभा कुळकर्णी यांच्या 'विदर्भातील नाटककार' या ग्रंथाला लक्षात घ्यावेच लागेल इतका तो महत्त्वाचा ठरतो. बाईंनी अजूनही लेखन न थांबविता नाटकांचा शोध घ्यावा कारण त्यांच्या नावाप्रमाणे प्रज्ञाप्रतिभा त्यांना प्रसन्न आहे हे त्यांच्या इतर ग्रंथांतूनही लक्षात येते. मूलगामी स्वरूपाचे लेखन त्यांनी करत रहावे हीच शुभेच्छा !

■ ■ ■

॥ साभार पोच ॥

(१) आतबाहेर सर्वत्र (कविता) - विजय चोरमारे, मैत्र प्रकाशन, पिनाक मेमरीज, भुजबळ गार्डन्स, कोथरूड, पुणे-३८, पृष्ठ १०४, मूल्य १०० रुपये (मे २००७)

(२) ओझोनच्या सावलीत (कविता) - वासुदेव श्रीरंग जोशी, राजहंस प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे-३०, पृष्ठ ७८, मूल्य ६० रुपये (सप्टेंबर २००७)

(३) उजेडाच्या कविता - भूषण रामटेके, प्रजा प्रकाशन, जेतवन, लुंबिनीनगर, पुलगाव, जि. वर्धा, पृष्ठ ७२, मूल्य ७५ रुपये (मे २००७)

(४) काहूर भैरवी (कविता) तुळशीराम काजे, काजे प्रकाशन, झेंडा चौक, राजापेठ, अमरावती, पृष्ठ ८०; मूल्य १०० रुपये (मे २००७)

(५) रंगवेध (नाट्यविषयक लेख) - डॉ. सुनंदा देशपांडे, नीहारा प्रकाशन, ९८५, सदाशिवपेठ, भूपती कॉम्प्लेक्स, पुणे-३०, पृष्ठ १९२, मूल्य १८० रुपये (जानेवारी २००७)

(६) धगीवरची अक्षरं (कविता) - उत्तम अंभोरे, संबोधी, ५३, समर्थनगर, जालना-४३१२१३, पृष्ठ ८०; मूल्य १०० रुपये

(७) कादंबरीकार अरुण साधू (समीक्षा) - डॉ. रामदास इंगळे, चिन्मय प्रकाशन, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, औरंगाबाद, पृष्ठ ३५२,मूल्य २८० रुपये (फेब्रुवारी २००७)

(८) जागतिक रंगभूमी खंड १ (पूर्वरंग) आणि खंड २ (पश्चिमरंग) - माणिक कानेड, रोहन प्रकाशन, धवलगिरी, ५, शनिवारपेठ, पुणे-३०, पृष्ठ १५६ आणि २१८ मूल्य १२० आणि १५० रु. (जून २००७)

(९) वऱ्हाडी लोकभाषा (भाषाशास्त्रीय अभ्यास) - प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, फुलोर, नारायणनगर, दर्यापूर, जि. अमरावती, पृष्ठ १६०, मूल्य १०० रुपये (मे २००६)

(१०) ओले मूळ भेदी (तुकारामांच्या अभंगांविषयी लेख) - डॉ. एस. एम्. कानडजे, स्वरूप प्रकाशन, अक्षर, सह्याद्रीनगर, सिडको, औरंगाबाद, पृष्ठ ९६, मूल्य ८० रुपये (सप्टेंबर २००६)

अनुक्रमणिका

॥ पत्र-परिषद् ॥

श्री. पु. भागवत यांची दोन पत्रे

२०.११.८७

डॉ. सौ. आशा सावदेकर यांस

सप्रेम नमस्कार वि.

मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्षपद मिळाल्याबद्दल माझे अभिनंदन करणारे आपले पत्र मिळाले. फार आभारी आहे.

महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मोठी आहे खरीच. ती सोपीही नाही. माझा अधिकार व कर्तृत्व यापेक्षा आपल्यासारख्या स्नेह्यांच्या सदिच्छा व सहकार्य यांच्या आधारावरच मी ती अंशतः तरी पार पाडू शकेन अशी उमेद मला वाटते. म्हणून आपल्या सद्भावना वाढाव्या अशी विनंती करतो.

पुन्हा एकदा पत्राबद्दल आभार मानतो.

आपला

श्री. पु. भागवत

ता.क.

खूप दिवसांत तुम्ही समीक्षालेखन केले नाही ? की माझ्या वाचनातून ते निसटले ? माझे वाचन पूर्वीइतके सावध राहिले नाही खरे. पण तुमचे नाव दिसले तर तो लेख व परीक्षण वाचल्याशिवाय सहसा पुढे जात नाही.

श्री. पु. भा.

२.११.९४

सप्रेम नमस्कार वि.

तुमचे ५ मेचे पत्र मिळाले होते; पण तुमच्या लेखांची कात्रणे वाचून मग उत्तर लिहावे म्हणून त्यात ते राहून गेले. मे-ऑगस्ट महिन्यांत प्रकृतीही बरी नव्हती. ती अलीकडे वारंवार तक्रार करू लागली आहे. वयोमानाप्रमाणे ते स्वाभाविक आहे. पण त्यात ठरवलेली कामे मागे पडून साचतात आणि त्याचे अवघड वाटते. पण इलाज नाही.

तुमचे लेख त्या कारणानेच वाचायचे राहून गेले. तुम्ही आपल्या समीक्षालेखांचा संग्रह प्रकाशित करण्याचा विचार करीत आहा ही स्तुत्य गोष्ट आहे. त्यासाठी खरोखर माझ्या अभिप्रायाची गरज नाही. तुमचा समीक्षालेख प्रसिद्ध झालेला पाहिला की मी सामान्यतः तो वाचतो. वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या स्फुट परीक्षणलेखांपेक्षा तुमचे लेखन वेगळे असते आणि मला ते आवडते. मला वाटते, मी ते तुम्हांला सांगितले आहे. आपल्या समीक्षालेखनाला तात्त्विक भूमिकेचा वजनदारपणा आणण्याचा तुमचा प्रयत्न असतो तो मला महत्त्वाचा वाटतो, आपल्याकडील समीक्षालेखन एकतर आवडनावड सजवून सांगण्यात गुरफटते, किंवा दुसऱ्या टोकाला जाऊन एखाद्या तात्त्विक समीक्षापद्धतीच्या परिभाषेच्या जाळ्यात फसते. ललित वाङ्मयाच्या रसिक वाचनाने आणि व्यासंगपूर्वक धारण केलेल्या तात्त्विक भूमिकेचा कणा लाभल्याने ते सुसंस्कृत झालेले नसते. मला वाटते, या दोन्ही शक्ती चांगल्या समीक्षालेखनात व्यक्त होतात. तुमच्या लेखनाची दिशा या उभयविध शक्तींचा समतोल व समन्वय साधण्याकडे आहे असा, मी जे वाचले आहे त्यावरून, माझा ग्रह झालेला आहे. मला स्वतःला ती दिशा श्रेयस्कर वाटते. तुमचे लेख वाचले असते, वा समोर असते, तर मी हे सोदाहरण लिहू शकलो असतो. आणखी एक महत्त्वाची गोष्ट जाणवली आहे, तीही

सांगतो. तुमच्या लेखनात समीक्षकाचा अंतिम मूल्यमापन करीत असल्याचा आव नसतो, ललितकृतीचा, शरणभावाने सामोरे जाणे, मोकळ्या व रसिक वृत्तीने तिचा आस्वाद घेणे; सौंदर्यप्रत्यय हा मूलत: व अंतिमत: व्यक्तिनिष्ठ असतो आणि त्याचा विनिमय पूर्णपणे करता येत नाही याचे भान ठेवणे; या विनिमयाच्या अपरिहार्य गरजेतून व प्रयत्नातून समीक्षा व तिच्या विविध पद्धती जन्माला येतात, त्या आपापल्या भूमिकांतून कलाकृतीचे विश्लेषण व मूल्यमापन करतात आणि त्या कमीअधिक वैध व पर्याप्त असतात हे जाणणे; आणि कोणतीच पद्धती कलाकृतीच्या प्रत्ययाचे नि:शेष विश्लेषण व निर्णायक, निर्विवाद मूल्यमापन करू शकत नाही हे ओळखणे; आणि अखेरत: या सौंदर्यप्रत्ययाचे प्राथम्य व सार्वभौमत्व मानणे; - अशा काही गोष्टी चांगल्या समीक्षकाच्या ठायी असाव्यात असे मला वाटते. त्याच्या वाचनाला तर भाषेची व विषयाची अटक नसावी. हे शंभर टक्के साधणे कोणाला क्वचितच जमते हे खरे, पण समीक्षकाची वाटचाल त्या दिशेची असावी.

तुम्ही म्हणाल, की मी दोन समीक्षालेखांवरचे मत विचारले, तर यांनी पुराणच लावले. वर म्हटले त्याप्रमाणे, व त्या कारणामुळे, हे विशिष्ट लेखांबद्दल मत नाही खरे. ती सर्वसाधारण अपेक्षा समजा. काहीशी अनधिकारी.

बाकी ठीक. लोभ ठेवावा ही विनंती.

आपला

श्री. पु. भागवत



॥ काही उर्दू कविता : आजकालच्या ॥

[सर्व कवितांचा अनुवाद : एन् के.]

साप : कैफी आजमी

हा साप होता जो फणा उगारून
माझी वाट अडवून उभा आहे.
चंद्रावर ज्या दिवशी पाऊल पडले होते माझे
त्याच दिवशी मी याला मारून टाकले होते
उपटले होते सगळे दात ठेचले होते डोकेही
शेपूट चेचले होते आणि मणके तोडले होते

पण वाकून पाहिले मी चंद्रावरून
तर त्याचे शेपूट हलू लागले होते
थोडा थोडा तो सरपटूही लागला होता

हा घासत घसरत सरपटत
जुन्या शिवालयाकडे गेला
जिथे याला पाजण्यात आलं दूध
पंडितांनी अनेक मंत्र म्हटले असे
हा बदमाश जिवंत झाला पुन्हा
शिवालयातून निघाला फुत्कारत
पृथ्वीच्या नाडीत डंख मारत

पुन्हा सरसावलो मी की ठेचू
निर्दय पावलांनी याला चिरडून टाकू
जवळ एक उजाड मशीद होती
तिथे आश्रय घेतला याने
तिथे पेट्रोलने याला न्हाऊ घालण्यात आले
गळ्यात टाकण्यात आला सुंदर तावीज
माणूस शतकांच्या नंतर पोचला ज्या उंचीवर
त्याहून उंच याचा उदोउदो झाला सुरू

उसळून हा जाऊन पडला चर्चच्या उंबरठ्यावर
जिथे याला चढवली होती सोन्याची कात
याच्या छातीवर मढवला चांदीचा क्रूस

ज्याने दिला संदेश जगाला शांतीचा
त्याच्या गावात नव्या रचनेच्या नावावर
याला दिले युद्धाचे प्रशिक्षण
गळ्यात घातल्या बॉम्बच्या माळा
आणि ऐटीत मिरवणूक काढली याची अशी
धरती सावली पडली याची
तर धरतीची गती होऊ लागली अवरुद्ध
पृथ्वीपासून आकाशापर्यंत पसरू लागला
तिमिर आणि तिमिर फक्त
की चंद्रताऱ्यांची मान गेली खाली

नाण्यांचे बंदी झाले विज्ञान
आणि ज्ञानावरचा उडाला विश्वास
आणि त्या सापाला मिळाले नवजीवन
ज्याला जहाका[१]च्या खांद्यावर पाहिले होते आम्ही
हा ना हिंदू आहे ना मुसलमान
हा दोघांचेही मेंदू आणि रक्त चाटतो
जेव्हा हिंदू आणि मुसलमान माणसं होतील
हा बदमाश मरेल त्या दिवशी आपोआप.

(संदर्भ १. जहाक पुराणकथेतील राजा, ज्याच्या खांद्यावर साप उगवला होता आणि तो रोज एका निरपराध व्यक्तीचा मेंदू खात असे.)

एक कविता : शहरयार

तुमच्या शहरात काहीच घडले नाही काय
तुम्ही खरंच कसलाही आक्रोश ऐकला नाही काय

देवाची सृष्टी अशी अचानक थबकली कां
इथून पुढे काही मार्गच आता नाही काय

रक्तबंबाळ करताहेत सगळेजण सूर्याला
इथे कुणालाही रात्रीची भीती नाही काय

नवल वाटते इथल्या ज्येष्ठ नगरप्रमुखाचे
जे होत आहे ते त्याला काही दिसत नाही काय

होऊ दे उद्ध्वस्त वेड्या जे होत आहे ते
उद्ध्वस्त झाले शहर ते पुन्हा वसलेच नाही काय

दंग्याचे कारण : महताब हैदर नकवी

नगरप्रमुखांना सांगा
की उंच करा
आणखी नगराची तटबंदी
आणि सर्व रस्त्यांवर बसवा
चौक्यापहारे.
पाहा की
स्वप्न तर तरळत नाहीत ना
काही डोळ्यांमध्ये ?
पण कुठूनतरी
स्वप्नांचं पीक स्मगल
होत आहे नगरात.
भलेही ही गोष्ट नसेल फार धोकादायक
पण माननीय नगरप्रमुख
नगरातील थोर महाजनांच्या गाढ निद्रेत
येऊ शकतो यामुळे व्यत्यय.
माहीत आहे ना
नगरात गतवर्षी झालेल्या दंग्याचे
हेच कारण होते.

दोन कविता : असलम हसन

(१) गुजरात नंतर प्रत्येक दिवस

गुजरातनंतर प्रत्येक दिवशी
शोधतो जमावामध्ये माणूस,
दगडी निर्जीव डोळ्यांत स्वप्न
आणि विझलेल्या ठार राखेत
पाशवी अग्नी....

गुजरातनंतर प्रत्येक दिवशी
शोधतो दिशादिशा, मोकळे आकाश
दूरवर अंथरलेली जमीन
आणि पऱ्यांप्रमाणे उडणारी हवा

गुजरातनंतर प्रत्येक दिवशी
पाहतो बाहेर डोळे किलकिले करून -
अग्नी निर्माण करणारे
गुहेतील रहिवासी,
आणि आपल्या संकीर्ण गुहेत
सावध होतो स्वत:च्याच पदचापांनी...

(१) गुजरात नंतर प्रत्येक रात्र

गुजरातनंतर प्रत्येक रात्री
झोप उडते अचानकच
वाटतं बाहेर हजार कुत्रे भुंकताहेत
समूहस्वरात,
अंगणात धुराचे लोट उठताहेत
आणि आपल्यात हाडे वितळत आहेत

गुजरातनंतर प्रत्येक रात्री
झोप उडते मधूनच
भीतीची लहर पसरते नसांमधून
ओरडू पाहतो पण
आवाज अडकतो घशात
जणू कोणी गळ्यामध्ये टाकलंय
जळते टायर

गुजरातनंतर प्रत्येक रात्री
नेहमीच
जागी होते दचकून
बाजूला झोपलेली आशाळू पत्नी
खलखला हलवून म्हणते
अहो ऐकता का
मुन्नाने हातपाय हलवणे
बंद केलं की काय
पोटामध्ये...

॥ प्रतिसाद ॥

'युगवाणी' चा एप्रिल-मे-जून २००७ हा अंक पाहिला. पहिली प्रतिक्रिया म्हणजे करडे, पिवळे, विटके रंग आणि जुनाट वाडा आणि पडका दरवाजा अंगावर म्हणजे डोळ्यांवर धावून आला. सतीश पिंपळे हे नाव मी पहिल्यांदाच वाचले. पण पडका वाडा, ढासळते चिरे, मोडका दरवाजा या 'मटेरियल'ला वापरून त्यांनी जी कलाकृती सादर केली ती मनाला व्याकूळ करणारी आहे. मीही केव्हातरी चित्रकलेच्या क्षेत्रात 'हातमारी' करत होतो. पण मी 'चांगल्या' गोष्टीची 'सुंदर' चित्रे काढत होतो. माझा मूर्खपणा आणि मर्यादा माझ्या लक्षात आल्या. मी चित्रे काढणे सोडले. आज पिंपळेचे चित्र सुंदर का वाटते हे मला पन्नाशीत आल्यावर कळते. असो. तुमच्याविषयी म्हणजे संपादक म्हणून माझी तक्रार अशी होती की तुम्ही स्वर्गीय कलावंतांचीच चित्रे मुखपृष्ठावर छापता. पळशीकर, पंधे, मेन्दुले यांच्याविषयी पूर्ण आदर बाळगून म्हणतो की जिवंत कलाकारही पुष्कळ आहेत. जुने छापायचे तर दुर्मिळ, वेगळे तरी छापा. स्व. मेंदुले यांचे चित्र 'अनंत' या टायटलने खूप वर्षांपूर्वी पाहिलेले मला आठवते. खूप मोठ्या कॅनव्हासवर मला वाटते ते होते. पिंपळेच्या चित्राच्या विरोधी असे छायाचित्र शेवटी तुम्ही छापले आहे. नक्षीदार घंटी किंवा पेला असावा. प्रत्येक अंकात शेवटी फोटो छापण्यामागे कोणता संपादकीय दृष्टिकोन आहे हे मला पामराला तरी कळले नाही. त्यापेक्षा कलाकृती, चित्र किंवा मजकूरच छापा ना हो. तेवढाच आमचा म्हणजे वाचकाचा फायदा होईल.


मला कविता आवडल्या प्रणव प्रियांका प्रकाश यांच्या. (ते पुरुषच असावेत आणि तरुण असावेत असा माझा समज आहे) त्यांची कविता ताजी आहे. थोडी कच्ची आहे पण नवीनतेने भरलेली आहे. महानगरातले अनुभव-जीवन खूप कवितांमध्ये आजकाल येते. त्यातही थोडे वेगळेपण 'प्रप्रिप्र' यांच्या कवितेत येते. (ते मुंबईचे रहिवासी आहेत असा देखील माझा अंदाज आहे. चूकभूल देणे घेणे.) फ्रस्ट्रेशनची तेज लोकल, हँग झालेली मने, प्लॅस्टिकची फळे, माणुसकीचे स्पीडब्रेकर अशा अफलातून प्रतिमा त्यांच्या कवितेत आहेत. पिंपळेप्रमाणे हाही कवी मी पहिल्यांदाच पाहिला. म्हणजे वाचला (एक शंका शेवटची कविता चांगली आहे पण काही तरुण कवितांमध्ये 'सू' 'शी' चा उल्लेख किंवा वर्णन आवश्यक असते का ? कदाचित यालाच आधुनिकता म्हणत असतील) खरे सांगू का, तुमच्या 'युगवाणी'त भाषांतर नाहीतर अनुवाद म्हणून तुम्ही जे छापताना ते मराठीतल्या तशा लेखनापेक्षा ग्रेट असते. हिंदीतल्या कविता, नेरुदाच्या कविता, पणिक्करांच्या

कविता देऊन तुम्ही आणि सर्वश्री चंद्रकांत पाटील, जेऊरकर, एन्के यांनी मराठी वाचकांवर उपकारच केले आहेत. कमलेश्वरांची - 'नागमणि' ही कथा मी वाचली नव्हती. आपल्या भाषेसाठी वेडी (नंतर हुतात्माही) होणारी माणसं आता इतिहासजमा झाली आहेत. या कथेतल्यासारखी चारदोन माणसं जरी आज मराठीला लाभली तरी आपले भले होईल. (त्यादृष्टीने तुमचा 'मराठी लिहा, मराठी वाचा, मराठी ऐका, मराठी बोला हा सूचनावजा आग्रह मला आवडला.)

तुम्ही कोणती भूमिका घेऊन म्हणजे स्वीकारून 'युगवाणी' चे संपादन करता हे मला माहीत नाही. पण जाणवते ते असे की विदर्भाबाहेरच्या लेखकांचे साहित्य तुम्ही मोठ्या संख्येने प्रकाशित करीत आहात. मी प्रादेशिकतेचा पुरस्कर्ता नाही म्हणून मला ही गोष्ट आवडली. पण उद्या याही क्षेत्रात विदर्भाचा बॅकलॉग भरून काढा अशी मागणी कोणी केली नाही म्हणजे मिळविली. बहुतेक पुस्तकाचे परीक्षणकर्ते विदर्भातील असतात आणि पुस्तकांचे लेखकही विदर्भातील असतात असे लक्षात येते. महत्वाच्या नव्या पुस्तकांवर छापून आलेले दीर्घ लेख आम्हाला वाचायला नक्कीच आवडतील असे आवर्जून सांगावेसे वाटते.

अंकाविषयी खटकणारी एक गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाही. (कृपया राग मानू नये) ती म्हणजे उशीरा निघणारे अंक. किती उशीर ? त्यात पुन्हा दिवाळी अंक अजून मिळालेला नाही. (की तुम्ही दिवाळी अंक काढणारच नाही ? दिवाळी अंक हा मरहट्टी संस्कृतीचा एक भाग झालेला आहे हे लक्षात घ्यावे. की साहित्याचा दर्जा सांभाळायचा म्हणून दिवाळी अंक आम्ही काढणार नाही अशी 'उच्चभ्रू' भूमिका तुम्ही घेतली आहे ? सत्यकथा, कवितारती, आधीचे युगवाणी देखील, मौज, अभिरुचि - अगदी अनियतकालिकांचे देखील दिवाळी अंक निघायचे किंवा निघतात हे आपण लक्षात घ्यावे ही विनंती) एक आणखी गोष्ट म्हणजे 'युगवाणी' तील मजकूर बऱ्यापैकी शुद्धलेखनाचे नियम पाळू छापलेला असतो. पण मागे एका अंकात 'माउली' हा शब्द 'माऊली' असा अशुद्ध रूपात पाचवेळा छापलेला आहे हे फारच खटकले. तेही रंगीत पानावर. माउलीचा 'उ' ऱ्हस्व आहे. असो. नेहमीच असे सविस्तर लिहिणे होत नाही. हेही लिहिलेले आपणास आवडेल असे नाही. अधिकउण्याची क्षमा असावी.

- विजय काशिनाथ बारगीर
अलिबाग



विदर्भ साहित्य संघ
।। कार्यवृत्त ।।
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २००७

६ ऑगस्ट - विदर्भ साहित्य संघ व विजय प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मीनगरस्थित सायंटिफिक सभागृहात पराग घोंगे यांच्या 'वाळूचं घर आणि इतर नाटके', 'अंधारकैद आणि इतर एकांकिका' आणि अनुबंध (वृत्तपत्रीय स्तंभलेखन) या तीन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. महेश एलकुंचवार होते. या पुस्तकांचे प्रकाशन ख्यातनाम नाटककार विजय तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समीक्षक पुष्पा भावे उपस्थित होत्या. सूत्र संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. तर आभार प्रदर्शन विजय प्रकाशनचे सचिन उपाध्याय यांनी केले.

८ ऑगस्ट - विदर्भ साहित्य संघाच्या वा. वि. मिराशी सार्वजनिक वाचनालय व भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालयाने 'अण्णाभाऊ साठे अभिनंदन' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. समारंभाचे अध्यक्ष स्थान डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी भूषविले. प्रमुख वक्ते प्रसिद्ध कथालेखक चंद्रकांत वानखेडे होते. शोभा उबगडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या 'स्मशानातील सोनं' ह्या कथेचे वाचन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुहास राजनकर यांनी केले. तर अभार प्रदर्शन डॉ. ईश्वर नंदपुरे यांनी केले.

१५ ऑगस्ट - विदर्भ साहित्य संघातर्फे १५ ऑगस्ट, २००७ रोजी सकाळी ९.३० वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उबगडे यांच्या हस्ते झाला. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, वामन तेलंग, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, प्रकाश एदलाबादकर, शुभदा फडणवीस, रवींद्र शोभणे, वसंत वाहोकार, मेघना वाहोकार, संयोगिता धनवटे ही मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती. तसेच कर्मचारीवृंदही उपस्थित होता.

१८ ऑगस्ट - अखिल भारतीय महामंडळाचे पूर्वाध्यक्ष, प्रख्यात लेखक व समीक्षक डॉ. गं. ना. जोगळेकर, महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक सरोजिनी वैद्य व न्या. प्रतापराव बेहेरे या तीनही वाङ्मय क्षेत्रातील मान्यवरांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष सुरेश द्वादशीवार हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. आशा सावदेकर, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. रवींद्र शोभणे यांनी या प्रसंगी शोक संवेदना व्यक्त केल्यात. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात हा कार्यक्रम झाला.

२७ ऑगस्ट - मौज प्रकाशनाचे संचालक, ज्येष्ठ लेखक समीक्षक, संपादक श्री. पु. भावत यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासंबंधीची सभा विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यालयात झाली. या सभेत प्रा. महेश एलकुंचवार, आशा बगे, प्रा. नारायण कुलकर्णी-कवठेकर, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी शोक संवेदना व्यक्त केल्यात.

८ सप्टेंबर - विदर्भ साहित्य संघातर्फे निःशुल्क चालविण्यात येणाऱ्या फंक्शनल अरेबी भाषा वर्गातील तिसऱ्या बॅचच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक संकुलाच्या सभागृहात झाला.

शाखावृत्त -

कारंजालाड


३० ऑगस्ट - विदर्भ साहित्य संघाच्या कारंजालाड शाखेतर्फे ५६ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, श्री. नामदेव कांबळे यांचा आमदार पाटणी ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्ष स्थानिक श्री गुरु मंदिर संस्थानचे अध्यक्ष नारायणराव खेडेकर होते. डॉ. सुभाष गढीकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीला कोंडोलीकर यांनी सूत्र संचालन केले तर आभार प्रा. शुभांगी कोंडालीकर यांनी मानले.

■ ■ ■

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका


ISO 9001:2000
DNV
REGISTERED FIRM
An ISO 9001 : 2000 Company
20 YEARS OF CARE
Trust, Reliability & Quality.
The Hallmarks of a
Shewalkar Property.
Shewalkars. The name that has generated an aura of abject trust and faith around itself. Shining bright in the halo of recognition by its customers - 2822 happy families & 686 commercial space owners, and over a dozen dignified corporates, who occupy real estate developed with absolute care & devotion. And a mission- To give nothing but the best.
An ISO 9001 : 2000 Company.
shewalkar
developers limited
Laxmi Bhavan Square, W.H.C. Road, Dharampeth, Nagpur-440 010.
Tel. : 2543807, 2543785, 2531777. Fax : +91-712-2538129.
e-mail : shewalkr_ngp@sancharnet.in